
# गोकुळच्या गौळणी

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. 7254



REFBK-0007254

पं. महादेवशास्त्री

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२.१
१०३६०

मराठी ग्रंथ सं...
अ. नं. ............

मनोहर ग्रंथमाला प्रकाशन ५५ वें

# गोकुळच्या गौळणी

: लेखक :

पं. महादेवशास्त्री जोशी

REFBK-0007254

जानेवारी १९४९

★

किंमत २ रुपये

प्रकाशक : मनोहर महादेव केळकर
मनोहर ग्रंथमाला, १९६।८५ टिळक रोड, पुणें २.

× × × ×

मुद्रक : नरहर विश्वनाथ सरदेशपांडे
आदर्श मुद्रणालय, सदाशिव पेठ, पुणें २.

# गोकुळांत प्रवेश करण्यापूर्वी

साधारण मध्यरात्रीचा सुमार असेल. पुण्यपत्तनाच्या रस्त्यांवरची रहदारी ओसरत चालली होती. शुद्ध अष्टमीचें चंद्रखंड अस्ताचलावर टेकण्याच्या बेतांत आलें होतें. चांदणें मंद होत चालल्यामुळें नगरांतले विद्युदीप अधिक तेजाळ दिसूं लागले होते नागरजन निद्रासुखांत निमग्न झाल्यामुळें वातावरणांतली शांतता सांद्र होत चालली होती. अशा वेळीं एका मंदिरांतलें प्रवचन आटपून मी घरीं येत होतों. एका कोंपऱ्यावर मी वळलों तोंच थोड्या अंतरावरून टाळमृदंगांचा नाद माझ्या कानीं आला. त्याच्या जोडीला अनेक कंठांतून एकाच काळीं प्रकट होणारा अनुस्यूत अखंड असा दुसऱ्या सप्तकांतला पंचम स्वरहि होता. तें नादानुसंधान धरून माझीं पावलें तिकडे वळलीं. एका वाड्यांत माडीवर मंडळीचें भजन चाललें होतें. विशिष्ट लयींत बरेच टाळ किणकिणत होते. मृदंग धिमधिमत होता. आणि कोणीतरी एकजण आपल्या किन्नरकंठानें एका गौळणीच्या पदाचें पालुपद घोळवून घोळवून म्हणत होता.

"येश्वदे बाळ तुझा तान्हा
कोठवरी सोसुं मी धिंगाणा–"

कितीतरी वेळ तें सुस्वर, भावुक भजन चाललें होतें. रस्त्यावरच्या खांबाजवळ मीहि एक जिवंत खांब होऊन उभा होतों. सोन्याचे कान करून तें ऐकत होतों. ती गौळण म्हणून संपल्यावर आणखीहि एक दोन गौळणी त्यांनीं म्हटल्या. मला त्या अत्यंत आवडल्या. माझ्या हृदयांत रसतरंगिणी ओसंडून वाहूं लागली. एका प्रकारच्या भावतंद्रेंत, त्यांतले काही चरण मनाशीं गुणगुणतच मी घरीं आलों. संतवाङ्‌मयांतलें एक नवें 'आनंदवन' त्या दिवशीं अचानक मला सांपडलें होतें.

त्या नंतर बरेच दिवस मला त्याच वाङ्मयाचा छंद लागला. संतांचे गाथे एकत्र करून त्यांतली 'बालक्रीडा' 'गौळणी' 'राधाविलास,'

१.०५ 92८९


'विराण्या' वगैरे सगळीं पदें मी वाचून काढलीं. त्यांतलीं शब्द, अर्थ आणि भावना या दृष्टींनीं जीं पदें मला अधिक हृद्य आणि अस्वाद्य वाटलीं तीं वेगळीं निवडून घेतलीं. गोकुळ-वृंदावनाच्या पुण्यभूमीवर जें बालकृष्णाचें चरित्र घडलें त्या अनुरोधानें त्यांची संगति लावली. आणि त्यानंतर त्या पदांतला रसाळ भावार्थ यथामति उकलून दाखवण्याचा जो प्रयत्न केला त्याचें दृश्य फल म्हणजे प्रस्तुतचें हें पुस्तक होय. मी निवडून घेतलेल्या पदांपैकीं जवळ जवळ अर्धीं पदें शिल्लक राहिलीं आहेत. फार गोड आहेत तीसुद्धां. प्रत्येकांत भक्ति-प्रेमाच्या वेगवेगळ्या नाजूक छटा आहेत. पण बानगीदाखल जें लिहायचें तें फार फुगवूं नये, मोठा ग्रंथ लिहून वाचकांना 'अवढाणें' आणण्यापेक्षां थोडक्यांत गोड करावें असा कटाक्ष असल्यामुळें उरलेलीं तीं पदें वहींत आणि शक्य तर हृदयाच्या मांदुसेंतच ठेवणें भाग आहे.

संत वाङ्मयाच्या विस्तीर्ण आणि भव्य प्रासादांत 'गौळणी वाङ्मय' हें एक आकर्षक आणि शृंगारलेलें दालन आहे. 'शृंगारलेलें' हा शब्द मी हेतुपुरस्सर वापरला आहे. कारण त्यांत शृंगाराच्या 'नानापरी' आहेत. संतवाङ्मयांत शृंगार म्हणजे 'अब्रह्मण्यम्' असें एखाद्याला वाटणें संभवनीय आहे. पण शृंगार हा कांहीं भ्रष्ट नाहीं अतएव त्याज्यहि नाहीं. बहुतेक सगळ्या कवींनीं आणि साहित्यशास्त्रकारांनीं त्याला 'रसराज' ही पदवी बहाल केली ती त्यांच्या डोक्यावर कोणी धोंडा ठेवला होता म्हणून नव्हे. ज्ञानेश्वरमहाराज जरी रसमालिकेंत शांतरसाला प्राधान्य देतात तरी त्यांनाहि शृंगाराचें महनीयत्व पूर्णपणें ठाऊक होतें, हें त्यांच्याच ग्रंथावरून दिसून येतें. जग अश्रूंवर जगत नाहीं, वैरावर जगत नाहीं अथवा भीतीवरहि जगत नाहीं. जगाच्या जीवनाचें मूलभूत तत्त्व प्रेम हेंच आहे.

प्रेमानेंच माणसें एकत्र जोडलीं जातात. प्रेमामुळेंच तीं एकत्र नांदतात. प्रेमानेंच त्यांचें जीवन सुखमय होतें. द्वेष-भय-क्रोधादि भावना मानवी मनाच्या सागरांत उचंबळतात हेंहि आपण पहातों. पण त्या अल्पजीवी असतात. कोणाच्या तरी प्रेमांतूनच त्या उठतात आणि कोणाच्या तरी प्रेमांतच त्या लय पावतात. आद्यंतीं प्रेम तेवढें शिल्लक

९०३६०

उरते. माणूस सार्वकाल भीत, क्रुद्ध अथवा रडका राहूं शकत नाहीं. तो सार्वकाल प्रेमळ मात्र राहूं शकतो. अशी ही मूलभूत भावना आहे.

याच प्रेमभावनेनें रतिरूप घेतलें कीं तोंच शृंगाराचा स्थायी भाव होतो. संतांनीं आळवलेला, खेळवलेला जो शृंगार तो भक्तिरसाचाच एक पर्याय आहे हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. कळत वा नकळत भक्ती-मध्यें शृंगार सहजपणें प्रगट होतो आणि शृंगारांत उत्कट भक्ति संचरते गोपींचें कृष्णप्रेम संतांना इतकें विलोभनीय आणि कवनीय वाटलें त्याचें कारण एकच कीं, त्या प्रेमांत रति आणि भक्ति हीं दूध–पाण्यासारखीं एकजीव झालीं आहेत.

नंदकुमार श्रीकृष्ण सुंदरांचा सुंदर होता. त्याची ' सांवळी श्रीमूर्त ' पहातांना ' डोळियांची धणी ' पुरत नसे. त्याचें सगळेंच मधुर. ' मधुराधिपतेरखिलं मधुरम् ! ' गोपी त्याच्या सौंदर्याला, माधुर्याला आणि कमनीय कांतीला भुलल्या त्याच्यावर जिवेंभावें आसक्त झाल्या. त्यांच्या हृदयांत कृष्णविषयक काम जागृत झाला. अभिलाषा आणि आसक्ति ढवळून, खवळून उठल्या. विकारवश होऊन, उद्दाम उच्छृंखल होऊन त्या श्रीकृष्णाजवळ आल्या. हें सगळें खरें; पण गोपींच्या कृष्णप्रेमाचा हा केवळ पूर्वरंग आहे. आपणापैकीं बरेचजण हाच तेवढा डोळ्यांपुढें ठेवतात याला अनुलक्षूनच कृष्णचरित्रावर आक्षेप घेतात. आपणाला दुर्निवार होणाऱ्या भावना, गोपींना आणि कृष्णालाहि तशाच दुर्निवार होत्या असें समजून स्वतःच्या दुबळेपणाचें प्रच्छन्नपणें समर्थन करूं पहातात. पण ही प्रेमकथा एवढ्यावरच संपत नाहीं. हिला पूर्वरंगाप्रमाणेंच उत्तररंगहि आहे अन् तोच महत्त्वाचा आहे आपलें ध्यान तिकडे वळलें पाहिजे

भीष्माचार्यांनीं श्रीहरीला ' पवित्राणां पवित्रम् ' असें म्हटलें आहे. त्याचें पावनत्व एवढें समर्थ आहे कीं ज्याच्यावर कृपाप्रसाद करावयाचा तो ठरवील त्याच्या अंतरांतले कसलेहि प्रमाथी विकार केवळ त्याच्या दृष्टिक्षेपानेंच दग्ध होतात त्यानें गोपींच्या अंतरांतला निकराचा प्रेम-भाव पाहिला. तो त्याला प्रिय वाटला. पण तें प्रेम खाणींतून काढलेल्या सोन्यासारखें होतें. आसक्ति आणि इंद्रियसुखाची तृष्णा यांची भेसळ

त्यांत होती. श्रीहरीनें तें गाळून शुद्ध करायचें ठरवलें. दर्शन, स्पर्शन, संभाषण आणि रासरस या मधुर साधनांनीं गोपींना कळूंहि न देतां त्यानें त्यांचे विकार जाळून टाकले. त्यांचा कामच निष्काम करून सोडला. मग उरलें तें एकीएक निर्मळ, निर्लेप, प्रेम. शांत, स्निग्ध आणि पवित्र. मग गोपी या गोपी राहिल्या नाहींत. त्या कृष्णरूपीं मिसळून गेल्या. ज्ञानेश्वर महाराजांनीं एवढा सगळा अर्थ एकाच ओवींत सांगून टाकला आहे.

> 'पाहें पां बालभावेनि व्याजें
> तिया व्रजांगनांचीं निजें
> मज मीनलिया काय माझें
> स्वरूप नव्हतीं ?'

संतांच्या गौळणीवाङ्मयांत हेंच परम रहस्य सांगितलेलें आहे. आणि याच दृष्टीनें त्याच्याकडे पाहिलें पाहिजे.

कृष्ण, यशोदा, राधा, गोपी, गोपाळ आणि गोकुळ वृंदावन यांचीं वर्णनें या गौळणीवाङ्मयांत आहेत. यशोदेचें वात्सल्य, राधेचा अनुराग, गोपींचें अत्युत्कट प्रेम, गोपाळांची कृष्णनिष्ठा, बाल-कृष्णाचे अलौकिक पराक्रम, त्याच्या खोड्या आणि गोपींना रमवण्याचें त्याचें चातुर्य—इत्यादि गुणविशेषांनीं हें वाङ्मय म्हणजे माधुर्याचा उत्कृष्ट परिपाक झालें आहे. कृष्णाच्या बालक्रीडा वर्णन करण्याची स्फूर्ति संतांनीं भागवत ग्रंथाकडून घेतली. मूळ तें घेतलें आणि आपल्या उज्वल प्रतिभेनें त्याचा मोठा थोरला वृक्ष बनवला. गोपींच्या घरीं शिरून कृष्णानें ज्या कांहीं खोड्या केल्या, त्यांचें वर्णन भागवताच्या दहाव्या स्कंधाच्या आठव्या अध्यायांत अवघ्या दोन श्लोकांत व्यासांनीं केलें; पण संतांनीं कृष्णगुणांना भुलून विविध प्रकारची, चित्ताकर्षक अशी कितीतरी पद्यरचना विस्तारिली. बालस्वभावाचे अनेक हृद्य नमुने त्यांत त्यांनीं दाखवले. गोपींच्या कृष्णप्रेमाचें वर्णन भागवतकारांनीं तन्मयतेनें आणि गोड भाषेंत केलें आहे. शरद्वर्णन, रासक्रीडा, गोपी-गीत इत्यादि दशमस्कंधांतले प्रसंग फारच बहारीचे आहेत. सहृदय

मनुष्याच्या डोळ्यांत प्रेमाश्रु उभे रहावे असें त्या कवित्वाचें सामर्थ्य आहे. पण तें वाचून संतांची तद्विषयक पद्यरचना पाहिली कीं संतांनीं व्यासवाणीचा केवळ अनुवाद केला आहे, असें वाटत नाहीं. त्यांत त्यांच्या प्रतिभेची नावीन्यपूर्ण चमक जागोजागीं दिसून येते. व्यास-मुनींना न दिसलेले अथवा दिसून त्यांनीं प्रगट न केलेले कितीतरी आशय संतांनीं आपल्या वाणीनें व्यक्त केले आहेत.

हें वाङ्मय इतकें मनोहर होण्याचें कारण म्हणजे तें एकसुरी नाहीं. विविध रंगछटांनीं तें नटलेलें आहे. यांत प्रणय आहे आणि क्रोधहि आहे. राग आहे अन् अनुरागहि आहे. विलास आहे तसा विरहहि आहे. सुख आहे तशा वेदनाहि आहेत. समाधानाबरोबरच हुरहुरहि आहे. रांगणारा, दुडुदुडु धांवणारा, नाचणारा, गौळणींच्या घरीं दहि-दुध चोरणारा, गोपींच्या वाटट खोड्या करणारा, मुरली वाजवणारा, गायी वळणारा, रासक्रीडा करणारा अशीं एकाच कृष्णाचीं अनेक नयनमनोहर रूपें यांत पहायला सांपडतात अकस्ताळी, कांगांवखोर, साधीभोळी, रमणी, मानिनी, कामिनी अशीं गोपींचीं नानाविध स्वरूपें यांत दृष्टीस पडतात यांतलीं स्वभाववर्णनें फार बारकाव्याचीं आहेत. कल्पनाहि प्रचुर आहेत. एकेक कल्पना पाहिली कीं, कोंदणांत बसवावी इतकी ती चमकदार वाटते. रचनेचे नानाविध प्रकार, जागजागीं अलंकारांची पखरण इत्यादि गोष्टींनीं हें वाङ्मय समृद्ध आहे.

नामदेवाची पद्यरचना अधिक प्रसादपूर्ण आहे. योग्य ठिकाणीं अर्थवाहक असे सुंदर शब्द त्याला सुचतात. स्वभावतले खटके तो मजेदार रीतीनें दाखवतो, श्रीकृष्णाच्या मुरलीप्रमाणेंच त्याचीं पदें मधुर आहेत असें म्हणावें लागेल. तुकोबांच्या पदांतून मुरब्बी चातुर्याच्या छटा दिसून येतात. त्यांच्या गौळणी ठसकेबाज, अन् प्रगल्भ दिसतात. तुकोबांची रचना भावनेला फुलवते आणि बुद्धीलाहि रमवते. नाथांच्या गौळणी तर लोकविश्रुतच आहेत. भजनांत नाथांची एखादी गौळण हटकून यायचीच. त्या गौळणी सकृद्दर्शनीं लौकिक, आणि कामप्रेरित अशा वाटल्या तरी त्यांच्या अंतरंगांत पूर्णपणें परमार्थ भरलेला आहे. थोडेसें आंत डोकावून पाहिलें कीं तो प्रतीत होतो. श्री ज्ञानेश्वर-

महाराजांच्या विराण्या गहन अर्थानें भरलेल्या आहेत. निळोबांच्या गौळणी म्हणजे मराठी भाषेंतली उपनिषदेंच. त्यांच्या अनेक पदांतून भक्तियुक्त अद्वैत तत्त्वज्ञानाच्या निरनिराळ्या बाजू त्यांनीं पद्धतशीरपणें मांडलेल्या आहेत.

नामदेव काय, नाथ काय, हे सारे संत विठ्ठलाचे भक्त. त्यांचें सारें जीवनच विठ्ठलमय झालेलें. असें असतां विठ्ठलाला सोडून त्यांनीं कृष्णलीलांच्या वर्णनांत वाणीचा विलास कां केला ? याचें उत्तर एकच कीं बाळकृष्ण आणि विठ्ठल हे दोन नाहींत. जन्मापासून तों ज्या वयांत कंसवध केला त्या वयोमानापर्यंतचा पौगंड दशेंतला श्रीकृष्ण म्हणजेच पंढरीस विटेवर ' युगें अठ्ठावीस ' उभा असलेला श्रीविठ्ठल. त्याच्या बालक्रीडा आणि त्याचीं विविध कौतुकें वर्णून संतांनीं आपली धणी फेडून घेतली. मुरलीमोहन मुकुंदाच्या लीलाचारित्रांत संत स्वतः रंगले आणि त्यांनीं इतरानांहि रंगवलें.

तात्पर्य, असें आहे हें संतांचें गौळणी वाङ्मय. प्रस्तुतच्या पुस्तकांत त्याचें अल्पस्वल्प रसग्रहण करण्याचा मी प्रयत्न केला आहे. तो कसा काय वठला आहे तें रसिक वाचक—त्यांच्या वाचनांत येण्याचें भाग्य या पुस्तकाला लाभलें तर—ठरवतीलच.

संतांवरचा चाकर

**महादेवशास्त्री जोशी**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# अनुक्रमणिका


| प्रकरण | पृष्ठ |
|---|---|
| १ कृष्णाची बालक्रीडा | १ |
| २ कृष्णाची गाऱ्हाणीं | २१ |
| ३ गौळणींचा निदिध्यास | ३१ |
| ४ काला | ५० |
| ५ मुरली | ५८ |
| ६ विराण्या | ६४ |

# आमचें प्रकाशन

रुपये

फ्रेंच राज्यक्रांति : न. चिं. केळकर २॥
राका : सौ. संजीवनी मराठे १।
प्रतारणा : प्रा. दांडेकर १
संसार–सोपान :
सौ. गिरजाबाई केळकर १।
प्रदक्षिणा : (वाङ्मय समालोचन) २॥
संस्कृती संगम ( आ. दु. )
द. के. केळकर ६
चंपी आणि मोत्या १॥
वेदप्रकाश : पाठकशास्त्री १०
Hindu-Pad-Padashahi :
V.D.Savarkar. ५
जीवनविहार : आचार्य कालेलकर २
स्मरण सांखळी :
कमलाबाई देशपांडे ६
रानोमाळ : रा. वि. फडतरे २॥
साहित्यविहार : प्रा द. के. केळकर ३
ससेमिरा : त्र्यं. वि. सरदेशमूख २॥
गांवरान गीता : न. चिं. केळकर २
काव्यालोचन ( आ. २ री. )
प्रा. द. के. केळकर ५
हंसरा निर्माल्य व चिमण्या :
कमलाबाई देशपांडे २
साहित्याचा ध्रुवतारा :
प्रा. रा. शं. वाळिंबे ३

रुपये

'नरसिंह' केळकर : वि. उ. वैद्य १॥
ज्ञानेश्वरी सर्वस्व : न. चिं. केळकर ५
ठेंगणें अस्मान : श्रीधर देशपांडे ४
मानस चित्रें : गंगाधर गाडगीळ ३
उपायन : म. म. केळकर २॥
संस्कृत काव्याचे पंचप्राण :
के. ना. वाटवे ६
काव्यविहार : माधवराव पटवर्धन ४
Location of Lanka
Sirdar M. V. Kibe २
तिसऱ्या महायुद्धाच्या छायेंत :
य. न. केळकर ५
हिंदी हीच आमची राष्ट्रभाषा :
शं. दा. चितळे ३
हिंदी क्रिकेट : र. गो. सरदेसाई ५
अपौरुषेय वाङ्मय अर्थात् स्त्री गीतें :
कमलाबाई देशपांडे ३
मा थेन थेन आणि इतर गोष्टी ३
रत्नाकार : द. पां. खांबेटे २
गोकुळच्या गौळणी :
पं. महादेवशास्त्री जोशी २
कामधेनू अर्थात् पाकशास्त्र :
सौ. गिरिजाबाई केळकर २

मनोहर ग्रंथमाला, १९६/८५ टिळक रोड, पुणें २.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नों. क्र.
१०३६०

# कृष्णाची बालक्रीडा : १

मत्स्य-कूर्मांपासून तों रघुकुलतिलक श्रीरामचंद्रापर्यंत एकाच विश्वंभर परमात्म्यानें परिस्थित्यनुरूप नाना आकार धारण करून भूतलावर अवतरण केलें. आपल्या अतुलनीय सामर्थ्यानें दैत्यांचीं कुळें नाशिलीं. अधर्म उच्छेदिला. धर्म आणि नीति यांच्या पदराला गांठ मारली. सुखाची गुढी उभवून भक्तजनांना आनंदाची नित्य दिवाळी केली. आणि एवढें हें देव-भक्तकार्य संपादून भगवान् क्षीरसागरांत शेषशनावर सुखनिद्रा घेत कांहीं काल पहुडले तोंच पुनश्च पृथ्वीनें आर्त हांक फोडली – ‘ देवाधिदेवा ! भार असह्य झाला !! ’

दुर्जन हे हरळीसारखे असतात. कितीहि खरपून खुरडून काढले तरी त्यांचीं बीजें कांहीं नाहींशी होत नाहींत. अनुकूल संधि मिळाली कीं तीं पुनश्च डोकें वर काढतात आणि वाढूं लागतात. द्वापार युगाच्या शेवटीं असेंच झालें. मथुरेंत कंस माजला. मगधांत जरासंध अतुबळी झाला. त्यांच्या अनुरोधानें पौंड्र-शाल्वादि राजेहि उच्छाद मांडूं लागले. दुष्ट दानवांचें एक कूटमंडळच बनलें आणि त्यानें नीतिधर्माचा जणूं खग्रासच आरंभिला. आणि अशा रीतीनें जेव्हां त्यांची चोहोंबाजूंनीं चलती झाली तेव्हां वैकुंठनायकाला क्षीराब्धींतून बाहेर येऊन कृष्णरूपानें मथुरेंत देवकीच्या उदरीं जन्म घेणें भाग पडलें.

कंस हा देवकीचा भाऊ. पण तोच तिच्या वांस्याला निर्दय खाटिक झाला होता. एकामागून एक अशीं तिचीं सहा नवजात अर्भकें त्यानें ठार मारलीं होतीं. सातवा गर्भ बलरामाचा होता. पण त्यानें हें अरिष्ट ओळखून, देवकीच्या उदरांतून गोकुळांत वास्तव्य करणाऱ्या रोहिणीच्या उदरांत स्थलांतर केलें होतें. आणि आतां आठव्या खेपेला कंसाच्या त्या बंदिशाळेंत साकार परब्रह्माला उदरीं वागवून देवकी गर्भवती झाली होती.

या खेपेचे तिचे डोहाळे निराळयाच प्रकारचे होते. या वेळच्या तिच्या इच्छा-आकांक्षांतहि तोच भगवान् संचरला होता आणि आपल्या भावी महत् कार्याच्या रूपरेषा तिच्या मनबुद्धींच्या द्वारें तो प्रगट करीत होता. नाथ म्हणतात :

असतां बंदिशाळे देवकी डोहळे
गर्भ घननीळें आथियला ॥ १ ॥
गुज पुसे भ्रतारा आनु नेणें दुसरा
आवडी अवधारा जिवा होय ॥ २ ॥
मेळवुनी लेंकुरें खेळखेळा साकार
गोकुळीं अवतार गौळियां घरीं ॥ ३ ॥

देवकीच्या उदरीं दिवसेंदिवस गर्भ वाढत होता. तिला वाटे, हें बाळ केवळ कुसव्यांतच नव्हे तर आपल्या प्रत्येक अवयवांत भरून उरलें आहे. सबाह्य अभ्यंतर यानें व्यापून टाकलें आहे. नवमास भरत आले तसतशी तिची चिंता वाढूं लागली. 'हें मूल तरी लाभेल कां मला ? कंसाच्या तावडींतून हें तरी सुटेल का ? का मागच्यांची गत झाली तीच याचीहि होणार ? पुत्रसुख आहे का माझ्या दैवांत......?

तंव न दुखतांचि पोट वेण न लागतां उद्भट
कृष्ण झाला प्रगट स्वयें अयोनिया ॥ १ ॥
हरि सुनीळ सांवळें बाळ निजतेजें तेजाळें
देखोनि वेल्हाळें स्वयें विस्मित ॥ २ ॥

हा प्रकाश बाहेर पसरेल. कंसाला वर्दी लागेल. अन् मग......या भयानें देवकी, बाळाला वस्त्राखालीं झांकूं लागली. पण तो प्रकाश तिला आवरेना. तिनें संभ्रांत होऊन वसुदेवाकडे पाहिलें.

देवकी वसुदेवाकडे पाहे तवं तो स्वानंदें गर्जताहे
येरी धांवोनि धरी पाये 'उगे रहा!'

तिनें वसुदेवाला म्हटलें कीं 'कोणालाहि सुगावा लागायच्या आंत तुम्ही याला दुसरीकडे कुठेंतरी न्या जिथें त्या नष्ट कंसाचा हात पोंचणार नाहीं अशा ठिकाणीं घेऊन चला.' देवकीचें हें बोलणें ऐकून वसुदेव हंसून म्हणाला—

चोज कैसें कीण ज्या नाहीं जन्ममरण
त्यासि मारील कवण समूळ वावो

पण देवकीच्या मातृहृदयाला हा वेदांत रुचण्यासारखा नव्हता. तिनें कृष्णाला गोकुळांत नेण्याचा आग्रह धरला आणि वसुदेवाला तो पुरा करणें भाग पडलें.

श्रावण वद्य अष्टमीची ती रात्र. तिसरा प्रहर नुकताच लागला होता. बाहेर सगळीकडे भयाण काळोख. त्यांतच मुसळधार पावसाच्या सरी. अशा स्थितींत वस्त्रांत गुंडाळलेली बालमुकुंदाची मूर्ति घेऊन वसुदेव बाहेर पडला. तिच्याच प्रकाशांत तो मार्ग क्रमूं लागला. थोड्याच वेळांत यमुनेच्या तीरावर पोंचला.

तीरा आणिला श्रीकृष्ण हरिखें यमुना झाली पूर्ण
चढे स्वानंद जीवन चरणवंदनार्थ

यमुनेला आधींच पूर आला होता. त्यांत कृष्णदर्शन झाल्यानें तिचें हृदय आनंदातिशयानें अधिकच उचंबळून आलें. गोकुळ उरलें यमुनेच्या पैलतीराला. 'कांहींहि होवो; कृष्णाला गोकुळांत पोंचवायचाच' या निश्चयाच्या बळावर वसुदेव पाण्यांत उतरला. यमुनेच्या लाटा अधिकाधिक वर येऊं लागल्या. ती कृष्णाच्या पदस्पर्शासाठीं धडपडत होती. शेवटीं वस्त्राच्या अवगुंठनांतून एक तांबूस सुकुमार पाऊल बाहेर

येऊन जेव्हां तिच्या जलमय तनूला स्पर्शलं तेव्हां, मनोरथसाफल्याच्या आनंदांत यमुनेनें आपला प्रवाह दुभंग करून वसुदेवाला वाट मोकळी करून दिली. वसुदेव नदीपार होऊन गोकुळांत प्रविष्ट झाला.

गोकुळ. नांव उच्चारतांच देहावर आनंदाचा फुलोरा फुलवणारें गोकुळ. पुष्ट, दुधाळ गायींच्या खिल्लारांनीं भरलेलें गोकुळ. सभोवतीं 'वनशोभेची खाणी' उघडून राहिलेलें गोकुळ. प्रेममूर्ति गौळणींचें क्रीडास्थान. निर्मळ आनंदाचें माहेर. गोकुळ म्हणजेच दिव्य प्रेम. गोकुळ म्हणजेच भोळा भाव. आणि म्हणूनच भावाचा भुकेला श्रीहरि, आपलें बालपण उपभोगण्यासाठीं, मनसोक्त हसण्याखेळण्यासाठीं मथुरा सोडून तिथें आला.

यशोदेच्या पर्यंकावर नुकतीच जन्माला आलेली एक तेजाळ कन्या आपले चिमुकले हातपाय हालवीत होती. वसुदेवानें तिच्या जागीं कृष्णाला ठेवून तिला उचलून घेतलें आणि जड अंतःकरणानें अश्रु टिपीत टिपीत तो परत फिरला. एवढा वेळ योगमायेनें निद्रिस्त झालेली यशोदा कृष्णाच्या रडण्यानें दचकून जागी झाली आणि त्या वेळीं तिला कळलें कीं आपल्याला पुत्र झाला आहे. तें रडें ऐकून शेजारच्या गौळणीहि तिथें गोळा झाल्या. त्या दिव्य बालकाला पहातांच त्यांच्या आनंदाला पौर्णिमेची भरती आली, त्यांतलीच एक नंदाकडे धांवत गेली अन् म्हणाली —

"नंदजी ! तुम्हांला मुलगा झाला. किती सुंदर, किती गोजिरवाणा आहे म्हणून सांगूं ! वर्ण कसा सांवळा सांवळा. मुख किती हंसरं. डोळे कसे चमकदार. चला लौकर पुत्रावण करायला..."

आणि मग नंदाच्या जिवाची कोण धांदल उडाली तें पुसूं नये. त्यानें स्नान केलें. नवीं वस्त्रें परिधान केलीं. ब्राह्मणांना पाचारलें. त्यांनीं पुण्याहवाचन म्हटलें आणि नंदानें पुत्रमुख पाहिलें.

श्रीकृष्ण गोकुळांत वाढूं लागला. त्याचा कोवळा देह बाळसेदार अन् गुटगुटीत दिसूं लागला. सांवळी अंगकांति खुलूं लागली. मुख-मंडल अधिकाधिक रेखीव होऊं लागलें. हंसूं लागला कीं गालावर

खळी पडे. काजळ घातलेले डोळे, भोवतीं जमलेल्या माणसांत ओळखीचें कोण अन् अनोळखी कोण हें अचूक ओळखीत.

साऱ्या गोकुळाला त्याचा वेध लागला. गोपबालक त्याच्याजवळ येत अन् नाचून बागडून त्याला खेळवीत. गायी बैल तो दिसला नाहीं तर हंबरूं लागत. वासरें त्याच्यासाठीं ओढ घेत. वृद्ध स्त्रिया तिसऱ्या प्रहरीं यशोदेच्या चौपाशीवर जमत त्या बाळकृष्ण डोळ्यापुढें असावा म्हणूनच. गौळणींना तर त्याचा छंदच जडला. त्यांच्या ध्यानीं मनीं कृष्णाचें रूपडें विलसूं लागलें. घरकामांतून थोडी सवड मिळाली कीं आल्याच यशोदेच्या घरीं. ही म्हणे माझ्याकडे द्या बाळाला, अन् ती म्हणे माझ्याकडे द्या. गौळणींची ही स्पर्धा यशोदेला मोठ्या कौतुकाची वाटे.

कृष्ण हळू हळू रांगूं लागला आणि थोड्याच दिवसांत अेकेक पाऊलहि टाकूं लागला. त्याच्यापुढें दुडुदुडु धांवणें सुरू झालें. नंदजींचें विस्तीर्ण घर अन् प्रशस्त आंगण त्याच्या बाललीलांना अपुरें पडूं लागलें. यशोदेनें शिवलेलीं नवीं आंगडीं टोपडीं आणि बाळलेणीं आंगाखांद्यावर मिरवीत कृष्ण आंगणांत कसा नाचे, खेळे तें नाथ सांगतात.

१

भिंगाचें भिंगुलें खांद्यावर आंगुलें । नाचत तान्हुलें यशोदेचें
कडदोरा बिंदली वाघनखें साजिरीं । नाचत श्रीहरी यशोदेचा
गोविंद बाळिया वाजविति टाळिया । आमुचा कन्हैया देवराव
पायीं घागरिया वांक्या साजिरिया । कानींच्या बाळिया ढाळ देती
येती गौळणी करिति बुझावणी । लागती चरणीं कान्होबाच्या
एका जनार्दनि एकत्त्व शरण । जीवें निंबलोण उतरती

गौळणी जमून यशोदेच्या घरीं येत एक कृष्णाला पितांबर नेसवी. दुसरी त्याच्या गळ्यांत धवधवीत हार घाली. तिसरी पायांत वाळे चढवी. चवथी बोटांत आंगठ्या घाली. पांचवी कंबरेंत घागऱ्या बांधी. असा सगळा साजशृंगार करून मग त्याला उभा करीत. आपण त्याच्या भोवतीं फेर धरून बसत. मग कोणी तरी कृष्णाला म्हणे :

"सांवळ्या, आतां नाचून दाखव पाहूं! चल, उचल पाऊल!"

कृष्ण मग एकवार त्यांच्याकडे सहास्य दृष्टिक्षेप करी. लगेच एक पाऊल वर उचली. जमिनीवर त्याचा नाजूकसा प्रहार झाला कीं नूपुरांचा 'खुळळ ऽऽ' असा ध्वनि उमटे. गौळणी दोन्ही हातांच्या चुटक्या वाजवूं लागत कीं मग नृत्याला प्रारंभ.

२

गोकुळीं लाघव दावितो चक्रपाणि
भोंवत्या वेष्टित बैसल्या अवघ्या गौळणी
मधें सुकुमार सावळा शारंगपाणी
चिमणा पितांबर पिवळा
गळां वैजयंती माळा
घवघवीत घनसांवळा
पाहे नंदराणी १
नाच रे तूं कृष्णा, मज पाहूं दे नयनीं ॥ध्रु.॥
नाचतो सांवळा सुंदर निमासुर वदन
वाळे घोळ घागरियांचा झणत्कार पूर्ण
आकर्ण नयन सुहास्य वदन पाहुनी भुले मदन
हातींच्या मुद्रिका झळकती
क्षुद्र किंकिणी सुस्वर गाती
वाकी नेपुरें ढाळ देती
पाहती गौळणी २
सप्तही पाताळें नाचति हरिचिया छंदें
आकाश धरणी स्वर्गीं देव नाचति आनंदें
गण गंधर्व देव सर्व अक्षर हरिपदें
वैकुंठ कैलास नाचति
चंद्रसूर्य रसनायक रीती
ऋषिमंडळ धाक तोडिती
अद्भुत हरिकरणी ३

नाचति हरिपदें चतुर्दश लोकपाळ
शेष वासुकी नाचती सर्वही फणीपाळ
परिवारेंसी नाचती पृथ्वीचे भूपाळ
मेरु पर्वत भोगीनायक
वनस्पतीं नाचती कौतुक
वेदशास्त्र पुराण पावक
नाचत शूळपाणी ४

नाचती गोपाळ गोपिका सुंदर मंदिरें
उखळें जातीं मुसळें पाळें आणि देव्हारें
धातुमूर्ति नाचुं लागल्या एकसरें
गौळणी अवघ्या विस्मित
देहभाव हरपला समस्त
यशोदेसी प्रेम लोटत
धरिला धावुनी ५

शिणलासी नाचतां आतां पुरे करी हरी
विश्वरूप पाहतां गोपी विस्मित अंतरी
यशोदेनें कृष्ण घेतला कडियेवरी
एका जनार्दनी भक्तिभाव
अनन्य भक्ता दावी लाघव
निज भक्तांचें काज सर्व
करितां शिण न मानी ६

कृष्णाच्या नृत्याला जसजसा रंग चढे तसतसें गौळणींचें हृदय उचंबळे. त्याहि भावोन्मत्त होऊन नाचूं लागत. त्यांचा देहभाव हरपे. एखाद्या भावनेनें अंतःकरण व्यापून टाकलें कीं, चराचरांतहि तिचाच प्रत्यय येतो. गौळणींना तें बालकृष्णाचें नृत्य नसून विश्वात्म्याचें नृत्य आहे असें वाटलें. कृष्ण नाचतो, आपण नाचतों, स्वर्ग–मृत्यु–पाताळ नाचतात, सूर्य–चंद्र नाचतात, चौदा लोकपाळ, मेरु–मांदार वृक्ष–वेली, मूर्ति–मंदिरें, अितकेंच काय, उखळ, मुसळ, जातें हीं सुद्धां

धुंद होऊन नृत्य करतात असें त्यांना भासलें. यशोदा कृष्णाचें नृत्य-कौतुक पहात एवढा वेळ तटस्थ उभी होती ती पुढे झाली आणि 'बाळ, दमलास. आतां पुरे हो' असें म्हणत तिनें कृष्णाला उचलून कडेवर घेतलें.

कृष्णाची माता म्हणून यशोदेला धन्यता वाटे. शेजारणी पाजारणी देखील तिला तसें म्हणत. यशोदा माता खरी; पण स्वच्छंदानें घटकाभर त्याला खेळविण्याचें सुख कांहीं तिला त्या गौळणी मिळूं देत नव्हत्या. कोणीतरी अचानक उगवे अन् तिच्या मांडीवरून कृष्णाला उचलून घेऊन जाई. कृष्णाला खेळवतांना गोपींनां घरादाराचा आणि स्वतःच्या तान्ह्या बाळांचाहि विसर पडे. तुकोबाराय हेंच सांगतात :

३

बाळपणीं हरि खेळे मथुरेमाझारी
पायीं घागरिया सरी कडदोरा वांकी
मुख पाहे माता
सुख न माये चित्ता
धन्य मानवे संचिता
वोडवलें आजी १
बाळ चांगलें वो, बाळ चांगलें वो, म्हणतां चांगलें वो
वेळ लागे तया बोलें जिवापरीस तें वाल्हें
मज आवडतें ध्रु०
मिळोनियां याती येती नारी कुमारी बहुती
नाहीं आठव त्या चित्तीं भेदभाव कांहीं
विसरल्या घरें
तान्हीं पारठीं लेंकुरें
धाक सांडोनियां येरें
तान भूक नाहीं २
एकी असतील घरीं चित्त तयापासीं परी
वेगीं करोनी वोसरी तेथें जाऊं पाहे

लाज सांडियेली वोज
नाहीं फजीतिचें काज
सुख सांडोनियां सेज
तेथ धांव घाली ३

वेधियेल्या बाळा नर नारीया सकळा
बाळा बाळा खेळवी अबला याही विसरल्या
कुमर कुमारी
न भाव हा शरीरीं
दृष्टि न फिरे माघारी
तया देखतां हो ४

वैरभाव नाही आपपर कोणी काही
शोक मोह दुःख ठायीं तुका म्हणे सुखी
केलीं आपणासारिखीं
स्वामी माझा कवतुकीं
बाळ वेषें खेळे ५

कृष्णरूपी मेघानें गौळणींच्या मनःप्रांगणांत सुखाची वृष्टि केली. त्यांचें आपपरभाव निमाले. दैन्य दुःखें पळालीं. शोक मोह गळाले. आनंदस्वरूप घननीळानें गोकुळांत आनंदाचें पीक पिकवलें.

वयाच्या वाढीबरोबर त्याचा खेळकरपणाहि वाढूं लागला. हट्टाचीही चढती कमान झाली. यशोदेकडून सगळें यथास्थित होत असतांहि तो एखादे वेळीं अकारण हट्ट घेई.

बालकाचें हंसणें खेळणें गोड तसा हट्टहि गोड असतो. लटकें रागावून तो पुरवतांना आईच्या हृदयाला हर्षाच्या गुदगुल्या होत असतात. 'काय बाई हट्ट तरी' म्हणून ती शेजारणीकडे मुलाविषयीं तक्रार करते खरी, पण त्यांतहि राग नसून मार्दवच असतें, पण मुलानें मात्र कडोविकडीला जातां कामा नये. तरच त्यांतलें कौतुक रहातें. कृष्ण केव्हां केव्हां असा विचित्र हट्ट करी कीं बिचारी यशोदा त्याची समजूत काढतांना बेजार होऊन जाई. कधीं तो आभाळांतला चांदोबाच मागे. कधीं

यशोदेची भिंतीवर पडलेली सावलीच हवी म्हणून पाय चोळी कधीं आरशांतलें प्रतिबिंबच पाहिजे म्हणून आक्रोश मांडी. कसा हट्ट पुरवायचा यशोदेनें! असहाय्य होऊन ती आसवें गाळूं लागे. नाथांनीं तिची ही करुण अवस्था एका पदांत वर्णिली आहे :

४

रडत माझें बाळ तान्हें समजावितां राहिना ध्रु०
नानापरी समजावीतें मागितलें खाया देतें
थापटूनी निजवितें हालवितें पाळणा १
परोपरी घेतो छंद रडतसे फुंदफुंद
नेत्रांवाटे वाहे बिंद याचा डोळा लागेना २
ठाव घेतो धरितो दम सर्वां आंगीं आला घाम
एका जनार्दनीं प्रेम यशोदेसी माइना ३

कृष्णाच्या बाललीलांना बलराम साथीदार होताच. जगाला भारी होऊन उरलेल्या या जोडीनें यशोदेला 'पुरे पुरे' केलें तर त्यांत नवल कसलें! तिनें जेवायला वाढलें तरी ते सरळ जेवायचे नाहींत. मधेंच एखादें मांजर दिसलें कीं पानांतला दुधभात टाकून ते त्याच्याच पाठीस लागत. कृष्णानें मनीमावशीचा गळा धरला तर बलराम तिचें शेपूट ओढी. कुत्रें दिसलें कीं दुधाची वाटी त्याच्यापुढें नेऊन ठेवीत. माकडें जवळ आलीं कीं पकडून त्यांचे कान उपटीत. एकमेकांच्या अंगावर पाणी उडवतांना सगळीकडे चिखल करीत. दहीदूध किती सांडीत त्याला तर मितीच नसे.

कृष्णानें जणूं तिला बेजार करण्याचा विडाच उचलला होता. तिच्या गृहकृत्यांत पदोपदीं तो अडथळे आणि अव्यवस्था निर्माण करीत होता. ती गायीची धार काढायला बसली कीं हा तिच्या पाठीवर पडून गळां मिठी घालायचा; दह्याचा डेरा घुसळूं लागली कीं रवी घट्ट धरायचा; यशोदा 'हात सोड' म्हणाली कीं 'नाहीं सोडणार जा! मला आधीं प्यायला दे' म्हणून गाल फुगवायचा.

क्रो. ९२८९

कधीं कधीं कृष्ण यशोदेची दृष्टि चुकवून कुठेतरी दूर निघून जाई. सौंगड्यांच्या संगतींत स्वारी रमली कीं मग त्याला तहानभूकसुद्धां जाणवत नसे कीं घरची आठवण होत नसे. आणि मग यशोदेच्या जिवाचा थरकांप होई. ती त्याला घरांत, गोठ्यांत, आंगणांत, परसांत जिकडे तिकडे शोधूं लागे; मुखानें सारख्या हांका मारी; आणि इतकें करूनही कृष्ण सांपडत नाहीं असें झालें कीं मग गोकुळांतल्या घरोघरीं जाऊन विचारूं लागे : ' माझा कृष्ण पाहिलात काहो ? आला आहे का तुमच्या घरीं ? सांगा ना मला ! '

५

माझा कृष्ण देखिला काय कुणितरी सांगा गे ! ध्रु०
हातीं घेऊनियां फूल अंगणि रांगत आलें मूल
होतें सारवीत मी चूल कैसी भूल पडियेली ! १
माथां शोभे पिंपळपान मेघवर्ण ऐसा जाण
त्याला म्हणती श्रीभगवान योगीध्यानविश्रांति २
संगें घेउनी गोपाळ बाळ खेळे अळुमाळ
पायीं पोल्हारे झळाळ गळां माळ वैजयंती ३
एका जनार्दनीं माय घरोघरांप्रती जाय
कृष्णा जाणावे तें काय कोणी सांगा गे ४

गोकुळांतल्या ज्या गौळणी यशोदेच्या घरीं कृष्णाचें कोडकौतुक करण्यासाठीं जमत त्यांत राधा यशोदेची फार आवडती होती. ती यशोदेच्या विश्वासांतली होती. अंतरींचीं सुखदु:खें ती राधेजवळ मन मोकळीं बोलत असे. सवड मिळेल तेव्हां राधाहि यशोदेच्या कामधंद्याला हातभार लावी. कृष्णजन्मापासून ती यशोदेच्या घरचीच झाली होती. कृष्णाच्या रूपगुणांचें तिला वेडच लागलें होतें.

राधा तरुण होती. इतर गौळणींना हेवा वाटावा अशी तिची रूपसंपदा होती. ती चपल होती तशीच चतुरहि होती. जणूं कांहीं ' संचारिणी पल्लविनी लता ' च. चालूं लागली कीं तिच्या कानांतलीं

कुंडलें डोलत, आणि तिची डोळेमोड कोणाचेंहि मन खेचून घेई. तिचें हास्य प्रसन्न होतें. अन् बोलांना अमृताची चव होती.

एक दिवस यशोदा दधिमंथन करीत असतां राधा तिच्याकडे आली. कृष्णानें अनिवार खोड्या केल्यामुळें तिच्या मंथनाला आज भलताच उशीर झाला होता. राधेनें पाहिलें तों तिला यशोदेची मुद्रा त्रस्त दिसली. तिला कृष्णाचा खूप राग आला होता. राधा आलेली पहातांच तो व्यक्त करायला तिला आयतेंच स्थान मिळालें. कृष्ण जवळच उभा होता त्याच्याकडे रागीट डोळ्यांनीं पहात ती आपला छळवाद राधेला सांगूं लागली.

## ६

करूं देइना मज दूध तूप बाई
मंथिता दधि तो धरि रवी ठायिठायीं
हट्टें हा कदापि नुमजे समजाविल्यास कायी
समजावुनि यातें तुझ्या घरांत नेईनेंई १

राधे हा मुकुंद कडिये उचलोनि घेई घेई
रडतानां राहिना करूं यास गत कायी कायी ध्रु०

हरिसि आनंदें राधा मृदुमृदु बोलवीतें
'पाळण्यांत तुजला कृष्णा निजवोनि हालवीतें
गृहा नेउनियां दहीभात कालवीतें
यशोदेसी सोडीं कान्हा माझ्या जवळी येई येई' २

'हट्ट मोठा घेतो मला छळितो गे राधे पाहाणें
असाच हा नित्य राधे! हरि घरा नेत जाणें
उगाचि हा निश्चळ कैसा राहे त्वां समजाविल्यानें
तुझी धरितें हनुवटी यासि गृहा नेईं नेईं' ३

'गोविंदा, गोपाळा कृष्णा मुकुंदा शेषशायी
जगजीवना गोकुळभूषणा गोपीभुलवणा बाई
उगा नको रडूं कृष्णा यशोदेसी सोडी तूंही'
एका जनार्दनी शरण राधे घेउनि यासी जाई जाई ४

राधेनें एकवार कृष्णाकडे तिरका कटाक्ष टाकून त्याला मृदु शब्दांत हांक मारली. ' श्यामसुंदरा ! '

त्या हांकेसरशीं कृष्णाचे आरक्त ओठ विलग झाले. त्याच्या फुगीर गालावर एक नाजूक खळी चमकली.

" सोड पाहूं रवीचा हात. हं ऽऽ! अस्सं ! किती शहाणा आहे माझा राजा ! चल ये माझ्याकडे. "

काही मुलें आईबापांपेक्षां तिऱ्हाईत माणसालाच धार्जिणीं असतात. परक्याकडे तीं सुतासारखीं सरळ वागतील अन् सांगावें तें करतील. बालमुकुंदहि राधेच्या बाबतींत तसाच होता. तिनें बोलावतांच तो धांवत जाऊन तिच्या मांड्यांना बिलगला. राधेनें त्याला पटकन् उचलून कडेवर घेतलें.

" आईला असा त्रास देऊं नये बरं का ! नाहीं ना देणार माझं छबुकडं ! नाहीं ना ऽऽ? "

राधेच्या या प्रश्नाला उत्तर म्हणून कृष्णाची मान अन् कानांवरचीं झुलपं हाललीं. राधेनें त्यासरशीं प्रेमार्द्र ओठांनीं त्याचा एक पापा घेतला. ती त्याला घेऊन निघाली तेव्हां यशोदा तिला बोलली. ' असाच त्याला रोज घेऊन जात जा बाई ! तुलाच वश आहे तो!' यशोदेचे हे उद्गार ऐकून राधेला आकाश ठेंगणें वाटलें.

या पदांत नाथांनीं राधेच्या प्रेमाची शक्ति केवढी होती तें मोजक्या शब्दांत सांगितलें आहे. राधा ही प्रेमभावनेची ओतीव पुतळी होती आणि प्रेमपरवश परमात्मा तिचा अधिकार स्वतःवर चालवून घेत होता. तिच्या छंदानें नाचत होता. 'प्रेमसूत्रदोरी। नेतो तिकडे जातो हरी.' श्रीरंगाची ही भक्तीची आवड पाहून नाथांच्या हृदयालाहि प्रेमाचा पाझर फुटला आहे अन् शेवटच्या कडव्यांत ' मुकुंदा, जगजीवना, गोपीभुलवणा ', अशा गोड संबोधनांची त्यांनीं कृष्णावर वृष्टि केली आहे.

राधेनें कृष्णाला निजगृहीं आणल्यानंतर पुढें काय प्रकार घडला तें नामदेवाच्या मुखानें ऐका.

१७

मंदिरीं नेउनी पलंगीं बैसवीला म्हणत हरीला तये वेळीं १
ऐशिया समयीं थोर तूं असती तरी हृषीकेशी बरें होतें २
देखोनि भाव तिचा थोर झाला हरी पाहूनि सुंदरा आनंदली ३
सुखशयनीं राधा एकांतीं असतां अनया अवचिता आला तेथें ४
भ्रताराचा शब्द ऐकतां श्रवणीं दचकली मनीं राधिका ते ५
हात जोडोनियां विनवित हरीसी होई हृषीकेशी सान आतां ६
ऐकोनि करुणा बाळ झाला हरी दहिभात झडकरी ठेवी पुढे ७
कवाड उघडून बोलत अनयासी घरांत हृषीकेशी जेवीतसे ८
कावड ठेवुनी घरांत तो आला जेवितां देखिला कृष्णनाथ ९
नामा म्हणे अनया आनंदला मनीं हृदयीं चक्रपाणी धरियेला १०

राधेच्या मंदिरांत त्या वेळीं दोघांवांचून तिसरें कोणीहि नव्हतें. आपल्या मंचकावर कृष्णाला बसवून राधा त्याचें रूप न्याहळीत जवळ उभी होती, एकदम तिला काय वाटलें कोणास ठाऊक, ती कृष्णाला म्हणाली.

" कन्हय्या, तूं मला कित्ती कित्ती आवडतोस रे ! सारखं तुझ्याकडे पाहत रहावंसं वाटतं. तूं या वेळीं मोठा असतास, तरुण असतास तर–"

चित्तचोर श्रीकृष्णाला राधेच्या मनांतला हेतु उमगला. तिच्या अंतरांत खळखळणाऱ्या प्रणयोर्मींचा नाद कृष्णाच्या कानीं आला आणि त्यानें त्या दिवशीं राधेच्या आशा सुफलित करावयाचें ठरवलें.

" राधे, मी मोठा होऊं ? खरंच ? मग डोळे मिट तर माझ्याकडे मोठं होण्याचा एक मंत्र आहे. पहा कशी गम्मत होते ती— ! "

राधेनें डोळे मिटून पुन्हां जेव्हां उघडले तेव्हां तिच्यापुढें एक सर्वांग-सुंदर अशी मदनमूर्ति उभी राहिली. तें यौवन, ती कमनीय अंगकांति, तो रेखीवपणा. राधेचा रूपगर्व क्षणांत वितळून गेला. ती प्रथम विस्मित अन् नंतर लज्जित झाली. कृष्णानें तिला शेजारीं बसवलें. मधुर बोलांनीं तिचें हास्य फुलवलें. प्रणयभावना खुलवल्या. जीवितसाफल्याच्या आणि धुंद आनंदाच्या शिखरावर आपण चढलों आहो असें ज्या क्षणीं राधेला वाटलें त्याच क्षणीं बाहेरून एक हुकमी कर्कश हांक ऐकूं आली.

" राधे दार उघड."

ती हांक अनयाची–तिच्या पतीची होती. त्यासरशीं राधेला कड्यावरून लोटून दिल्यासारखें वाटलें. ती गडबडली, घामाघूम झाली आणि एका क्षणांत तिच्या डोळ्यांत विद्ध हरिणीची कातरता दिसूं लागली.

" कृष्णा, अनर्थ कोसळला. स्वारीची हांक आहे ही! माझी अब्रू जाण्याची वेळ आली. देवा माझीं सगळीं माणसं आतां माझा छळवाद मांडतील रे—!"

कृष्ण म्हणाला. " मी तरी काय करूं आतां!"

" मोठा झालास तसा लहान हो. कडेवर घेऊन मी आणला होता तस्सा!"

" काय सांगूं राधे, तुझ्या संगतिसुखांत दंग झालों अन् मंत्र विसरलों. आता कसा लहान होऊं?"

" करुणावचनें बोले राधा। विनोद नोहे हा गोविंदा। माझी होईल आपदा। जगामाजीं"

गजेंद्राला नक्राच्या मुखांतून सोडवणारा दीननाथ काय राधेची अब्रू उघडी पडूं देईल! 'अणोरणीयान् महतो महीयान्' असा ज्याचा महिमा श्रुतींनीं गायला आहे, त्या सांवळ्या परब्रह्माला लहान मोठें होणें हा नित्याचा खेळ होता.

कृष्ण पुनश्च कोवळा बालक झाल्यावर राधेनें दहिभाताची ताटली त्याच्यापुढें ठेवली आणि एक घास त्याच्या चिमण्या मुखांत घालून सावकाशपणें दार उघडलें. दहिभातानें धवळलेलें कृष्णाचें मुख आणि 'हा काऊचा, हा चिऊचा' असें आंजारीत गोंजारीत राधेचें त्याला भरवणें हें मनोहर दृश्य पाहून अनय खूष झाला. त्यानें कृष्णाला नेहमीं घरीं आणण्याची राधेला परवानगी दिली.

'राधाविलास' या सदराखालीं नामदेवानें जी पदें केली आहेत तीं सर्वच मनोहर आहेत. राधेच्या प्रेमाच्या गोडीनें तीं मधुर झालीं आहेत. नामदेवाच्या वाणीची प्रसन्नता आणि मोकळेपणा मनाला मोह घालतो. स्वभावोक्ति अलंकाराचा नमुना म्हणून त्याच्या कोणत्याही पदाकडे बोट दाखवावें. कृष्णलीलेवरच्या त्याच्या बहुतेक पदांत कांहीं

तरी चमत्कृतीत आढळते; आणि पुनः ती हृदयंगम असते. हळुवार फुंकर घालून भावनांचें अष्टदळ कसें फुलवायचें तें नामदेवाला विचारावें.

जोंवर कृष्ण लहान होता तोंवर त्याच्या खोड्या घरांतल्या घरांतच चालत. एकट्या यशोदेलाच काय त्रास होत असेल तो. पण आतां तो मोठा होऊं लागला होता. आतां त्याच्या बालचेष्टांना सारें गोकुळ अपुरें पडत होतें. तो आतां एकटा नव्हता. त्याच्याबरोबर त्याच्याच वयाचीं कित्येक गवळ्यांचीं पोरेंहि असत. तो त्यांचा म्होरक्या होई. सगळीं मुलें त्याच्या आज्ञेंत वागत. गोकुळच्या या टोंकापासून तों त्या टोंकापर्यंत ही बालसेना धिंगाणा घालीत हिंडे. गोकुळांत असें एक घर उरलें नाहीं कीं जिथें या अवखळ पोरांनीं प्रताप गाजविले नाहींत. कृष्णाच्या खोड्या चमत्कृतिपूर्ण आणि नित्य नव्या असत तो आला म्हणजे काय करील नि कसा छळील त्याची कोणालाच कल्पना येत नसे. तो अंधारांतून लपत छपत जाऊन अर्भकांना भेडसावी. एखाद्या वृध्देला तोंडें वेडीवांकडीं करून वेडावून दाखवी. बायका निजलेल्या असल्या कीं, त्यांच्या मुखचंद्राला काजळ फांसी. कोणाच्या दाढी-वेणीची निरगांठच बांधून ठेवी. नामदेवानें एका अभंगांत, त्यानें एका नाठाळ नखरेबाज गौळणीला कसें चकवलें त्याचें सुंदर वर्णन केलें आहे :

८

मिळवुनी सौंगडे सांगतो तयांसी
चला गोरसासी देतों तुम्हां
गेली असे एक गौळण जळाला
सांगे गोपाळांला तेथें जाऊं
न पुरेचि हात दूध शिंक्यावरी
करावें मुरारी येथें कैसें ?
पाटावरी पाट रची वनमाळा
पाडी तरी डुळी मोहरीनें
बडवोनि टिरी नाचतसे पेंदा
'भली ले गोविंदा युक्ति केली
उदे लाले बेते कलूं नका गल्बला
थांबालीले गोला लोनियाचा'
कोणी पिती दूध कोणी खाती दही
आली लवलाही गौळण ते
'अहर्निशीं धरूं मी जपतसें तुज
जासी कैसा आज चोरटिया !'
मुखींहूनि पय टाकी तिच्या डोळां
नामा म्हणे 'पळा' सांगतसे

गोपाळकृष्ण गोकुळांत जिकडे तिकडे अशी धामधूम उठवून राहिला होता. धरायला जावें तर अलगद निसटे. शोधायला जावें तर दिसे दिसे अन् अदृश्य होई, घरादाराचा कितीही कडेकोट बंदोबस्त केला तरी तो निरुपयोगी ठरे. जी पाठीस लागे तिलाच अधिक छळी, अधिक दमवी. त्याला पकडण्यासाठीं जे जे व्यूह रचले जात ते ते रचणाऱ्यांच्याच अंगावर उलटत. रोज दह्यादुधाचे डेरे फुटत. रोज कृष्णाला गालिप्रदान मिळे. दुधाला विरजण लावतांना प्रत्येक गौळण मनाशीं म्हणे—'नंदाच्या कार्ट्याची संक्रांत इकडे वळली नाहीं तरच उद्यां दही लोणी मथुरेच्या बाजारांत नेतां येईल. नाहींतर तोंडांत माती!'

त्याच्या विचित्र खोड्यांचा आणखी नमुना नामदेवाच्याच मुखानें ऐका :

९

एकदां श्रीकृष्ण खेळत असतां प्रवेशे अवचितां गोपीगृहीं
दोहीं करें तेव्हां नेत्र चोळीतसे गोपी पुसतसे 'काय झालें?'
कृष्ण म्हणे 'माझे दुखताती डोळे उपाय न कळे करूं काय!
पुत्राची जननी तिचें दूध मिळे घालितांची डोळे बरे होती'
गोपी म्हणे 'दूध देतें मी काढून तें नेत्रीं घालून बरे करीं'
देव म्हणे 'तूं दूध काढून देसी कैसा गुण त्यासी येइल सांग?
माझिया करानें पिळूं देसी स्तन तरी येईल गुण लवकरीं'
ऐकतांची गोपी धांवे मारावया पळे उठोनियां नामा म्हणे

एक दिवस पुष्कळशा गोपी मथुरेला चालल्या असतां कृष्णानें अवचितपणें पुढें येऊन त्यांना अडविलें. सर्वांत पुढें असलेल्या गौळणीचा पदर धरून तो उभा राहिला. तिला पुढें जाऊं देईना.

"कृष्णा! दूर हो. असा माझ्या अंगाला झोंबूं नको. तुझे गुण आतां गोकुळांत सर्वांना ठाऊक झाले आहेत. तूं माझ्याशीं सलगी करित होतास हें घरीं कळलं तर मला तोंड दाखवायला जागा उरणार

नाहीं. सोड मला. नाहीं सोडीत? किती रे चावट आहेस तूं!" ती गौळण त्रस्त होऊन म्हणाली.

पण कृष्ण पदर सोडीना. त्या एकीच्यामुळें तिच्या सांगातिणींचेंहि पाऊल पुढें पडेना. मग सर्व गौळणींनीं मिळून त्याची विनवणी आरंभिली.

"श्यामसुंदरा! असा नकोरे आम्हाला अडथळा करूं. आम्ही सासुरवासिनी आहोंत. घरीं जायला उशीर लागला तर सासूसासरे आम्हाला छळतील हें तुला ठाऊक नाहीं का? कन्हय्या! तुझा संग आम्हाला नकोसा का आहे? तुला पाहिलं कीं आमची काया मोहरून जाते अन् जीव वेडा होतो. पण जनरीतीचे पाश आम्हां अबलांना कसे तोडवतील! जा मोहना, आमच्या वाटेंतून दूर जा. बाह्यात्कारीं छळूं नको. अंतरांत वसतीला ये. आम्ही तुला हृदयसंपुष्टांत सांठवून घेऊन लौकिकांत वागूं. तुझ्या नादानं मथुरेला जाऊं अन् वेधानं परत येऊं."

जनरीत आणि प्रेम यांच्या कात्रींत सांपडून दोघांनाहि सांभाळूं पहाणाऱ्या दुबळ्या प्रेमिकांची काय अवस्था होते याचें मार्मिक चित्रण संतांनीं आपल्या अनेक पदांतून केलें आहे. कृष्ण हा ठाईचा ठकडा होता. तो दृश्यपणें तर खोड्या करीच. पण कित्येक वेळां अदृश्यपणेंहि गौळणींच्या घरच्या दह्यादुधाचा फन्ना उडवी. कृष्णाची अघटित करणी; पण आळ यायचा गोपींवर अन् सास्वांचा छळ सोसावा लागायचा त्यांना. नामदेव म्हणतो :

१०

प्रातःकाळीं प्रहरा रात्रीं उठिल्या गौळणी बाळा
घुसळण मांडियलें घरोघरीं सकळां
नित्यानंदें परमानंदें गाती गोपाळा
सहस्रापरी कैशा गाती मदन सांवळा १
घुमघुम करिती घुमघुम करिती डेरे घुमती डेरे घुमती
आनंदल्या गौळणी छंदें छंदें डोलती ॥धृ०॥

| | |
|---|---|
| एक म्हणती साजणी | तुम्ही लपवा गे लोणी |
| न कळे न कळे हो बाई | कृष्णाची करणी |
| कोणीकडून हा गे येईल | सखये चक्रपाणी |
| खास खांदुनि तुम्ही आतां | लपवा दुधाणीं २ |
| बोलतां चालतां इतुक्या- | मध्यें हरी आला |
| कवणेंहि नाहीं देव | दृष्टी देखिला |
| सूक्ष्मरूप धरून | डेऱ्यामध्यें प्रवेशला |
| वरच्यावरी देव लोणी | खाऊनियां गेला ३ |
| उन्हवणी शिळवणी घालिती | पर तें लोणी येईना |
| काय झालें ढोणे | सासूबाई कळेना ४ |
| हा हा गे बायांनो | तुमचे जाणतें चाळे |
| यशोदेच्या मुला नेऊनि | देतसां गो |
| उगेंचि मग पाहतां | आतां फिर गे निराळे |
| मारी ठोसरे दोन्ही | गाल्होरे घेतले ५ |
| डेऱ्यामधुनी मार माझा | जगजीवन पाहे |
| नामा म्हणे धन्य धन्य | वर्णूं मी काये ? ६ |

गोकुळांतली पहाट मोठी संगीतरम्य असे. प्रहर रात्र उरली कीं, गौळणी जाग्या होत अन् दधिमंथनाला प्रारंभ करीत. मुखांतून सहज स्फुरणारीं कृष्णकौतुकाचीं गाणीं, त्यांना रवीच्या 'घुमघुम' अशा स्वराची साथ आणि त्याच्या जोडीला कंकणांचा मंजुळ किणकिणाट अशा थाटांत तें मंथनकर्म चाले. घरोघरीं हेंच मनोहर दर्शन, हेंच मधुर श्रवण. गोकुळांतली प्रभात म्हणजे आशेची, आनंदाची प्रभात. एकादी गौळण चटकन् आठवल्यासारखें करून म्हणे, 'दहि घुसळते आहेस; पण लोण्याला जप बरं! कृष्ण तुझा डोळा चुकवून तें केव्हां मट्ट करील तें तुला कळायचंसुद्धां नाहीं.' दुसरी तिसरीला सांगे, 'दुधाणी सांभाळ ग बाई! खळगा खणून त्यांत लपवून ठेव!'

अशा रीतीनें बिचाऱ्या गौळणी कृष्णाच्या आणि त्याच्या सौंग-ड्यांच्या त्रासानें हैराण होऊन गेल्या. त्याला पकडण्याचे अन शासन

करण्याचे त्यांचे-सारे बेत-हासिळून पडले. सरते शेवटीं त्यांनीं विचार केला कीं आपण यशोदेकडे दाद मागावी आणि तिच्याकडून त्याचें पारिपत्य करावें.

त्या दिवसापासून यशोदेच्या अंगणांत रोज गोपींचा घोळका जमूं लागला. त्यांच्या तक्रारी ऐकणें हा यशोदेला एक नवा उद्योग होऊन बसला. ज्या सुध्याभोळ्या असत त्या भीत भीत सौम्य शब्दांत आपलें गाऱ्हाणें मांडीत. रागीट होत्या त्या खोड्या सांगतां सांगतां कृष्णाला शिव्या देत. अन् उद्धट कांगावखोर होत्या त्या 'पोराला डोक्यावर चढवून ठेवलं आहे' म्हणून यशोदेला टोचून बोलायलाहि कमी करीत नसत.

गौळणींचीं हीं गाऱ्हाणीं सर्वच आपापल्या परीनें मधुर आहेत. जणूं गोपींच्या अंतरांत शिरून तिथल्या भावनांचा कानोसा घेऊनच संतांनीं तीं वर्णिलीं आहेत. विरोधी भक्तीचा तो उत्तम नमुना आहे. गोपींच्या त्राग्यांत, रागांत आणि शिव्यांतसुद्धां अंतर्यामीं मुग्धमधुर कृष्णप्रेमाचा जिवंत झरा झुळझुळत होता. गाऱ्हाणीं सांगतांना गौळणींचीं मुखं कृष्णावर कठोर शब्दांचा वर्षाव करीत होतीं तर त्याच वेळीं त्यांचे आसावलेले नेत्र कृष्णमुख न्याहाळीत होते. 'ओठीं एक पोटीं एक' अशा या गौळणींच्या वर्तनाची कृष्णाला मोठी गंमत वाटे. तो त्यांच्या प्रेमाला भुले तसाच रागाला डोले. भक्तीइतकाच त्यांचा रुसवाहि त्याला लोभनीय वाटे. बाळपणीं पूतनेसारख्या मारकरिणीला आणि उत्तरायुष्यांत कंस, शिशुपाल इत्यादि हाडवैऱ्यांनादेखील आत्मस्वरूपीं मेळवून घेणारा भगवान् गोपींच्या निरागस क्रोधाचा का रोष धरील!

आणि भलतिये जाती जन्मावें मग भाजिजे कां विरोधावें<br>
भक्त कीं वैरिया व्हावें माझियाची

—ज्ञानेश्वर

असा भगवंताचा आदेशच आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# कृष्णाची गाऱ्हाणीं २

आतां या प्रकरणांत गौळणींच्या गाऱ्हाण्यांवर संतांनीं जीं पदें रचलीं आहेत अन् त्यांत राग व्यक्त करण्याच्या ज्या परी दाखविल्या आहेत त्यांची माधुरी चाखायची आहे. प्रथम नामदेव काय सांगतो तें ऐकूं.

क्र. २५७
वा. क्र. ११

गाऱ्हाणें सांगाया आल्या गोकुळींच्या स्त्रिया १
यशोदा ऐकत पळे बाहेरी भगवंत २
एक म्हणे लोणी माझें भक्षी चक्रपाणी ३
फोडितसे भांडें वर्जिलिया म्हणे 'रांडे.' ४
अष्टदळ काढिलें अंगणीं वरी मुते चक्रपाणि ५
घेउनियां आला अग्न 'तुझ्या घरासी लावीन' ६
'देइन मी तोंडावर तुझ्या बापाचें हें घर!' ७
घेतसे वरखडे शिव्या देउनियां रडे ८
देखोनियां गरोदर म्हणे केवढें उदर! ९
सांगती गाऱ्हाणीं नामा म्हणे ऐका कानीं १०

नामदेव केवळ बावळा संत नव्हता. त्याच्या अंगीं व्यावहारिक चोकसपणाहि भरपूर होता. मुलांचे मनोव्यापार आणि त्यांच्या विचित्र चेष्टा त्यानें बारकाईनें निरखल्या आहेत. त्यांचा अभ्यास केला आहे. मुलांची अनुकरणशक्ति दांडगी असते. नवे नवे शब्द मिळवणें आणि त्यांचा वापर करणें हा त्यांचा उद्योग अविरत चालू असतो. या त्यांच्या शब्दसंग्रहांत चांगल्याबरोबरच ग्राम्य शब्द अन् निंद्य वाक्प्रचारहि येऊन बसतात. त्यांतला श्लील-अश्लील भाव त्यांना कळत नाहीं. ऐकणाराच्या मनावर त्यांचा काय परिणाम होईल त्याची त्यांना कल्पनाही नसते. हेतु तर दुष्ट नसतोच नसतो. आईनें मोठ्या हौसेनें

श्रम घेऊन रांगोळी काढावी अन् मुलानें तितक्याच तत्परतेनें ती हातोहात पुसून टाकावी हीं दृश्यें लेकुरवाळ्या घरांत नेहमींच पहायला मिळतात. मोठ्या माणसांना नित्याच्या वाटणाऱ्या कित्येक गोष्टींत मुलांना अद्‌भुत रस सांपडतो. तोडणें, फोडणें, फाडणें यांत त्यांना अनिवार गोडी वाटते. हे सर्व बालमनाचे व्यापार नामदेवानें या पदांत सूचित केले आहेत. आपणच आगळीक करायची अन् आपणच रडून स्वतःच्या निरपराधीपणाचा कांगावा करायचा अशींहि कांही मुलें असतात आणि मुलांना बरोबरीचे प्रतिस्पर्धी समजून त्यांच्याशीं निकरानें भांडणाऱ्या कांहीं बायकाहि आढळतात. नामदेवाच्या सूक्ष्म दृष्टींतून हे स्वभाव विशेषहि सुटलेले नाहींत.

नाथांनीं वर्णिलेले खोड्यांचे प्रकार तर याहून विचित्र आहेत त्यांचीं पुढचीं पदें वाचा म्हणजे कळेल.

१२

गौळणी सांगति गाऱ्हाणीं रात्रीं आला चक्रपाणि
खाउनि दही दूध लोणी फोडिलीं अवघीं विरजणीं
हा गे बाई कोणासि आवरेना १

यशोदे बाळ तुझा तान्हा कोठवरी सोसूं मी धिंगाणा ध्रु०
दुसरी आली धांवत यानें बाई काय केली मात
मुखाशीं मुख चुंबन देत गळ्यामधीं हात घालीत
धरूं जातां सांपडेना २

तिसरी आली धावुनी म्हणे गे बाई काय केली करणी
पतिची दाढी माझी वेणी दोहोंसी गांठ देउनी
गांठ बाई कोणा सुटेना ३

मिळोनि अवघ्या गौळणी येती नंदाच्या अंगणीं
जातों आम्ही गोकुळ सोडुनी आमुच्या सुना घेउनी
हें बाई आम्हांसि पहावेना ४

ऐशीं ऐकतां गाऱ्हाणीं यशोदे-नयनीं आलें पाणी
'कृष्णा! खोड दे टाकुनी' एका जनार्दनीं चरणीं
प्रेम तया आवरेना ५

कन्हय्यांची ही अघटित करणी ऐकतांना यशोदेला आंतल्या आंत सुख होत होतें. तिला आपल्या पाडसाच्या बुद्धिमत्तेचें कौतुक वाटत होतें. पण जेव्हां गौळणी निकरावर आल्या अन् गोकुळ सोडून जाण्याची भाषा बोलूं लागल्या तेव्हां मात्र तिच्या डोळ्यांना पाणी आलें. हर-प्रसंगीं आपल्या उपयोगीं पडणाऱ्या या सांगातिणी, लेकी-सुनांसह गोकुळ सोडून गेल्या तर आपल्याला इथें राहणें किती दुस्सह होईल त्याची जाणीव होऊन ती कृष्णाच्या काकुळती आली.

" मुकुंदा ! नको रे असा लोकांना छळूं. तुझ्यापायीं माझा कसा कोंडमारा होतो ! किती विनवूं तुला—! "

पण कृष्णाची समजूत पटली का ? त्यानें आपलें खोड्या करण्याचें सोडलें का ? मुळींच नाहीं. पुनः दुसऱ्या दिवशींहि प्रकार तोच ! नव्या खोड्या, नवीं गाऱ्हाणीं. ही आणखी एक गौळण काय तक्रार घेऊन आली आहे तें ऐका.

## १३

आवरिं आवरिं आपुला हरी दुबळ्याची केली चोरी
घरा जावयाची उरी कृष्णें ठेविली नाहीं १
गौळणी उतावेळी आली यशोदेजवळी
आवरिं आपुला वनमाळी प्रळय आम्हा दिधला २
कवाड भ्रांतीचें उघडिलें कुलूप मायेचें मोडिलें
शिंकें अविद्येचें तोडिलें बाई तुझिया कृष्णें ३
होती क्रोधाची अर्गळा हळूच काढिलीसे बळां
होती अज्ञानाची खिळा तीहि निर्मूळ केली ४
डेरा फोडिला दंभाचा त्रिगुण तिवइस ठाव कैचा
प्रपंच सडा हा ताकाचा केला तुझिया कृष्णें ५
अहंकार होता टोंबा उपटिला घुसळखांबा
तोहि टाकिला स्वयंभा बाई तुझिया कृष्णें ६
संचित हें शिळें लोणी याची केली धूळधाणी
संकल्प विकल्प दुधाणी तीहि फोडिली कृष्णें ७

प्रारब्ध हें शिळें दहीं माझें खादलें गे बाई
क्रियमाण दूध साई तीहि मुखीं वोतिली ८
द्वेष रांजण सगळे स्पर्शें होती हात काळे
होतें कामाचें तें पाळें तेंहि फोडिलें कृष्णें ९
सुचित दुश्चित घृतघागरी लोभें भरल्या होत्या घरीं
त्याही टाकिल्या बाहेरीं बाई तुझिया कृष्णें १०
कल्पनेच्या उतरंडी याची केली फोडाफोडी
होती आयुष्याची दुरडी तेहि मोडिली कृष्णें ११
पोर रे अवेखळ आमुची संगत धरली या कृष्णाची
मिळणी मिळाली तयांची संसाराची शुद्ध नाहीं १२
अशी वार्ता श्रवणीं पडे मग मी धांवोनी आलें पुढें
होतें द्वैताचें लुगडें तेंहि फिटोनि गेलें १३
आप आपणा विसरलें कृष्ण स्वरूपीं मिळालें
एका जनार्दनी केलें बाअी नवल चोज १४

नाथांनीं वर्णिलेली ही गौळण प्राकृत, रांगडी नाहीं. ती अध्यात्म-रंगानें रंगलेली आहे. किंबहुना भक्ति-प्रेमाचें साजूक सुख लुटण्यासाठीं स्वतः नाथच गौळणीचें रूप घेऊन तिथें गेले आहेत म्हणा ना! तिनें मांडलेलीं गाऱ्हाणींहि लौकिक नसून अध्यात्मपर आहेत. कृष्णानें तिच्या हृन्मंदिरांत प्रवेशून तिथें काय काय घडामोडी केल्या, तिचा संसार उध्वस्त करून तिला कसें मोकळें केलें, अद्वैतांत मिसळलें, तें ती यशोदेला तपशिलवार सांगत आहे :—

" ऐकलंस यशोदेबाअी! तुझ्या कृष्णानं माझं भ्रांतीचं कवाड उघडलं." भ्रांति म्हणजे भलत्या ठिकाणीं सादृश्यानं भलत्याचाच भास होणं. दोरीच्या ठिकाणीं सर्प भासणें. प्रत्येक जीव अशा भ्रांतींत सांपडलेला असतो. हें क्षणभंगुर जगत् त्याला सत्यत्वानें भासतें. तशीच ती माहेश्वरी माया ही मोठी विलक्षण आहे. हिचें अस्तिपक्षीं अथवा नास्तिपक्षीं कसेंच निरूपण करतां येत नाहीं. ' असत्य हे माया म्हणों जात। दिसे। सत्य म्हणतां नसे ज्ञानदृष्टी. ' हिनें आपला पसारा मांडून त्याच्या

आड भगवंताला दडवलें आहे. ईश्वरसाक्षात्कार हवा असेल तर हिचा आधी नाश केला पाहिजे. हिचें स्फुरण आहे तोंवर परतत्त्वाचा अनुभव घडणें नाहीं. जपी, तपी, कर्मी, योगी ही मायानदी तरून जाण्यासाठीं आपापल्या परीनें धडपडत असतात. अनेक अनेक उपाय करतात. पण त्यांचा स्थिति काय होते त्याचें ज्ञानेश्वरमाउलीनें सुंदर वर्णन केलें आहे.

येथ एक नवलावो । जो जो कीजे तरणोपावो
तो तो अपावो । होय तो ऐक ॥

असें म्हणून, या साधनांपैकीं कोण मदमीनाच्या तोंडीं गेले, कोण स्वर्गाच्या कपाटीं शिरकले, कोण विधि-निषेधाच्या फाशांत अडकले तें विस्तारानें सांगून ज्ञानेश्वर म्हणतात—

येथ एकचि लीला तरले । जे सर्व भावें मज भजले,
तयां ऐलीच थडी सरलें । मायाजळ ॥

गौळण म्हणते कीं, अशी ही माया श्रीहरीनें नष्ट केली. तसाच अविवेकी क्रोधहि देशांतरीं घालवून अज्ञानाचें तिमिर दूर केलें. दंभ म्हणजे पोकळ बडेजाव. परमार्थाचें प्रदर्शन मांडून लोकांना चकवणें. कीर्तीसाठीं सुकृताचा डांगोरा पिटणें. त्रिगुणांची तिवई मोडल्यामुळें हा दंभाचा डेरा आपोआपच फुटला.

नारायणानें कृपा केली तर दंभाप्रमाणेंच अहंकाराचा ठोंबाहि गाडला जातो. अहंकार हा नागोजी आहे. ब्रह्मानंदनिधीला वेटाळून तो बस-लेला असतो. परब्रह्मरूप ‘ जुनें ठेवणें ’ मीपणाच्या फुंजामुळेंच हाताला चढत नाहीं. अज्ञानदशेंत यांचें स्वरूप स्थूल असतें तर ज्ञानदशेंतहि हा सूक्ष्मरूपानें वावरतांना दिसतो. मात्र ‘ भाविक विष्णुदासांना ’ याची कधीच बाधा होत नाहीं.

कर्म हें बंधक खरें; पण तें ईश्वरार्पण केल्यामुळें भक्तांना तें बाधक होत नाहीं. फलेच्छा सोडून केल्यामुळें त्यांचें क्रियमाण वांझोटें होतें. ज्ञानाग्नींत संचित जळून जातें. इतकेंच नव्हे; तर फलोन्मुख झालेलें प्रारब्धसुद्धां ते हरिचरणीं समर्पून मोकळे होऊं शकतात. ‘ प्रारब्ध क्रियमाण । भक्तां संचित नाहीं जाण’ असें तुकोबांचें स्पष्ट सांगणें आहे.

' प्रारब्ध हें शिळें दही । माझें खादलें गे बाई ' या कडव्यांत नाथांनींहि तोच स्वानुभव कथन केला आहे.

भक्तांच्या अंतरांतले द्वेषाचे रांजणहि तडातड फुटतात. ' जो सर्व भूतांच्या ठायीं । द्वेषातें नेणेचि कहीं ' असे ते बनतात. काम–क्रोध त्यांनीं ' विठ्ठलीं वाहिलेले ' असतात. त्यांना लोभ फक्त श्रीहरीचाच उरलेला असतो. काम-क्रोधच जिथें उरत नाहींत तिथें मत्सर कुठून रहाणार ? ' कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वरपूजनाचें ' हें तत्त्व त्यांच्या अणुरेणूंत मुरून जातें.

नाथांची ही गौळण वरील आशयाचें आपलें गाऱ्हाणें सांगून झाल्यावर यशोदेला म्हणते कीं,

" बाई ग, एवढंच करून तुझा मुलगा थांबला नाहीं. माझी चंचल स्वभावाची एक कन्या होती. तिलाहि त्यानं आपल्या नादीं लावलं. दोघांची इतकी गट्टी जमली आहे कीं तिला संसाराचं मुळींच भान उरलं नाहीं. मला हें समजलं म्हणून मी तिला त्याच्याकडून परत आणण्यासाठीं धावून पुढें गेलें तों माझं नेसलेलं द्वैताचं लुगडंच गळून पडलं. माझी मलाच भूल पडली. मी जीव कीं शिव तेंहि कळेनासं झालं अन् शेवटीं कृष्णस्वरूपाच्या सागरांत मी मिठाच्या कणासारखी विरघळून गेलें ! "

अशीं हीं गाऱ्हाणीं ऐकून यशोदा त्रासून जाई. आणि मग रागाच्या भरांत कृष्णाचे दोन्ही सुकुमार हात घट्ट पकडून ती त्याला जाब विचारी. कृष्ण बोलांची साखर पेरून तिला आपला शंभर टक्के निरपराधीपणा सिद्ध करून दाखवी. मग तिला वाटे, ' असं सोन्यासारखं, शहाणं पोर लोकांच्या घरीं चोरी कशी करील ? गौळणीच मेल्या कांगावखोर आहेत. '

अशा स्थितींत कोणी खोड्या सांगायला आल्या तर ती त्यांचीच उलट कानउघाडणी करी.

" माझा कन्हय्या आल्यागेल्याला—वाटेच्या वाटसरालासुद्धा आवडतो अन् तुम्हांलाच त्याचा एवढा हेवादावा कां ग बायानों ? रोज रोज गाऱ्हाणीं सांगायला येतां; तुम्हांला लाज तरी कशी वाटत नाहीं ? कृष्ण

तर नेहमी माझा पालव धरून असतो, मग कधी ग आला तो तुमच्या घरीं चोरी करायला ? ' घरीं काय त्या उणें झालें,' म्हणून तो तुमचें दही दूध खाईल? गंगाजळासारखं त्याचं निर्मळ अंतः करण अन् त्याला ' शिनळ ' म्हणायला तुमची जीभ कशी वाहवते ? तुम्हीच फाजील आहांत. तुमच्या लेकीसुनाच ' अलगटा ' आहेत. माझ्या मुलाच्या निरागस चेष्टेंतहि त्यानां पाप दिसतं, तो त्यांच्या विकारांनीं माखलेल्या मनाचा दोष आहे. ज्या भावनेनें पहाल तसा तो तुम्हांला दिसेल. ' भाव तैसा देव. ' जा ! यापुढें माझ्या आंगणांत गाऱ्हाणीं सांगण्यासाठीं येऊं नका. नामदेव हाच यशोदेचा आशय पुढील पदांत खुलवून सांगतो—

१४

बाळ सगुण गुणांचें तान्हें गे
बाळ दिसतें गोजिरवाणें गे
काय सांगतां गाऱ्हाणें गे
गोकुळिंच्या नारी १

श्रीरंग माझा वेडा गे
याला नाहीं दुसरा जोडा गे
तुम्हि याचि संगत सोडा गे
गोकुळिंच्या नारी २

पांच वर्षांचें माझें बाळ गे
अंगणिं माझ्या खेळे गे
कां लटकाच घेतां आळ गे
गोकुळिंच्या नारी ३

सांवळा चिमणा माझा गे
गवळणींत खेळे राजा गे
तुम्ही मोठ्या ढालगजा गे
गोकुळिंच्या नारी ४

तुम्हि खाउन लोण्याचा गोळा गे
आळ घेतां या गोपाळा गे

तुम्ही ठाईंच्या वोढाळा गे
गोकुळिंच्या नारी ५

तुम्हि लपवुन याची गोटी गे
लागतां याचे पाठी गे
ही एवढीच रीत खोटी गे
गोकुळिंच्या नारी ६

तुम्हि लपवुन याचा भंवरा गे
आळ घेतां शारंगधरा गे
तुम्ही बाराघरच्या बारा गे
गोकुळिंच्या नारी ७

हा ब्रह्मा-विर्धीचा जनिता गे
तुम्हि याला धरूं पहातां गे
हा कैसा येइल हाता गे
गोकुळिंच्या नारी ८

नामा म्हणे यशोदेशी गे
हा तुझा हृषीकेशी गे
किती छळितो आम्हासि गे
गोकुळिंच्या नारी ९

यशोदेनें अशा प्रकारें गौळणींना धुडकावून लावलें तरी त्यांचा गाऱ्हाणीं सांगण्याचा दिनक्रम थांबेना. कृष्णाच्या नित्य नव्या खोड्यांनीं त्या खरोखरच बेजार होऊं लागल्या. यशोदा तरी किती दिवस कानाडोळा करील ! शेवटीं तिनें कृष्णाला कोणत्या तरी कामांत गुंतवून ठेवायचें ठरवलें. त्याला आतां पांच वर्षे पुरीं झालीं होतीं. तिनें मनाशीं एक विचार योजून कृष्णाला विचारलें, ‘बाळ, तूं गायी चारायला रानांत जाशील कारे ?’ कृष्णानें तें एकदम कबूल केलें. त्याच्या बालमनाला रानांत जाऊन गायीवासरांबरोबर अनिर्बंध उनाडण्याची ती कल्पना गमतीची वाटली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो लवकर उठला. यशोदेनें त्याला आंघोळ घातली. कढत कढत जेवायला वाढलें. खांद्यावर काळी घोंगडी अन् हातीं

काठी दिली. दह्याभाताची शिदोरी त्याच्या पाठीला बांधली. अन् एकवार प्रेमानें कुरवाळून त्याला गुरांवासरांच्या मागें रानांत पाठवलें. घागऱ्या लावलेली काठी ' खुळखुळ ' वाजवीत कृष्ण वासरांच्या पाठीमागून धावूं लागला. त्याच्य बरोबर त्याचे संवगडीहि निघाले. जिथें कृष्ण तिथें गोपाळ. ते कशी त्याची संगत सोडतील ! दिवसभर रानांत राहायचं, खेळायचं, बागडायचं, थंडी वारा, ऊन पाऊस, ऋतुमानाप्रमाणें अंगावर घ्यायचा अन् संध्याकाळीं दमून भागून घरीं यायचें असा नवा नित्यक्रम सुरू झाला. गोपाळांना तर रानांत जाण्याचा इतका छंद लागला कीं ते सकाळीं कृष्ण उठायच्या आंतच नंदाच्या आंगणांत जमून कृष्णाला हांका मारण्याचा सपाटा सुरू करीत. नामदेव म्हणतो—

## १५

प्रातःकाळीं मुलें येताती सकळ । ऊठ रे गोपाळा म्हणताती १
आळस देऊनि उठे देवराणा । बळिराम गोधना सोडीतसे २
माता देऊनि स्तन काकुळती येत । ' सांभाळा भगवंत वनामध्यें ३
जवळीच खेळा जाउं नका दुरी । संभाळा मुरारी प्राण माझा ४
हातोहातीं उत्पात याजवरी मोठे । मोडतील कांटे सांभाळावें ५
आसनीं शयनीं भोजनीं जतन करा । नामया दातारा केशिराजा ६

या अभंगांत नामदेवानं मातृहृदयांत वास करणाऱ्या मृदु कोमल भावना व्यक्त केल्या आहेत. माउलीच्या हृदयाला उपमा त्याचीच ! मूल कसेंहि असलें तरी माउलीला तें सर्वांगसुंदर वाटतें. सुकुमार वाटतें. ती सुंदरता वा सुकुमारता मुलापेक्षांहि तिच्या हृदयांत अधिक असते तिला वाटतें, आपल्या बाळाला कोणा पाप्याची दृष्ट लागेल. कोणी पाडील, लोटील, कुठें दुखेल, खुपेल. मूल आंगणांत खेळत असलें तरी कीडमुंगी चावेल. एखादा खडा टोपेल म्हणून तिला सारखी धास्ती वाटते. त्याला खेळतानां इजा होऊं नये म्हणून मग ती काय काय करते त्याचें हृदयंगम चित्र स्त्रियांनीं रचलेल्या कांहीं ओव्यांत दिसून येतें.

“ आंगणींचे खडे । मी ग लोटीतें नित्यानीं
माझें रांगे गुडघ्यानीं । तान्हें बाळ
शेजी बाई तूं ग । दाट दाट घाली सडा
माझें बाळ गे रांगतें । रुतेल हो त्याला खडा ”

सामान्य मुलासंबंधीं मातेला जर अेवढी काळजी, तर श्यामसुंदरासारख्या अलौकिक हिऱ्याचें मातृपद जिला परम भाग्यानें लाधलें त्या यशोदामाउलीला कृष्ण रानांत जाऊं लागला असतां काय होत असेल, तिचें आंतडें कसें पिळवटत असेल त्याची कल्पनासुद्धा आपल्याला करतां येणार नाहीं.

कृष्ण असा नित्य वनांत जायला लागल्या दिवसापासून गोकुळांत दिवसभर शुकशुकाट होऊं लागला. म्हाताऱ्या कोताऱ्या गौळणी होत्या त्यांना हायसें वाटलें. आतां त्यांचीं विरजणें चांगलीं घट्ट होऊं लागलीं. शिंकीं तुटणें नि दुधाणीं फुटणें बंद झालें. लोण्याच्या गोळ्यांबद्दल वाटणारी धास्ती संपली. पण, ज्या गौळणी नवयौवना होत्या आणि कृष्णावर जिवेंभावें अनुरक्त होत्या त्यांना मात्र करमेनासें झालें. यशोदेला गाऱ्हाणीं सांगून कृष्णाला रानांत धाडायला आपणच कारणीभूत झालों आणि आपल्या पायावर आपल्याच हातानें धोंडा घालून घेतला याबद्दल त्यांना पश्चात्ताप होऊं लागला. कुठें 'खुट्ट' वाजलें कीं, 'कृष्ण आला' अशा कल्पनेनें त्यांचे डोळे तिकडें वळत आणि ती सांवळी मूर्ति दिसली नाहीं कीं निराशेनें खट्टु होत.

शेवटीं त्यांनीं ठरवलें कीं, सकाळीं वनांत जाण्यापूर्वीं एकदा कृष्णमुख पोटभर पहावें आणि दिवसभर पुरेल इतका आनंद साठवून घ्यावा. त्याप्रमाणें सगळ्या जणी एकमेकींना हाक मारून सूर्योदयापूर्वीं नंदाच्या आंगणांत जमूं लागल्या. नामदेव म्हणतो—

१५

उठोनि प्रातःकाळीं गौळणी बोलती । जाईल श्रीपति वना आतां १
चला जाऊं त्याचें पाहूं गे श्रीमुख । हरेल ही भूक डोळियांची २
तांतडीनें येती नंदाचिया घरा । पाहती उदारा कृष्णराया ३
कुरळे हे केश सुहास्य वदन । आकर्ण नयन शोभताती ४
अरुणोदय प्रभा अधर दिसती । हिरे झळकती दंत तुझे ५
भोंवया व्यंकटा सुंदर नासिक । पाहोनियां सुख फार होय ६
लल्लाटीं शोभत केशराचा टिळा । वर बिंदु रेखिला कस्तूरीचा ७
वैजयंती माळा किरीट कुंडलें । नामयानें केलें लिंबलोण ८

नामदेवानें वर्णन केल्याप्रमाणें सर्वांगसुंदर अशा त्या बालमूर्तीला पहातांना गौळणींची नेत्रपातीं हालत नसत. जणूं तें कमनीय रूप त्या नेत्रांद्वारे पिऊन घेत. आणि कृष्ण दृष्टिपथांतून दूर गेला कीं मग खिन्न अंतःकरणानें घर गांठीत. पण दिवसेंदिवस वियोग असह्य होऊं लागला. दिवस संपतां संपेनासा झाला. शेवटीं त्यांनीं यशोदेकडे जाऊन, 'कृष्णाला वनांत पाठवूं नका हो' म्हणून तिला विनवून पाहिलें. त्यावर यशोदा त्याना म्हणाली. 'आतां कां ग बायानों ? तुम्हीच त्यांच्या कागाळ्या करीत होतां ना ? बरा आहे रानांत जातो तो ? तुमचं दहीं दुध सुरक्षित राहील आतां'.

यशोदेचें हें बोलणें त्यांच्या जिव्हारीं लागे अन् त्यांच्या नेत्रांतून आसवें गळत. यशोदा ऐकत नाहीसें पाहून त्यानीं एक दिवस कृष्णालाच गांठलें आणि आर्जवून म्हटलें. नामदेव सांगतो.

१६

गायी घेवोनियां जासी जेव्हां राना । आमुचिया मना दुःख वाटे १
सुकुमार सांवळीं जैसीं रातोत्पलें । त्याहूनि कोवळे पाय तुझे २
खडे कांटे बहु काठिण तृण मुळें । ठेविसी पाउलें तयांवरी ३
पावतोसि क्लेशा अगा वासुदेवा ! । म्हणोनियां जीवा दुःख वाटे ४
सांगतसों आम्ही नित्य यशोदेसी । धाडूं नको यासी वनामध्यें ५
नामा म्हणे होय सकळांचा उद्धार । म्हणोनि श्रीधर वना जाय ६

रातोत्पलें म्हणजे कमळें. किती सुंदर शब्द ! श्रीज्ञानेश्वरांनीं आपल्या ओव्यांतून अनेकवार खेळवला आहे तो. तिथूनच नामदेवानें उचलला. 'अगा वासुदेवा !' हें संबोधन गोपींच्या हृदयाची आर्तता व्यक्त करतें. त्या म्हणाल्या 'देवा ! नकोरे वनांत जाऊं ! किती कोवळीं तुझीं पावलं ! खडे नाहीं का टोचायचे ? कांटे नाहीं का बोचायचे ? यशोदामाई आमचं ऐकतच नाहीं. तूं सांग तिला कीं 'मी उद्यांपासून गायी चारायला जाणार नाहीं ! सांगशील ना !'

पण कृष्णानेंहि त्यांचें सांगणें मनावर घेतलें नाहीं. त्यांना मग वाटलें कीं, 'यशोदेप्रमाणेंच कृष्णहि निष्ठुरच आहे. आमचं प्रेमच नाहीं त्याला—'

कृष्ण निष्ठुर आहे असें त्या म्हणाल्या तरी त्यांचें त्याच्यावरचें प्रेम मात्र कमी झालें नाहीं. तें अनुदिनीं वाढतच राहिलें. कोणत्याहि वस्तूची किंमत ती आपल्यापासून दूर झाली कीं कळते असें म्हणतात. त्याप्रमाणें कृष्ण दिवसभर दिसेनासा झाल्यानें त्यांना कळून चुकलें कीं आपल्या जीवनांत प्राणांइतकेंच, किंबहुना प्राणाधिक कृष्णाचें महत्त्व आहे. कृष्णाच्या आठवणीनें जेव्हां त्यांचें चित्त घरांत रमेनासें होई तेव्हां त्या दुपारच्या वेळीं त्याच्या भेटीसाठीं यमुनेच्या तीरीं जाऊं लागल्या. तुकोबा म्हणतात—

१७

गायी गोपाळ यमुनेचे तटीं
येती पाणिया मिळोनि जगजेठी
चेंडू चौगुणा खेळति वाळवंटीं
चला चला म्हणती पाहूं दृष्टी वो १
अैशा गोपिका त्या कामातुरा नारी
चित्त विव्हळतें देखावया हरी
मिस पाणियाचें करितील घरीं
बारा सोळा मिळोनि परस्परीं वो २
चिरें चोळिया त्या धुतां विसरती
उर्ध्व लक्ष लागलें कृष्णमूर्ति
कोणा नाठवे कोण कुल याती
झालीं सकळ तटस्थ नेत्रपातीं वो ३
दंतधावनाचा मुखामाजि हात
वाद्यें वाजती नायके जनमात
करी श्रवण कृष्णवेणुगीत
स्वामी तुकयाचा पुरवी मनोरथ वो ४

एक दिवस पाण्याला गेलेल्या एका गौळणीनें बातमी आणली कीं कृष्ण यमुनेच्या तीरीं आला असून त्यानें गोपाळांसमवेत चेंडू फळीचा

खेळ मांडला आहे. ज्यांना ज्यांना ती वार्ता समजली त्यांनी त्यांनी तिकडे जायचें ठरवलें. एक घरांत गेली. अन् ' सासूबाई पाण्याला जातें हं ! म्हणून तिनें घागर उचलली. ' धुवायला जातें हं, नदीवर ' म्हणून दुसरीनें हाताला आलीं तीं चार चिरगुटें खांद्यावर टाकलीं. प्रत्येकीनें असेंच कांहीतरी निमित्त काढलें.

लपंडाव खेळून दुसऱ्याला कसें चकवावें हें प्रेमिकांना कोणी शिकवावें लागत नाहीं. अंतरांत प्रेमाचा उदय झाला कीं, ती कला सहज अवगत होते. दुष्यंताला फिरून एकदां डोळे भरून पहाण्यासाठीं शकुंतलेनें नाहीं कां पायांत दर्भांकुर रुतल्याचें निमित्त करून मैत्रिणींना फसवलें. ' लतावलय, संतापहारक, आमंत्रये त्वां भूयोऽपी परिभोगाय ' असें द्व्यर्थी बोलून दुष्यंताला पुनरागमनाची सूचना देतांना तिनें गौतमिची जी दिशा भूल केली, तें तिचें चातुर्य तर कोणत्याहि रसिकानें वाखाणावें असें होतें. देश-काल कोणताहि असो, प्रेमाची जात अन् रीत इथून तिथून एकच !

' बारा सोळा ' गौळणी एकत्र जमल्या आणि धापा टाकीत नदीवर आल्या. कोणी आपल्या घागरी जळांत बुडवल्या, कोणी आपल्या साड्या चोळ्या धुवूं लागल्या. कोणी ओल्या काष्ठानें दंतधावन आरंभिलें, कोणी स्नानासाठीं कंबरभर पाण्यांत उतरल्या. या सर्व गोष्टी सोंग सजवण्यासाठीं होत्या. त्यांचें सारें लय-लक्ष्य लागलें होतें तें श्यामसुंदराच्या कंदुकक्रीडेकडे. कृष्णाची ती सलील चेंडूफेक, तें तीरासारखें धांवणें, वाऱ्यानें मागें पुढे हालत राहिलेलें तें मस्तकींचें मयूरपिच्छ, ते कपाळावरून खालीं ओघळणारे घर्मबिंदु, ते पवित्रे अन् अंगविक्षेप, चेंडू नेमका लागला कीं टाळ्या वाजवण्यासाठीं एकत्र येणारे ते दोन्ही कोंवळे गोंडस हात—हें कृष्णाचें क्रीडाकौतुक पाहातांना गोपींचें टक लागलें. आणि काया निश्चल झाली. कोणाला वाटावें कीं या सजीव नारी नसून कोरीव लेणींच आहेत.

सणासुदीला घरांत कांही गोड धोड झालें कीं त्यांतला एखादा घांस कृष्णमुखीं घातल्यावांचून तें त्यांना गोड लागत नसे. ज्यांना शक्य असे त्या गौळणी अन्नाच्या दुरड्या भरून घेऊन कृष्ण रानांत जिथें

असेल तिथें त्याला हुडकीत जात. अशाच काही गौळणी एक दिवस कृष्णाला गोड घास भरवून आल्या होत्या आणि तो वृत्तांत शेजारणींना सांगत होत्या. निळोबा म्हणतात,

१८

भाव भक्तीचिया प्रीतीं जेववीला । देउनि ढेंकर वो पूर्णपणें धाला ।
नेणों आनंदाचा प्रवाह लोटला । ऐसिया स्वानंदाचीं वचनें
अनुवादला वो १

म्हणे ' केले ते पावले उपचार । तुम्ही आवडीनें प्रेमाचे प्रकार ।
झाली तृप्ती आतां घ्या वो देतों वर । पुन्हा नातळो हा तुम्हासीं संसार २

तातल्या सोसूनियां विरक्तिच्या ज्वाळा । बरव्या शिजविल्या
समृद्धी सकळा ।
झाला रसास्वाद भोजनीं आगळा । वाढिलीं पंचामृतें जेवतां ते
वेळोवेळां वो ' ३

ऐसें जेवूनियां धाले विश्वंभर । भक्तां उभविला अभयाचा कर ।
काढुनि घालती कंठींचे तुळसी हार । निळया स्वामी गौरविताती
वारंवार वो ४

' भावभक्तीनं आम्ही कृष्णाला जेवूं घातलं. तो पोटभर जेवला. प्रत्येक पदार्थाची चव घेत घेत जेवला. त्याच्या मुद्रेवर समाधान विलसलं. मुखांतून स्वानंदाचे बोल स्रवूं लागले. ' गोपींनो ! तुम्ही प्रेमाच्या ओतीव मूर्ति आहां. प्रेमानंच तुम्हाला इथवर ओढून आणलं. तुम्ही आणलेले सर्वच पदार्थ वैराग्याच्या अग्नीवर शिजवलेले असल्यामुळें मला अतिशय आवडले. तुमचीं पंचामृतं मधुर होतीं अन् ज्या हातानं तुम्ही तीं मला भरवलीत तो हात त्याहून मधुर होता. आज तुम्ही सर्वभोक्त्याला तृप्त केलंत. मला आलेली ढेकर ही विश्वात्म्याची ढेकर आहे असं तुम्ही समजा. या अन्नदानानं प्रसन्न होऊन मी तुम्हांला वर देत आहें. तुम्ही न मागतांच देत आहें. या संसारबंधापासून तुम्ही मुक्त व्हाल ! जन्म–मृत्यूच्या सागरांतून तरून जाल ! "

गोपी सांगतात—' असं म्हणून त्या जगन्मोहनानं गळ्यांतले तुळशीचे हार प्रसाद म्हणून आमच्या गळयांत घातले. कोवळे घवघवीत अन् कृष्णाच्या गळ्यांत रुळून, हृदयावर लोळून आलेले ते हार! त्यांच्या स्पर्शानं आम्हांला बोलून सांगतां येणार नाहीं असं सुख झालं. हृदयाचा दाह शमला. वासना मावळल्या. त्यानं मग आमचं परोपरीनं गौरव केलं. हर्षनिर्भर अंतःकरणानं आम्ही तिथून परत आलों.'

त्या दिवसापासून रोज कोणी ना कोणीतरी कृष्णदर्शनासाठीं रानांत जाऊं लागल्या. कित्येक वेळां दर्शन घडे तर कित्येक वेळां फसगत होई. अशीच एक कृष्णाला रानभर धुंडून निराश झालेली गौळण आपल्या सखीला हृदयींच्या वेदना सांगत आहे. तुकोबा म्हणतात—

१९

आलियें धांवती भेट होईल म्हूण
तंव तें टळली वेळ वो माझा उरला शीण १
आतां काय करूं सांग वो मज भेटेल कैसा
हरिलागीं प्राण फुटे वो थोर लागली आशा २
लाविला उशीर बहुत लाविला ओढा
सांभाळितां सांग असांग दुःख पावल्यें पीडा ३
जळो आतां संसार वो कई शेवट पुरे
तुकयाचा स्वामी गोपाळालागीं जीव झुरे ४

“ श्याममोहनाच्या भेटीसाठीं धांवत धांवत तिथवर गेलें; पण तो आधींच निघून गेल्यामुळें चुकामूक झाली. आतां काय करूं? कसा भेटेल तो मला? प्राण नुसता फुटूं पहातो आहे. केवढी आशा होती मला! वाटलं होतं, त्याला डोळेभर पाहीन. हृदयाशीं कवटाळीन अन् एकांतांत वृक्षाच्या सावलींत त्याच्याशीं चार जीवींचीं हितगुजं बोलेन. पण सगळंच फसलं. संसार हा मेला असाच आहे. सुटेन म्हटलं तरी सुटका होत नाहीं त्याच्यांतून. सकाळपासून निघायचं ठरवलं होतं. म्हणजे वेळेवर पोंचलें असतें. त्यासाठीं सगळीं कामं झटपट उरकलीं होतीं. पण ऐन वेळीं घरच्या माणसांनीं ‘ हें कर तें कर’ म्हणून मला अड-

करून ठेवलं. मन कृष्णाकडे ओढ घेत होतं; पण देह गृहकृत्यांत गुंतून पडला होता. हे मायापाश कधींच तुटायचे नाहींत का? कधी संपायचा हा संसार? वाटतं कीं यांतून मुक्त होऊन कृष्णस्वरूपांत कायमची बुडी घ्यावी. तिथेंच विरघळून जावं!"

कित्येक माणसें फार हळव्या मनाचीं असतात. त्यांचें मन म्हणजे जणूं जुईचें फूल! जरा कुठें झळ लागली कीं पडलेंच मलूल होऊन! ध्यास उत्कट झाला, प्रेमानें पराभक्तीचें स्वरूप धारण केलें कीं मग विरहव्यथाहि अत्यंत तीव्र होतात. त्यामुळें देहालाहि विकलता येते. कृष्णविरहानें तळमळणाऱ्या एका विरहिणीची काय अवस्था होते तें तुकोबा वर्णितात—

२०

नका कांहीं उपचार माझ्या शरीरा
करूं न साहवें मज बहु होतो उबारा
मनोजन्य व्यथा वेध जाला अंतरा
लवकरी आणा नंदाचिया कुमरा १

सखिया येशिया तुम्ही प्राणवल्लभा
निवेदिला भाव आर्तभूत या लोभा
उमटली अंगीं वो सावळी प्रभा
साच हे अवस्था कळे मज माझ्या क्षोभा २

नये कळों नेदावी हे दुजियासी मात
घडावा तयासी उत्कंठा एकांत
एकाएकीं साक्षी येथें आपुलें चित्त
कोण्या काळें होईल नेणों भाग्य उदित ३

स्वाद सीण देहभाव निद्रा खंडन
पडिलें तटस्थ उन्मीलित लोचन
अवघें वोसरून उरले ते चरण
तुका म्हणे दर्शनानें आलें जीवन ४

एक दिवस कांहीं गौळणी एकत्र जमून नाना प्रकारचे खेळ खेळून आपलें मन रिझवीत होत्या. त्यांचे सारे खेळ कृष्णविषयकच असत. कोणी दिडक्या पायावर वृक्षाला ओठंगून उभी राही अन् मुरलीधराच्या वेणुवादनाचं अनुकरण करी. कोणी कृष्णाची चेंडुफेक दाखवी. कोणी तो गोपींची वाट कशी अडवीत असे त्याची नक्कल करी. कोणी 'माझा चेंडु दे' असें कृष्णाच्या ऐटींत उच्चारून एखादीच्या निऱ्या धरी. कोणी नसलेलींच शिंकीं तोडण्याचे हाव भाव करी. असा तो क्रीडेचा उल्हास मांडला असतां एका विरहिणीला कृष्णाची आठवण झाली आणि तो विरहभावनेचा उद्रेक सहन न होऊन ती धरणीवर निश्चेष्ट पडली.

सगळ्या गौळणी घाबरून तिच्या भोंवतीं गोळा झाल्या. एकटी तिच्या अंगाला हात लावून म्हणाली, 'हिला ताप आला आहे; वैद्याला बोलवा.' दुसरी म्हणाली, 'छट्! हिला पिशाचबाधा झाली आहे; पंचाक्षरी आणा.' तिसरी म्हणाली, 'अग भूत नाहीं न् खेत नाही. विंचू चावला असेल हिला. मांत्रिकाला हाक मारा.' अशा सगळ्या जणी सुचेल तो तर्क लढवूं लागल्या. ज्या अनुभवी होत्या त्यांनीं मुकाट्यानें उपचार सुरू केले.

थोड्या वेळानें सावध होऊन तिनें अर्धवट डोळे उघडले. आपल्या मैत्रिणींचीं मुखमंडलें खिन्न झालीं असून त्या आपल्याला परोपरीचे उपचार करीत आहेत, हें पाहून ती क्षीण स्वरांत बोलूं लागली.

"कशाला मला हे उपचार! आंत आग भडकली आहे. बाहेर गार पाण्याचं सिंचन केल्यानं का ती शमेल? हे विंझणवारे त्या आगीलाच उलट साह्य करतात. हे कोमल पल्लव—" असें म्हणून तिनें ते आपल्या हृदयावरून झटक्यासरशी दूर केले. "मी जगावं असं वाटतं का तुम्हाला? मग एक औषध मला आणून द्या. तेंच औषध अन् तोच वैद्य! सांगूं कोणतं तें?"

सर्व गौळणींनीं उत्सुकतेनें आपल्या जिवाचे कान केले.

"कृष्ण! श्यामसुंदर!!" ती म्हणाली.

असें अगदीं अस्सेंच उत्तर शकुंतलेनें आपल्या मैत्रिणींना दिलें

होतें. दुष्यंताच्या विरहव्यथेनें लतामंडपांत अशरण होऊन पडली असतां आपल्या मनांतलें गुपित मैत्रिणींच्या जवळ उघड करून ती म्हणाली होती. "तद्यदि वामनुमतं तदा तथा वर्तेथाम् यथा तस्य राजर्षेरनुकम्पनीया भवामि । अन्यथा सिञ्चत मे तिलोदकम्—"

त्या गोपीचें तें उत्तर ऐकून सगळ्या गौळणी एकदम हंसल्या.

"हंसलांत तुम्ही? जिवाभावाच्या सख्या म्हणून तुमच्याजवळ हृदय उघडलं. अंतरींच्या कळा तुम्हांला निवेदिल्या. माझ्या रोगाचं निदान मला ठाऊक आहे. सयांनो! ती सावळी प्रभा अंगी उमटल्यामुळें माझी अशी दशा झाली आहे——"

तिच्या शब्दांतलें आर्त प्रतीत झाल्यामुळें सगळ्या गौळणी तटस्थ होऊन ऐकत होत्या. ती सारखी बोलत सुटली होती.

"जा कोणी तरी कृष्णाला घेऊन या. असेल तिथून धुंडून आणा. म्हणावं, एक वेडा जीव तुझ्या ध्यासानं कंठांत प्राण घेऊन बसला आहे. अन् हें पहा, कोणाला कळवूं नका हं! शपथ आहे माझ्या गळ्याची. पण कसंहि करून एकवार मला भेट घडवा. मग मी अन् माझा श्याम! तो अन् मी. दूर कुठें तरी जाऊं. हसूं, खेळूं, पळूं, गळ्यांत गळा घालूं, जिथें ना माणूस ना चिट् पांखरूं! दोघांचं एकवटलेलं चित्त हाच एकटा आमच्या प्रणयप्रसंगाचा साक्षीदार——"

तुकोबा म्हणतात, काय सांगू त्या प्रेमिकेची अवस्था! तिचें देहगेहाचें भान हरपलें, तोंडाची चव गेली. गात्रें विकल झालीं. झोप उडाली अन् डोळे ताटकळले. सगळ्या चित्तवृत्ति स्तंभित झाल्या. फक्त जीवन तेवढें शिल्लक उरलें. अन् तेंहि केवळ कृष्णदर्शनासाठींच!

विरह हा मोठा चमत्कारिक रोग आहे. तो मनांत उत्पन्न होतो अन् देहाची कळा पालटून टाकतो. प्रिय व्यक्तीशीं प्रत्यक्ष भेटींत जेवढी तन्मयता होणार नाहीं तेवढी विरहांत होते. विरही व्यक्तीच्या बाबतींत जगांतल्या सगळ्याच पदार्थांचे स्वभावधर्म अव्यवस्थित होतात. गोड पदार्थ कडू लागतात. चांदणें चटके देतें. इष्टमित्र शत्रूसारखे भासतात. घर म्हणजे रान वाटतें, थंडींत घाम येतो अन् उन्हांत कांपरें भरतें. विरह म्हणजे

शोकाचा धाकटा भाऊच तो! तुकोबांनीं वरील पदांत त्यांचें स्वरूप थोडक्यांत पण चांगल्या रीतीनें दाखवलें आहे.

पुष्कळ वेळां असें होतें कीं एखाद्या व्यक्तीचा ध्यास घ्यावा, तिच्या-साठीं प्राण पणाला लावावा तेव्हां ती सात ठावांत सांपडत नाहीं. आणि तिची आशा सोडली कीं एखादे वेळीं अवचित समोर उभी रहाते. असें झालें कीं न कळत मग तिच्याबद्दल मनांत विरोधी भाव उत्पन्न होतात. ती हवी असूनहि नकोशी वाटते. तिच्याशीं तुटकपणानें वागा-वेंसें वाटतें.

गोकुळांतल्या एका गौळणीची अशीच तऱ्हा झाली होती. तिला बरेच दिवस कृष्ण भेटला नव्हता. आशा-निराशेचे झोल घेऊन बिचारी रंजीस आली होती. आणि अशा स्थितींत यमुनेच्या तीरीं एक दिवस कृष्ण तिला भेटला अन् तिच्याशीं लगट करूं लागला तेव्हां ती मान-वती त्याला काय म्हणाली तें तुकोबाराय सांगतात—

## २१

हरि तुझी कांति रे सांवळी मी रे गोरटी चांफेकळी
तुझ्या दर्शनें होईन काळी मग हे वाळी जन मज ॥ १
उगला राहे न करीं चाळा तुज किती सांगों रे गोवळा
तुझा खडबड कांबळा अरे नंदबाळा अलगटा ॥ २
तुझिये अंगीं घुरट घाणी बहु खासी दुध तूप लोणी
घरिंचें बाहेरी आणोनी मी रे! चांदणी सुकुमार ॥ ३
मज ते हासतील जन धिक्कारिती मज देखोन
अंगींचें तुझें देखोनि लक्षण मग विटंबना होईल रे! ॥ ४
तुज लाज भय शंका नाहीं मज तंव सज्जन पिशुन व्याही
आणिक मात बोलू कांहीं कसी भीड नाहीं तुज माझी! ॥ ५
वचन मोडी नेदी हात कळलें न साहेची मात
तुकया स्वामी गोपीनाथ जीवन्मुक्त करुनी भोगी ॥ ६

“कृष्णा! दूर हो, जवळ येऊं नको माझ्या! किती काळा ढोण आहेस तूं! तुझ्या स्पर्शानं नव्हे; नुसत्या दृष्टीनं देखील माझ्या चांपे-

गौर कायेवर काळी छटा उमटेल. मग सोबतीच्या गौळणी ‘ कालुंद्री ’ म्हणून हिणवतील मला. हें काय रे? असा झटतोस काय माझ्या अंगाशीं ! तुझी ती खरखरीत कांबळ माझ्या कोवळ्या तनूला टोंचते आहे. शीः! तुझ्या अंगाला किती घुरट घाण येते ही ! नाक दाबून धरावंसं वाटतं. दूध चोरून खायचं अन् अंगाला हात पुसायचे. ओंगळ कुठला ! मी किती स्वच्छ आहें बघ. जशी काहीं चटकचांदणी. तुझ्यासारख्या अवलक्षणी पोराबरोबर मी हिंडूं फिरूं लागलें तर सगळीं माझी छीः थूः करतील. तुझ्यासारखं निर्लज्ज होऊन मला कसं चालेल ? तुला ना आगा न पिछा ! माझं सासर थळी कुळीचं अन् माहेर कुलवंताचं आहे. छेः छेः नकोरे बाबा मला तुझा संग......”

हें बोलत असतांना तिनें जीं नाकें मुरडलीं अन् जे अभिनय दाखवले ते पाहून कृष्णाला वाटलें कीं, हें प्रकरण अशातशानें बधणारें नाहीं. मग श्रीकृष्णानें तिला आपल्या ईश्वरी सामर्थ्याच्या प्रेरणेनें देहातीत केलें आणि......

वरील पदाचा हा साधा सरळ अर्थ झाला. पण यांतच दुसरा एक गूढार्थ खुबीनं खेळवला असून तो वेदांतपर आहे. कृष्णाला झिडकारणारी ती मानवती गौळण म्हणजे देहात्मबुद्धि. ती अहंकारानें सदा फुगलेली असते. भ्रांतीच्या गिरक्या घेण्यांतच तिला आनंद वाटतो. परमात्मभावनेचा वासवारासुद्धां तिला आवडत नाहीं, परमात्मा जवळ असतो, हृदयांत वास करतो; पण ती त्याला धुतकारून विषयपंकांत रुतून बसण्यांतच सुख मानते.

कां कमलकंदा आणि दर्दुरीं नांदणूक एकेची घरीं
परी परागु सेविजे भ्रमरीं येरां चिखलुची उरे

—ज्ञाने. अ. ९

पण असें असलें तरी एखाद्या जीवाचें पूर्व सुकृत बळकट असलें तर श्रीहरि आपण होऊन त्याला स्वतःकडे आकर्षून घेतो. त्याचे माया ममतेचे पाश तोडून टाकतो. आणि त्याला स्वानंदाच्या डोहांत बुडवून ठेवतो.

मनांत ज्याच्या ध्यास असतो त्याचेंच नाम जिभेवर नाचूं लागतें. इतर सगळ्या नांवांचा जणूं विसरच पडतो. मथुरेंत गोरस विकायला गेलेली एक गौळण अशा कृष्णध्यासानें कशी हास्यास्पद झाली तें नाथ सांगतात :

२२

दुडीवर दुडी गौळण सांते निघाली
गौळण गोरस म्हणों विसरली १
गोविंदु घ्या कुणि दामोदरु घ्या गे
तंव तंव हांसति मथुरेच्या गे २
दुडिया माझारी कान्होबा झाला भारी
उचंबळे गोरस सांडे बाहेरी ३
एका जनार्दनी सबलस गौळणी
ब्रह्मानंदु न समाये मनीं ४

दह्या लोण्याचीं मडकीं एकावर एक अशीं डोक्यावर घेऊन एक गौळण मथुरेच्या बाजारांतून चालली होती. आणि 'घ्या ऽऽ कोणी दही ऽऽ लोणी ऽऽ य्' असें पुकारायच्या ऐवजीं 'कोणी कृष्ण घ्या, कोणी दामोदर घ्या ऽऽ' असें म्हणत होती. आया बाया तिला हंसत अन् चमत्कारिक नजरेनें तिच्याकडे पहात. गोपीला वाटे, 'अशीं काय हंसतात हीं माणसं ! यांना काय वेडबिड लागलं आहे कीं काय !' अन जरा क्षणकाऱ्यांतच ती पुनः पुकारी, 'घ्या कोणी कृष्ण कन्हैय्या ऽऽ!' तिच्या भांड्यांतून दही डचमळून खालीं सांडत होतें. जणूं तिच्या हृदयांत तसाच तिच्या मडक्यांतहि विश्वात्मा श्रीहरि भरून ओसंडत होता.

श्रीकृष्ण हा सामान्य बालक नसून तो भगवंताचा अवतार आहे हें नंदाला गर्गाचार्यांच्या मुखानें समजलें होतें. मृत्तिकाभक्षण प्रसंगीं यशोदेला त्यानें उघडलेल्या मुखांत विश्वरूप दाखवलें हा त्या गोष्टीला पुरावा मिळाला होता. पूतना, तृणावर्त इत्यादि दुर्जनांच्या वधाचें अचाट कर्म याच गोष्टीची साक्ष देत होतें. गोपीहि आतां भगवद्भावनेनेंच त्याच्याकडे पहात होत्या. भगवंताची बालमूर्ति म्हणूनच त्या कृष्णावर दिवसें

दिवस अधिक प्रेम धरूं लागल्या होत्या. असा हा लीलालाघवी चक्रपाणि, इतर सामान्य मुलांसारखा हंसतो, बागडतो, खोड्या करतो, हट्ट धरतो, याचें त्यांना मोठें नवल वाटे. अन् सर्वांत त्यांना कौतुक वाटे तें कृष्ण विश्वाचा मायबाप असूनहि यशोदेला ' आई ' म्हणतो त्याचें. एक गौळण याबद्दल आपल्या सखीला सांगते :

२३

ऐक ऐक सखये बाई नवल मी सांगूं काई
त्रैलोक्याचा धनी तो हा यशोदेसी म्हणतो 'आई' १
देवकीनें वाहिला यशोदेनें पाळिला
पांडवांचा बंदिजन होउनियां राहिला २
ब्रह्मांडाचा सांठवण योगियांचें निजधन
चोरी केली म्हणवुन उखळासी बंधन ३
सकळ तीर्थें जया चरणीं सुलभ हा शूळपाणि
राधिकेसी म्हणे, ' तुझी करीन वेणीफणी ' ४

हा ब्रह्मांडाचा धनी आहे. यानं बोलवलं तरच वेदांना वाचा फुटते. याच्याकडून प्रकाश मिळवूनच सूर्य जगांतला अंधार दूर करतो. महाकाल विश्वाची आटणी करायला उठतो तो याच्याच सत्तेनें.

पर्वतीं बैसका न संडावी समुद्रीं रेखा नोलांडावी
पृथ्वीया भूतें वहावीं ही आज्ञा माझी

असें भगवान् स्वमुखानें अर्जुनाला सांगतो.

याला आया दोन. नवमास उदरीं वाहूनहि वात्सल्यसुखाला पारखी झालेली देवकी अन् जन्म न देतांहि या अलौकिक बाळाचें कौतुक भोगणारी यशोदा. याचें सगळेंच विलक्षण. हा ब्रह्मांडाची सांठवण आहे. जेव्हां नामरूपें लोपतात, वर्ण-व्यक्ति आटतात, अशा महाप्रलयाच्या वेळीं विश्वाचे वासनासंस्कार, पुनश्च सृष्टीची रचना होण्यासाठीं बीजरूपानें याच्या ठिकाणींच एकत्र होऊन राहातात. आणि अशा या विश्वभर्त्याला चोरी केली म्हणून यशोदा उखळाला बांधून ठेवते.

योगिजन अष्टांगांची खडतर साधना करून शरीराचीं लांकडें करतात तें समाधीमध्यें याचा साक्षात्कार व्हावा म्हणून. योगिराणा शंकर तर याच्याच प्राप्तीसाठीं हिमगिरीच्या धवल शिखरावर दिगंबर होऊन बसला आहे. सकल तीर्थांची जननी गंगामाता याच्याच चरणापासून निघाली आणि असा हा विश्ववंद्य परमात्मा राधेला म्हणतो कीं 'बैस माझ्यापुढें. मी तुझी छानदार वेणीफणी करतों.'

आपल्या प्रिय भक्ताचें कसलेंहि हलकेंसलकेंसुद्धां काम करायला देव लाजत नाहीं. त्याला त्याची मोठी आवड त्याला वाटतें कीं भक्त आपले सुख सोहळे करतात तसें आपणहि भक्तांचें सगळें करावें. देवानें आपली परिचर्या करावी हा गोड अनुभव एकट्या राधेचाच नाहीं. नामयाची जनीहि तेंच सांगते.

"मी न्हायला बसलें कीं, विठ्ठल कढत पाण्यांत विसाण घालायला पुढें येतो. धुणीं घेऊन चंद्रभागेवर गेलें कीं चारी हातांनीं तीं भराभर धुवून काढतो. गोवऱ्या वेंचायला रानांत गेलें कीं पाठोपाठ पीतांबराचे ओचे खोवून श्रीहरि हजरच. कितीदां तरी त्यानं माझी सुरेख वेणी घातली आहे अन् पाठ चोळली आहे. रखुमाईनं विचारलं तर तिला सांगतो कीं 'माझ्या जनीला कोणी नाहीं म्हणून मी हें सारं करतों.' मी नामदेवाची चाकर अन् देव माझा चाकर. मी दळायला जातं मांडलं कीं देव मला शेव लावायला हटकन यायचा. एकदां तर असं झालं कीं ज्ञानेश्वरादि संत मंडळी पहाटेच्या काकडा आरतीला राऊळांत जमा झाली अन् पहातात तों देव कुठें आहे देवळांत!"

| | | |
|---|---|---|
| काकड आरती | करावया कमळापति | १ |
| भक्त मिळाले सकळ | रितें देखिलें देऊळ | २ |
| ज्ञानेश्वर बोले | आतां देव कोठें गेलें | ३ |
| ठावें जाहलें अंतरीं | देव दळी जनीघरीं | ४ |

असो. नाथ म्हणतात कीं, भक्तांचा कैवल्यदानी भगवान् गोकुळांत अवतरून तिथल्या गाई वासरांना, गोपगोपींना आणि बालकांना 'आपुले पणीं' मिळवून घेत आहे.

ज्या ज्या गौळणींना इच्छिल्या वेळीं भगवद्दर्शन घडे त्या मग कृतार्थतेनें आपलें भाग्य सोबतिणींना वर्णून सांगत. निळोबांची ही गौळण काय सांगते ऐका.

२४

शुकादिकांचिये हृदयींचें ध्यान
आम्हा जोडलें वो न करितां साधन
सहज पाचारितां येतसें धांवोन
प्रेमें आलिंगितां निवे तनुमनव वो १

ऐशा गौळणी आनंदभरिता
दृष्टी अवलोकुनी मदनाचिया ताता
म्हणती धन्य भाग्य आमुचें वो आतां
लाधलों जन्म झाली कृतार्थकृत्यता वो २

नित्य हरिचिया समागमें बाई
नाहीं देखिजे तें सुख भोगूं देहीं
प्रारब्ध संचित क्रियामाण तेंही
गेलें हारपोनियां ठायींचें ठायीं वो. ३

येतां जातां नेणो काळाचा अडदरा
देखतां सन्मुख तो पळतसे माघारा
रंग श्रीरंगाचा उमटला शरीरा
तेणें वाहातात जन्म दुःख जरा वो ४

हरिचे सन्निधि वो सहवासें वर्ततां
यासी बोलतां चालतां कृष्ण खेळतां
अंगीं ऐश्वर्याची दृढावली सत्ता
तेणें अजरामर झालों असों निभ्रांता वो ५

ऐशा कृष्णरूपीं रूपसा बाळा
होउनी स्तविती पूजिती वेळोवेळां
कडिये खांदिये घेऊनि घननीळा
निळया स्वामीतें अवलोकिती डोळां वो ६

"काय सांगूं सख्यानो आमचं भाग्य! शुकसनकादिकांना केवळ ध्यानगम्य असा हा गोविंद कोणतंहि साधन न करतां हांकेसरशीं आमच्यासमोर धांवून आला. प्रेमभरानं आम्ही त्याला हृदयाशीं कवटाळलं आणि त्याच क्षणीं आमच्या आधिव्याधि हरल्या. त्या मदनाच्या पित्याला पाहून जीवन कृतकृत्य झालं. नित्य हरीचा समागम. नित्य आनंदाची दिवाळी. मागच्या अनंत जन्मांत जें सुख दुरूनहि पहायला मिळालं नव्हतं तें या जन्मांत देहीं, डोळीं आम्ही पोटभर उपभोगतों आहों. कृष्णस्पर्शानं आमचीं त्रिविध कर्मं निर्बीज होऊन गेलीं आहेत.

सगळ्या जगांत काळ थैमान घालीत आहे. जें सपाट्यांत सांपडेल त्याचा चुराडा करीत तो चालला आहे. पण आम्ही मात्र त्याच्या माथीं पाय दिला. आम्हाला घाबरून तो पळत सुटतो. श्रीरंगाचा रंग आमच्या अंगीं उमटल्यामुळें देहाभिमान गळून पडला आहे देहात्मबुद्धीच्या घळींतच काळरूपी वाघ दडून बसलेला असतो. तिथें जो जाईल तो त्याच्या भक्ष्यस्थानीं पडतो. सगळे तापत्रय देहबुद्धीच्याच पाठीशीं लागलेले असतात. आम्ही आमचा देहाभिमान कृष्णरूप करून टाकल्यामुळें दुःखातीत झालों आहों, अथवा आमचीं दुःखं कृष्ण परमात्म्यानंच आपल्याकडे घेतलीं आहेत. त्याच्या सान्निध्यांत राहून, त्याच्याशीं बोलून चालून, हंसून खेळून, आम्ही सर्वभावें श्रीहरीच्याच झालों आहों. सर्व कर्म कृष्णार्पण केल्यानें त्याची सत्ता आम्हांला लाधली आहे अन् आमची चिंतवणी त्याला पडली आहे. आतां आम्हाला जन्म–मरणाचं भय उरलं नाहीं.

तें उगाणिलें मज कर्म तेव्हांचि पुसिलें जन्ममरण
जन्मासवें श्रम वरच्छिलहि गेले

——ज्ञाने. अ० ९|४०४

निळोबा म्हणतात— कशा सुंदर गौळणी अन् कसा मधुर त्यांचा प्रेमभाव! त्यांचं तें घननीळाला कडेखांद्यावर घेऊन खेळणं, ती पूजा, तें स्तवन, तें मुग्ध विलोकन, सगळंच कसं भावभक्तिमय!

गंगा, यमुना, कृष्णा, गोदा, इत्यादि सरिता पुण्यजला आहेत. त्यांच्या स्नानानें सकल पातकांचें क्षालन होतें. पण त्या एकमेकींपासून किती दूर ! एक दक्षिणेला तर दुसरी उत्तरेला. प्रत्येकीची भेट घ्यायची म्हणजे कोण कष्ट नि यातायात ! ती यातायात झेपत नसली तर समुद्राकडे जावें. कारण त्या सगळ्या शेवटीं सागराच्या विशाल उदरांत एकत्रित होतात. जीवाच्या आत्मप्राप्तीसाठीं अशींच अनेक साधनें शास्त्रांनीं सांगितलीं आहेत. जप, तप, कर्म, याग, योग असे त्यांचे विविध प्रकार आहेत. हीं सगळीं अनासक्त चित्तानें आचरलीं तर तीं चित्तशुद्धीच्या द्वारा आत्मज्ञानाला साधनीभूत होतात. पण त्यांचे कष्टहि तसेच आहेत. सगळ्यांनाच ते सोसत नाहींत. सगळेच त्या अधिकाराचेहि नसतात. त्यांनीं काय करावें ? त्यांच्या उद्धाराची वाट काय ? त्यांच्यासाठींच हा भक्तिमार्ग आहे. बाळ्याभोळ्यांनीं या मार्गानें परमात्मरूपी सागराकडेच धांव घ्यावी आणि सकल साधनांचें फळ एकदम हस्तगत करावें. हाच आशय निळोबा एका गौळणीच्या मुखानें सांगतात—

२५

यासी पाहतां वो हृदयस्थ पाहिला
यासी बोलतां वो वेदुचि घोकला
यासी खेळतां कुसंग दोष गेला ध्रु०

ऐसा निजानंद परमात्मा श्रीहरि
आम्हां लाधला वो भाग्याच्या संसारीं
नित्य आलिंगूं या हृदयामाझारी
ऐशा निजबोधें निवाल्या सुंदरी वो १

यासी विचारितां परमार्थ हातीं लागे
यासी विवरितां ये सिद्धांत वोळंगे
यासी विनटतां समाधि पायां लागे
यासी विनवितां हाचि वरी आंगें वो २

यासी करूं जातां सहजहि गोठी
स्वार्थ परमार्थ पुरुषार्थ लागे पाठीं
यासी जीवीं ध्यातां यासीचि पडे मिठी
यासी गीतीं गातां ब्रह्मांड पडे पोटीं वो ३

यासि करूनि पुढें विचरों जनीं वनीं
यासि घेऊनि संगें बैसों वो भोजनीं
यासि निजवूनि निजों निज शयनीं
यांचें संगसुख घेऊं अनुदिनीं वो ४

निळा म्हणे निजाश्रमींचि सकळा
ऐशा आरजा गौळणी त्या बाळा
ध्यानीं मनीं जिवीं ध्यातां या गोपाळा
गेल्या विसरोनियां संसार सोहळा वो ५

अशा प्रकारें गौळणी अहोरात्र त्याचें प्रेमसुख लुटीत होत्या. ' घ्या घ्या ' म्हणून तो त्यांना देत होता. दिवसभर घरकामांत गुंतून पडलेल्या त्या गौळणी अनिर्बंध प्रेमाचा सुकाळ भोगण्यासाठीं चांदण्या रात्रीं कृष्णाला घेऊन यमुनेच्या वाळवंटांत जात. सगळ्याजणी नटून सजून आलेल्या असत. सगळ्यांच्या साज शृंगारांत मनोहर रंगसंगति असे. जी गोरीपान असे ती शुभ्र साडी परिधान करी. जशी गगनांतली चांदणी. केतकी गौर वर्ण असलेली ' पिवळा पितांबर ' नेसून वर बुट्टयांची चोळी घाली. कोवळं वय अन् सडपातळ काया, यामुळें ती चांफेकळीसारखी दिसे. काळी सांवळी गौळण चंद्रकळाच नेशी अन् वर डोळ्यांत काजळ घाली. तांबूस गोरी असलेली गौळण कपाळीं लाल कुंकवाची चिरी लावी, भांगांत गुलाल भरी आणि मुखांत विडा रंगवी. कोणाला वाटावं कीं ही रमणी नसून डाळिंबीचं फूलच आहे. एखादी सगळाच हिरवा साज चढवी. हिरवी साडी हिरवीच चोळी अन् हातांतलीं कांकणंहि हिरवींच. जशी काही फोफावलेली हिरवीगार वेलच.

आणि अशा या प्रमदांच्या घोळक्यांत उभा असलेला मोहन कसा दिसे ? निळ्या अंगावर चंदनाची उटी. कटीला पीतांबर. गळ्यांत घवघवीत वनमाला. मागें पुढें मान वळवतांना हालणारीं डोलणारीं मणिकुंडलें आणि मुखावर सौम्यपणें झळकणारें मंदमधुर स्मित !

मंद्र गंभीर ध्वनीनें वाहणारी काळी यमुना. वर धवल चंद्रिकेची बरसात. सभोंवतीं शरदऋतु नटलेला. किंचितसें पडणारें दंव. वायुलहरींनी खेळवलेला वन्य पुष्पांचा उन्मादक मिश्र सुगंध. निस्तब्ध आसमंत. वरती चंद्रप्रकाशानें झांकुळलेल्या तारकांची निस्तेज लुकलुक अन् पायांखाली पांढुरकें वाळवंट. अशा त्या पार्श्वभूमीवर उभी असलेली ती विश्वमोहनाची मूर्ति पाहिल्यावर गोपवधूंच्या सर्वांगीं सळसळ उठे.

जशा गोपी तशींच तीं गौळ्यांचीं पोरें. ते कृष्णाचे सौंगडी. रानांवनांत ते त्याच्या समागमें असत. वैकुंठींच्या जनांनाहि ज्याचा समागम दुर्लभ, योग्यांनाहि ज्याचें दर्शन अप्राप्य, असा हा श्रीहरि गवळ्यांच्या पोरांचा खेळगडी झाला होता. त्यानें गोपालांना आपलें चित्त समर्पिलें होतें. तो गोपाळांच्या मेळ्यांत गाई वासरें चारीत होता. मुरली वाजवून त्यांना रंजवीत होता. त्यांना आपल्या पाठीवर वाहून नेत होता. आपण त्यांच्या पाठीवर बसत होता. त्यांच्या भाग्याला शतशः धन्यवाद ! हरिप्रेमाचें आणि संगतीचें त्यांनीं अमूप सुख लुटलें. ते त्याच्या कानांत आपलीं गुजें गुपितें बोलले आणि श्रीकृष्णानें त्यांचें सर्वतोपरी आर्त पुरविलें. त्या पोरांतलाच एक, म्हणून तो त्यांच्यांत वावरला. आपला देवपणा विसरून तोहि एक गवळ्यांचा काळी कांबळीवाला पोर बनला. तुकोबाराय म्हणतात :—

२६

तुका म्हणे सुख घेतलें गोपाळीं
नाचती कांबळी करूनि ध्वजा १
करूनियां टिरी आपुल्या मांदळ
वाजविती टाळ दगडाचे २
दगडाचे कोण टाळ त्यांचा नाद
गीत गातां छंद ताल नाहीं ३
ताल नाहीं गातां नाचतां गोपाळां
घननीळ सांवळा तयांमध्यें ४
मध्यें जया हरि तें सुख आगळें
देहभाव काळें नाहीं तया ५

तयांसी आळंगी आपुलिया करीं
जाती भूमीवरी लोटांगणीं ६
निजभाव देखे जयांचिये अंगीं
तुका म्हणे संगीं क्रीडे तयां ७

डोळ्यांना वेध लावील असें सुंदर अन् समृद्ध तें वृंदावन. सगळे वृक्ष फळांनीं ओथंबलेले सगळ्या वेली फुलांनीं बहरलेल्या. सगळे कुंज सुगंधानें दरवळलेले. जमिनीवर हिरवें हिरवें गवत वाढलेलें. एकदां माळावर नेऊन गायी सोडल्या कीं त्या संथपणें चरत. मग कृष्णासह सगळे गोपबालक एखाद्या मोठ्या वृक्षाखालीं जमत. कोणी झाडावर चढून माकडचेष्टा करीत. कोणी फांद्यांना वळंघत. कोणी धपाधप उड्या मारीत. कृष्ण मग एखाद्या शिलाखंडावर बसून कमरेच्या शेल्यांत खोंचून ठेवलेली मुरली काढून ती वाजवूं लागे. तिचा स्वर कानीं पडतांच पोरांच्या चेष्टा एकदम थांबत. ते कृष्णाभोंवतीं गोळा होत. त्या वेणु-संगिताला सगळे मग साथ करीत. कोणी तोंडानें सूर धरी. कोणी दोन दगड उचलून त्यांचा टाळ वाजवीत. कोणी आपल्या टिऱ्या मांड्या बडवीत. कोणी हातांतल्या काठीवर कांबळीच्या घड्या ठेवून त्यांचा ध्वज करून नाचूं लागत. त्या टाळांना नाद नव्हता अन् त्या नृत्याला ताल नव्हता. अंतरांत उचंबळलेल्या हर्षाच्या उद्रेकांत जसें घडेल तसें हें सर्व चालें. घननीळ सांवळा त्यांच्यामध्यें खेळत होता आणि ते देहभाव विसरून तें आगळें सुख भोगीत होते. कृष्णाला त्यांच्या अंतरांतला भोळा पण असीम भाव कळत होता आणि तो त्यांना मिठ्या मारीत होता. नाथ सांगतात:—

२७

बैसविती हरी वस्त्रघडी वरी
पूजा करिती बरी पुष्पपत्रें १
धाऊनि गळां पालेमाळा त्या वाहती
गजरें नाचती पुढें एक २
टिरिया मांडिया वाजविती पाय
हर्षें नाचताहे देवराय ३

ऐसे नित्यानित्य क्रीडा ते करिती
देव ते पाहती विमानीं तें ४

म्हणताती देव वंचलों या सुखा
एका जनार्दनीं देखा गोवियेलें ५

श्यामसुंदर गोपाळांचा जीवप्राण होता. ते त्याला इरतऱ्हांनीं सजवीत. त्यांतल्या त्यांत बरी असलेली घोंगळ अन् तिच्यावर एखाद्याचें स्वच्छसें मुंडाशाचें फडकें अंथरून कृष्णाला आसन तयार करीत. कोणीतरी मग त्याला हात धरून त्या आसनावर आणून बसवी. कोणी फुलांच्या तर कोणी नवपल्लवांच्या माळा गुंफून त्याच्या गळ्यांत घालीत. कोणी एखाद्या झाडावरचा पुष्पगुच्छ अलगद तोडून त्याच्या मोरमुगुटांत आणून खोवी. 'आता कसा छान दिसतो आमचा कृष्णराणा' म्हणून मग सगळेच नाचूं लागत. असा हा नित्य चालणारा स्वच्छंद खेळ पहाण्यासाठीं स्वर्गींचे देव नभोमंडळांत विमानांची एकच गर्दी करीत. आसावलेल्या डोळ्यांनीं ती क्रीडा पहातांना त्यांना गोपाळांच्या भाग्याचा हेवा वाटे. आपण या गोड सुखाला आंचवलों म्हणून ते मनांत चुटपुटत.

असे खेळून हुंदडून दमले कीं मग भोजनसमारंभ. कृष्ण सांगे. 'काढा रे आपापल्या शिदोऱ्या.' लगेच ते गोपबालक दहीभाताच्या पुड्या सोडीत. खायलासुद्धां ते वेगवेगळे बसत नसत. सगळ्यांचें अन्न एकत्र केलें जाई. सगळाच काला. मधें अन्नाचा ढीग आणि सभोंवती मांडीला मांडी खेटवून बसलेले ते गोपाळ. सगळ्यांनीं पाहिला घास कृष्णाच्या चिमण्या मुखांत घालायचा अन् मग आपण जेवायचें. त्यांनीं घास पुढें केला कीं कृष्ण आपले तोंड उघडी. घास देण्याच्या कामीं तूं आधी का मी आधी अशी त्या पोरांत अहंपूर्विका चाले. पण, एखादे दिवशीं नंदबाळच रुसून बसल्यासारखें करी आणि त्यांचें घास पुढे आले तरी मुखच उघडीत नसे. नाथ सांगतात :—

२८

गडी म्हणती सकळ । कृष्णा तूं घेई कवळ
हरि म्हणे उतावीळ । घ्यावा तुम्ही ॥ १ ॥
गडी नायकती सर्वथा । हरि म्हणे 'मी नेघें आतां'
म्हणोनि रुसोनि तत्त्वता । चालिला कृष्ण ॥ २ ॥
'कृष्णा ! नको जावूं जाण । तुझें ऐकूं वचन'
म्हणोनि संबोधून । आणिला कृष्ण ॥ ३ ॥
एका जनार्दनीं । लाघव दावी चक्रपाणि
भक्तां वाढवुनि । महिमा वदवी ॥ ४ ॥

मेघश्याम त्या मुलांना म्हणे. "आज मीं नाहीं आधीं घांस घेणार ! तुम्ही घ्या. रोज रोज मीच कां म्हणून ?"

गडी म्हणत "सांवळ्या, असं रे काय करतोस ? घे ना रे घांस. तूं आमचा राजा, तूं आमचा देव, तूं आमचा प्राण ! तुला आधीं नैवेद्य दाखवायचा अन् मग प्रसाद आम्ही घ्यायचा. तुझी तृप्ति आधीं."

देव म्हणे. 'तुम्ही ठायींचे ठकडे आहां. रोज मला तुम्ही फसवतां मोठपणा देऊन. गड्यानों ! मी कसला मोठा ! मी कसला देव ? तुम्ही तसा मी. तुमच्यांतलाच एक.'

"नाहीं, नाहीं ! तूं मोठा आहेस. खूप खूप मोठा आहेस. देव आहेस. आमचे आईवडील सांगतात आम्हांला. आम्ही तुझ्यासारखे ना ? मग आम्हांला मुरली कां वाजवतां येत नाहीं ? तुझ्यासारखीं गायी वासरं आम्हांला कां वश नाहींत ? तुझे दांत कसे कुंदकळ्यांसारखे शुभ्र अन् बारीक. आमचे कां तसे नाहींत ? तुझी सांवळ्या रंगाची तुकतुकी आम्हांला कां नाहीं ? सगळ्या गौळणी तुलाच कां भुलतात ? आम्हाला कां नाहींत ? म्हणून तूं देव आहेस ! म्हणूनच आम्हाला तुझी पूजा करूं दे. तुला घांस देवूं दे." गोपाळ बोलले.

पण कृष्णानें त्यांचें ऐकलें नाहीं. तो रुसून त्यांच्यामधून उठून दूर जाऊं लागला. गोपाळांना फार दुःख झालें. ते त्याच्या मागून धांवले. पुढें जाऊन त्यांनीं त्याला अडवलें. त्यांच्या नेत्रांत अश्रू तरळले. जीव कासावीस झाला. ते काकुळतीच्या स्वरांत कृष्णाला म्हणाले.

"देवा, असा रुसलास कां रे ? तूं रुसलास तर आम्ही काय करावं ? तूं दूर गेलास तर आम्ही कसं जगावं ? चल फीर माघारा. आम्ही तुझ्या आज्ञेत राहूं. तूं सांगशील तसं ऐकूं. तुझा बोल तिथें आमचा प्राण !"

नाथ म्हणतात कीं कृष्ण मोठा लाघवी होता. दुसऱ्याच्या अंतरांतलें प्रेम वाढवून नानापरींनीं त्याचा आस्वाद कसा घ्यावा ही विद्या कृष्णाला पूर्ण अवगत होती. रुसवा हा केव्हां केव्हा प्रेमळ शब्दांच्या माधुर्यापेक्षांहि गोड असतो. हसूं तसेंच रुसूं रुसण्यांत प्रेमाला आकर्षकपणा येतो. प्रेमभोजनांत रुसवा हा श्रीखंडासारखा आहे. रुसवा म्हणजे जिवलगाशीं मुद्दाम होऊन केलेली गट्टी फू: ! क्षणिक दुरावा अन् नित्याची जवळीक. तो दुरावाहि मधुर अन् मग तें एकत्र येणें तर मधुरतमच.

कृष्णच रुसत असे असें नाहीं, तर गोपाळहि कधीं कधीं त्याच्यावर रुसवा धरीत. एक दिवस असेंच एक भाबडें पोर, कृष्णानें सगळ्यांना काल्याचा वांटा दिला अन् आपल्यालाच तेवढें वगळलें म्हणून रुसून बसलें. तुकाराम महाराज सांगतात :—.

## २९

| | | |
|---|---|---|
| अवघियां दिला गोर | मजकडे पाहीना | १ |
| फुंदे गोपाळ डोळे चोळी | ढुंगा थापली हाणे तोंडा | २ |
| आवडती थोर मोठे | मी रे पोरटें दैन्यवाणें | ३ |
| तुका म्हणे जाणो भाव | जीवींचा देव बुझावी | ४ |

तो स्फुंदत होता. डोळे चोळीत होता. तोंडावर हात मारून घेत होता अन् ढुंगणावर थापट्या मारीत होता. तोंडानें सारखे चाललें होतें 'असाच आहे हा किस्न. थोलामोटयाचे लेक आवलतात त्याला. मी गलीब पोलका. मला कोण विचालनाल !—'

कृष्णानें मग त्याला हाताला धरून आणलें, आपल्या शेजारीं बसवलें अन् स्वहस्तें अश्रु पुसून त्याच्या तोंडांत घास भरवला.

असाच आणखीहि एक गोपबालक एक दिवस रुसला होता. तो बोबडा होता अन् थोडासा भोळसरहि. सगळीं पोरें त्याला गाई वळायचें काम सांगत. हरएक कामांत त्याला पिटाळीत. प्रत्येक वेळीं ‘ बोबड्या हें कर , बोबड्या तें आण ’ असें सर्वांचें चाले. कृष्णाच्या गाई एक दिवस कळपांतून दूर जाऊं लागल्या तेव्हां कृष्णानेंहि त्यांना वळवून आणण्याचें काम या बोबड्यालाच सांगितलें. पण, बोबड्या या वेळीं अडून बसला. त्यानें तें काम साफ नाकारलें. आणि आपल्या अंतरांत सलत असलेलीं अपमान आणि तिरस्कार यांची शल्यें कृष्णाला उघडून दाखवलीं. नामदेवानें ही बोबड्याची तक्रार मोठ्या बहारीनें मांडली आहे :—

३०

कुत्ना थमाल ले थमाल आपुल्या गायी
आम्ही आपुलाल्या घलासि जातों भाई
येथे ल्हायाचा आमता इलाद नाही
तुम्ही थंगत ले थंगत कलली भाई ध्रु०

तुम्ही थोलल्या पातलाचे लेक
तुम्हां मधीलें मी लहान आहे एक
मदला म्हनतांले ‘ जाई गायी लाख ’
किंति मी धावूं ले कांता लागला पायीं १

काली पिवली ले गाय आहे तानेली
या या गवल्याची धवली गाय पलाली
मदला बघून ले गवली तो मला माली
काली कामली हिलून घेतली थाली २

कालचा खलवस ले बलाचि गोल केला
तुम्ही अवघ्यानी फाल फाल घेतला
मी एक निजपत ले म्हनूनि थोलका दिला
तूं म्हनशिल ले याला कलतचि नाही काही ३

यमुनातीर्ली ले नित कलिता आंघोली
मदला म्हनतांले ' जा आन शिदोली '
कैची आनूं ले वलन आनि भाकली
माझा लवला ले काम ऐकतो भाई ४

कृष्ण म्हणे रे ' ऐकें बा बोबड्या '
तुझ्या गायी रे मी वळीन सौंगड्या
नाहीं तर धाडिन रे गोपालांच्या जोड्या
नामा म्हणे रे गोष्ट रोकडी पाही ५

बोबड्याची ही तक्रार ऐकून कृष्णाला वाटलें कीं स्वारीचा राग बराच चढला आहे. आज त्याचें बोलणेंहि कृष्णाच्या मनाला लागलें. त्याची समजूत घालण्यासाठीं तो लगेच पुढें झाला.

" बोबड्या तूं म झा मित्र ना ? मग असा रागावतोस कां बरं ? तूं नको जाऊं गायी वळावला. मी वळीन. तुझ्याहि वळून आणीन. नाहीं तर हे गोपाळ आहेत ना, त्यांच्यांपैकीं दोघां दोघांना पाठवीन. तूं अन् मी ऐटींत बसून राहूं. समजलं ना ? "

भक्त रुसले कीं देव बेचैन होतो. भक्तांचा राग तो मुकाट्यानें सहन करतो. पुढच्या आयुष्यांत तो अर्जुनाशींहि असाच वागला. ज्ञानेश्वर सांगतात, ' हा कोपे कीं निवांतु साहे । हा रुसे तरी बुझावीत जाये । नवल पिसें लागलें आहे । पार्थाचें देवा ॥ ' असो.

अशीं हीं रुसणीं फुगणीं संपलीं कीं मग सगळे प्रसन्न मनानें एकत्र बसून तो दहिभाताचा काला खात. भरल्या पोटीं ढेंकर आली कीं मग उठत. सांडलें लोटलें गोळा करून यमुनेच्या जळांत टाकीत. काल्यांतलें एखादें शित तरी आपल्याला मिळेल का, म्हणून अधाशासारखे पहाणारे स्वर्गीचे देव माशांचीं रूपें घेऊन यमुनेच्या पात्रांत येत अन् तीं गोपाळांनीं टाकलेलीं शितें झुंबड उडवून पटापट वेचून खात. ' काल्याचिये आशे । देव जळीं जाले मासे । ' काल्याचें हें प्रेमसुख भोगण्या साठीं गौळणी एकमेकींना बोलावून थव्याथव्यांनीं यमुनेच्या वाळवटांत जमत :—

## ३१

चला बाई पांडुरंग पाहूं वाळवंटीं
मांडियेला काला, भवतीं गोपाळांची दाटी १
आनंदें कवळ देती एका मुखीं एक
न म्हणती सान थोर अवघीं सकळिक २
हमामा हुंबरी पावा वाजविती मोहरी
घेतलासे फेर माजी घालुनियां हरी ३
लुब्धल्या नारी नर, अवघ्या पशुपती
विसरलीं देहभाव शंका नाहीं चित्तीं ४
पुष्पांचा वरुषाव जाली आरतियांची दाटी
तुळशी गुंफोनियां माळा घालिति कंठीं ५
यादवांचा राणा गोपी मनोहर कान्हा
तुका म्हणे सुख वाटे देखोनियां मना ६

श्रीहरीचीं जीं अनेक नांवें आहेत त्यांत मुरलीधर किंवा मुरलीमोहन असेंहि एक आहे. मुरलीमोहन म्हणजे मुरलीच्या नादानें विश्वावर मोहनास्त्र घालणारा. ती चिमणी मुरली अन् ते चिमणे ओंठ यांचा संगम झाला कीं त्यांतून नादाचे सप्तसागर उचंबळून येत. कृष्ण हा गोवळा म्हणजे गुराखी होता. मुरली ही गुराख्याची जिवाभावाची सखी. गुराखी एक वेळ शिदोरी विसरेल; पण मुरली विसरायचा नाहीं. अद्यापिहि गुराखी पोरें मुरली किंवा पांवा वाजवून रानें घुमवतांना आढळतात. गुराख्याचे रानावनांत भटकण्याचे, गायींच्या पाठीमागून पळण्याचे श्रम मुरली आपल्या जादूनें एका क्षणांत दूर करते. कृष्णानें गुराख्यांच्या जातीला दिलेली मुरली ही एक विश्वमोलाची देणगी आहे.

कृष्णाच्या अंगीं मुरलीवादनाची कला निसर्गसिद्ध होती. तो एखाद्या वृक्षाला टेंकून उभा राही अथवा एखाद्या शिलाखंडावर बसे अन् मुरली वाजवूं लागे. मुरलींत फुंक पडली अन् स्वरांच्या छिद्रां-वरून त्याच्या कोमल अंगुलि फिरूं लागल्या कीं त्यांतून अनेक राग-रागिण्या प्रगट होत. सारें रान कसें स्वरांनीं भरून धुंद होऊन जाई. साऱ्या आसमंतावर एक प्रकारची गोड भुलावण पडे. नाथ सांगतातः—

## ३२

भुलविलें वेणुनादें । वेणु वाजविला गोविंदें ॥ १ ॥<br>
पांगुळलें यमुनाजळ । पक्षी राहिले निश्चळ ॥ २ ॥<br>
तृणचरें लुब्ध झालीं । पुच्छ वाहुनियां ठेलीं ॥ ३ ॥<br>
नाद न समाये त्रिभुवनीं । एका भुलला जनार्दनीं ॥ ४ ॥

मुरलीचा नाद सुरू झाला कीं रानावनांतले इतर सारे नाद, सगळे ध्वनि बंद पडत. यमुनेचा खळाळ थांबे. वृक्षावृक्षांवरून बसलेले पक्षी आपलें कूजन थांबवीत. वारे स्तब्ध होत. गायी वासरें हंबरत नसत. आपल्या शेपट्या उंच करून तीं कृष्णाभोंवतीं गोळा होत. गोपाळांची तर समाधिच लागे. त्या मुरलीवरून अन् ती वाजवणाऱ्या नंदबाळावरून आपले पंचप्राण ओवाळून टाकावेत असें त्यांना वाटे.

कधी कधी तो चांदण्या रात्रीं एकटाच वृंदावनांत जाई अन् तिथे मुरलींत फुंक भरी. तो नाद वाऱ्यावर तरंगत गोकुळांत येऊन गौळणींच्या कानीं पडे अन् मग त्यांना वृंदावनाची ओढ लागे. त्या एकाएकीं अस्वस्थ होत. त्यांच्या कामाधामांत भलतेच प्रमाद घडूं लागत. चित्त उडे नि प्राण घोंटाळत. त्या मग वृंदावनांत चलण्याविषयीं एकमेकींना हाकारूं लागत. तुकोबा म्हणतात :—

३२

या हो या चला जाऊं सकळा
पाहों हा सोहळा आदिवृंदावनींचा १
वाईला गोपाळें वेणुनाद पडे कानीं
धीर नव्हे मनीं चित्त झालें चंचळ २
उरलें तें सांडा काम, नका करूं गोवी
हेच वेळ ठावी मज कृष्णभेटीची ३
निवतील डोळे याचें श्रीमुख पाहतां
बोलती तें आतां घरचीं सोसूं वाईट ४
कृष्णभेटीआड कांहीं नावडे आणीक
लाज तरी लोक मन जालें उदास ५
एकाएकीं चालियेल्या सादावीत सवें
तुका म्हणे देवें रूपें केल्या तन्मय ६

“ बायांनो, चला जाऊं वृंदावनांतला सोहळा पहायला. ऐका, ऐका हा वेणुनाद. नाहीं ऐकूं येत ? मला तर बाई अगदीं धीर निघत

नाहीं. निघा या क्षणाला बाहेर. घरकाम मेलं आहेच रोजचं. त्यांत जीव गुंतवून ठेवूं नका. कामांत गुंतलात तर या महान् लाभाला मुकाल. कृष्णाची निर्वेधपणें भेट होण्याची हीच वेळ बरं! त्याचं श्रीमुख पाहिलं तर डोळ्यांचं पारणं फिटेल. घरचीं माणसं बोलतील. सास्वा चहाड्या सांगतील. नवरे मारतील. सारं सारं सोसूं; पण हें गोड सुख तृप्ति होईतों लुटूं." दुसरी म्हणते :—

३४

| | | |
|---|---|---|
| नंदनंदन मुरलीवाला | याच्या मुरलीचा वेध लागला | १ |
| प्रपंच धंदा नाठवे कांहीं | मुरलिचा नाद भरला हृदयीं | २ |
| पतिसुताचा विसर पडला | याच्या मुरलिचा छंद लागला | ३ |
| स्थावर जंगम विसरुनि गेलें | भेदभाव हरपला | ४ |
| समाधि उन्मनी तुच्छ वाटती | मुरलीनाद ऐकतां मना विश्रांति | ५ |
| एका जनार्दनीं मुरलीचा नाद | ऐकतां होती त्या सद्गद | ६ |

सर्वांची एकच तऱ्हा. सगळ्यांचें एकच बोलणें. घरदार नको. पति-पुत्र नकोत. समाधि अन् उन्मनी जिथे तुच्छ वाटल्या, तिथे झोपेची आणि तहानभुकेची कोण पर्वा करणार? गौळणींनी लाज सोडली. भिड चेपून टाकली. जनरीतींतून त्या उठल्याच म्हटलें तरी चालेल. हरणें नाहीं का संगीताच्या नादाला भुलून रानेंच्या रानें वळंघून येत! गोपीहि तशाच रानोमाळ धावूं लागल्या. पायांत खडे कांटे टोंचत, कांटेरी झाडें झुडपें त्यांचें अंग ओरबाडीत अन् पदर फाडीत. भळभळा रक्त वाहे. त्या ठेचाळत, पडत, झडत; पण एकदा त्या मुरलीधराच्या पायांशीं नेऊन जीव घालीत.

त्या मुरलीचें सामर्थ्यच तसें होतें. जीवभाव हरपवून घेणारी, जीवाला शिवस्वरूपांत विरवणारी, वैरभाव विसरविणारी, संसारपाशांतून सोड-विणारी, द्वैत निरसून अद्वैताच्या आनंदसागरांत बुडविणारी अशी ती दिव्य मुरली होती. आपल्या स्वरजालानें चराचरावर जादू पसरणाऱ्या त्या मुरलीचा तो विलास ऐकून दुसऱ्या एका गौळणीच्या मनाची काय अवस्था होते तें नाथांच्या मुखानें ऐका:—

३५

काशि मी जावूं वृंदावना मुरली वाजवी कान्हा
पैलतिरीं हरि वाजवी मुरली नादि भरली यमुना
कासे पितांबर कस्तुरी टिळक कुंडल शोभे काना
काय करूं बाई कोणाला सांगूं नामाची सांगड आणा
नंदाच्या हरिनें कौतुक केलें जाणे अंतरींच्या खुणा
एका जनार्दनीं म्हणा देव महात्म्य कळेना कोणा

मुरलीचा मधुर रव तिच्या कानीं पडत आहे. तो ऐकून तिच्या जिवाची धांदल उडाली आहे. ती सर्व कामें टाकून वृंदावनाच्या दिशेनें धांवत सुटली आहे. पण ती खट्याळ काळीं यमुना मधें आडवी येवून तिला अडवीत आहे. याच वेळीं तिला नेमका पूर आला आहे. पाणी फेसाळत आहे, तीराला धडका देत आहे. धवल तरंगांच्या रूपानें ती जणूं हंसून या वेड्या गौळणीला विचारते. 'कशी जाशील पलिकडे?' खळाळाच्या रूपानें ती तिला भिंवंवते. म्हणते कीं, 'उतर हिम्मत असली तर माझ्या पात्रांत. आंत पाय तर दे, कीं नेतेंच तुला लोटीत लोटीत सागराकडे.' ती घाबरते, थबकते, विषण्ण होते. आजूबाजूला आशाळभूतपणें पहाते. पण नाहीं कुठें नाव, नाहीं तराफा. ना नावाडी, ना पोहणारा. काय करील ती आतां? कशी जाईल पैलतीरीं? तिच्या मनांत विचारांचा कल्लोळ उठतो. आशा निराशांचा लपंडाव चालू होतो. एक मन तिला म्हणतें. 'कशाला पहातेस यमुनेकडे? बघ कशी ओढ आहे प्रवाहाला! साहस करशील तर फुकट मरशील. तूं आपली घरीं परत जा कशी.' पण कृष्णप्रेमाच्या रसानें ओथंबलेलें तिचें दुसरें मन तिला धिक्कारून म्हणतें, 'हात् ग भागूबाई! संत भवसागराला भ्याले नाहीत अन् तूं या लहानशा नदीला, हिच्या खळखळाटाला भितेस? हव्या कशाला नावा अन् तराफे? नामाची सांगड घे अन् टाक उडी. प्रभु रामरायाच्या नामानं अचेतन पाषाण तरले, तर कृष्णजीच्या नावानं तुझा सचेतन जीव कां तरणार नाहीं? बघ पलीकडे त्या कदंबवृक्षाखालीं मुरलीधर उभा

आहे त्याच्या काटीला पीतांबर झळकतो आहे. भालीं कस्तुरीचा टिळा पौर्णिमेच्या कलानिधीसारखा भासतो आहे. कानींचीं मकरकुंडलं चमकत आहेत. हें त्रैलोक्यमोहक भगवद्रूप पाहून, अन् मुरलीचं त्रितापशामक स्वरजाल ऐकून काना डोळ्यांची धणी फेडायची असेल तर बाई ग, देहावर उदार झालं पाहिजे तुला."

तात्पर्य, अशा अनेक गौळणी नाना वाटांनीं वृंदावनांत येत. तें मुरलीचें संगीत ऐकत. त्याच्याबरोबर वनविहाराचें सुख अनुभवीत. त्याच्या हातांत हात गुंफून फुगड्या खेळत. त्याच्या भोवती फेर धरून नाचत आणि कृष्णप्रेमाचीं मधुर गाणीं गात.

अशा एक दिवस बऱ्याच गौळणी एकत्र जमल्या असतां त्यांच्या प्रेमाची कसोटी पहावी म्हणून कृष्ण त्यांना म्हणाला :—

३६

| | | |
|---|---|---|
| वनामध्यें कां गे आलाती सकळ | विनोदें गोपाळ म्हणतसे | १ |
| निशीमाजी व्याघ्र फिरताती रानीं | जावें सकळांनी घरा आतां | २ |
| ऐकोनियां ऐसें कठिण वचन | चालिलें जीवन नेत्रींहूनी | ३ |
| वेणुनाद दूत धाडिला आम्हासी | आलिया म्हणसी जावें आतां | ४ |
| शहाणा चतुर आहेस नेटका | वैकुंठनायका विचारावें | ५ |
| कामाग्नीनें कृष्णा पीडिलों सकळ | मांडियेला खेळ मन्मथाचा | ६ |
| एक एक नारी एक एक कृष्ण | करावया पूर्ण इच्छा त्यांची | ७ |
| प्रकृतीसि ऐसा भुलला गोविंद | करिती आनंद नामा म्हणे | ८ |

"गोपींनो, अशा अवेळीं अपरात्रीं घरदार सोडून तुम्ही इथें कां आलांत ? या रानांत वाघ वगैरे हिंस्र प्राणी इतस्तत: हिंडतात त्यांची तुम्हांला भीति वाटली नाहीं का ! कां हें साहसकर्म आचरलंत ! तुमचे सासूसासरे तुम्हाला बोल लावणार नाहींत का ? तुमचे पति रागावणार नाहींत का ? त्यांना कसं आवडेल हें तुमचं वर्तन ? तुमचीं मुलं नाहीं का घरीं रडायचीं ? कुलीन स्त्रियांनीं आपल्या पति-सुतांना टाकून पराच्या ठिकाणीं आसक्त होणं हें चांगलं दिसतं का ? कां तुम्ही मर्यादा सोडतां ? कां अशा उच्छृंखल होतां ? पति हेंच कुलांगनांचं दैवत. तेंच सर्वभावें

उपास्य अन् तेंच सर्वस्व ! जा. आलांत तशा घरीं परत जा. तुम्हीहि दोषी होऊं नका अन् मलाहि जननिंदेचा विषय करूं नका—"

गोपी स्तब्ध होत्या. ऐकत होत्या. कृष्णाचे ते वज्राचे बोल त्यांच्या हृदयावर आदळत होते. आजचें त्याचें कठोर बोलणें अन् निष्प्रेम दृष्टि त्यांना सहन होण्यासारखी नव्हती. 'ज्याला सर्वस्व अर्पण केलें, अहोरात्र ज्याच्यासाठीं झुरलों, झगडलों त्यानेंच असें आम्हाला झिडकारावें ना, या विचाराचें दुःख त्यांच्या हृदयाला दंश करीत होतें. तो दुःख भार त्यांना असह्य होत होता. त्यामुळें अनपेक्षितपणें वळवाच्या पावसाची सर यावी तसे त्यांच्या नेत्रांतून टप्टप् अश्रु गळले. त्यांचा कंठ अवरुद्ध झाला. हुंदक्यांपुढें शब्द बाहेर येईना. नासारंध्रें उष्ण निःश्वास सोडूं लागलीं. उर धपापूं लागलें. शोकावेगानें हृदयाला भेग पडली पण तें फुटेना. काया विकल झाली पण चेतना जाईना. तनू आंतल्या आंत जळूं लागली पण भस्मसात् होईना. दुर्दैव मर्मतंतु कुरतडूं लागलें पण प्राणपक्षी उडून जाईना. असें त्यांचें दारुण दुःख होतें. त्यांचा हृदयेश्वर त्यांच्यावर उदास झाला होता, कोपला होता. त्या म्हणाल्या—

"जगन्मोहना, कां रे असा रुष्ट झालास ? 'आलांत तशा परत जा' हे शब्द उच्चारतांना देवा, तुझ्या मनाला काहीच वाटलं नाही का रे ? आम्ही इथे कां आलों, असं तूं विचारतोस. तुला नाही कळायचं तें. गारुड्याच्या पुंगीचा स्वर ऐकतांच वारुळांतून बाहेर येणाऱ्या नागालाच तें कळेल. दीपज्योति दिसतांच तिच्यावर झडप घालणाऱ्या पतंगालाच तें समजेल."

"ही तुझी मुरली ! हिनं आम्हाला हाकारलं. प्रणयाची अग्रदूती होऊन ही आमच्याकडे आली. हिनं आम्हाला त्वरा केली. हिनंच आम्हाला घराबाहेर खेचलं."

## २७

तुझ्या मुरलिची ध्वनि अकल्पित पडली कानीं
विव्हल झालें अंतःकरणीं मी घरधंदा विसरलें १
अहा रे सांवळिया कैशी वाजविली मुरली ध्रु.

मुरली नोहे केवळ बाण तिनें हरिला माझा प्राण
संसार केला दाणादीन येऊनि हृदयीं संचरली २
अहारे सांवळिया कैशी वाजविलि मुरली
तुझ्या मुरलिचा सूर तान मी विसरलें देहभान
घर सोडुनि धरिलें रान मी वृंदावनिं गेलें ३
अहारे सांवळिया कैशी वाजविली मुरली

"मुरली कसली? बाण होता तो. त्यानं आमच्या काळजाचं विंधान केलं. संसाराची दाणादाण उडवली. देहगेहासक्ति बारा वाटा पळवून लावली. आणि आमचं जीवन तुझ्या हृदयाशीं आणून जोडलं. रात्र म्हटली नाहीं, अंधार म्हटला नाहीं, वाट आडवाट पाहिली नाहीं. मन सारखं धांवत सुटलं अन् त्याचा पालव धरून देह इथें येऊन पडले. आतां जाणं येणं खुंटलं. आतां परतणं नाहीं. या देहावर अन् त्याच्या हालचालींवर आतां आमची सत्ता उरली नाहीं. जें कांहीं आहे तें आतां सारं सारं तुझं आहे. तुला हवं तें कर. दूर लोट वा हृदयाशीं धर. अंगार पाखड वा अमृताचं सिंचन कर! 'त्वमेव शरणं मम"

गोपींच्या अंतरांतला हा निकराचा प्रेमभाव पाहून गोपाल कृष्णानें त्यांच्यावर सुखाचा वर्षाव करायचें ठरवलें. लागलीच त्यानें माया रचली. कृष्ण एकाचा अनेक झाला. जितक्या गोपी तितकीं कृष्णरूपें. प्रत्येकीला एकेक कृष्ण. कोणी भांडायला नको, रुसायला नको! प्रत्येकीनें आपल्या अंगुलि कृष्णाच्या अंगुलींत गुंफल्या. 'मन्मथाचा खेळ' सुरू झाला. गोपींचें प्रेमनिधान, मदनबाधेवरचें अमृतरसायन, त्यांना सांपडलें. त्या हृष्टपुष्ट झाल्या. प्रमत्त झाल्या. रासरसाची रंगत उडाली. लीलानाटक-सूत्रधार श्रीकृष्णानें गोपींना रमवलें, दमवलें, हसवलें, फुलवलें. त्यांचा अनुनय केला, आपला त्यांच्याकडून करवून घेतला. प्रेम दिलें, घेतलें.

'अनन्यसामान्यकलत्रवृत्तिः पिबत्यसौ पाययते च सिन्धूः'

असें सागराबद्दल कालिदास म्हणतो तें गोपालकृष्णालाहि पूर्णपणें साजून दिसेल.

# विराण्या : ६

ज्ञानेश्वरादि संतांच्या अनेक काव्यप्रकारांपैकीं 'विराण्या' नांवाचा एक भावमधुर काव्यप्रकार आहे. विराणी म्हणजे विरहिणी. प्रियकराच्या दर्शन–समागमसुखाला पारखी झालेली पण त्यासाठीं जीव झुरवणारी प्रेमळ प्रिया. स्वभावधर्माप्रमाणें या विरहिणींचे अनेक प्रकार होतात. त्यांच्या भावप्रगटीकरणांच्या तऱ्हाहि अनेक असतात. एखादी वाचाळ तर एखादी अबोल होते. एखादी आपल्या वल्लभाचे अहर्निश गुणानुवाद गाऊं लागते तर एखादी त्याच्या नांवानें खडे फोडते. एखादी रडत बसते तर एखादी सदा हंसतच सुटते. एखादी क्षीण होते तर एखादी उन्मत्त होते.

विरही माणूस एक प्रकारें वेडेंच बनतें. सीतेचा विरह झाल्यानंतर प्रभु रामरायानेंसुद्धां हरिणांना तिची वार्ता विचारली आणि आवेगभरानें वृक्षपाषाणांना मिठया मारल्या, ही गोष्ट सर्वश्रुत आहे. कालिदासाचा काव्यविषय झालेला यक्ष तर अचेतन मेघालाच आपला दूत बनवून अलका नगरींत पाठवतो. 'कामार्ताहि प्रकृतिकृपणाश्चेतनाचेतनेषु' असा कालिदासानें विरही जनांना सरसकट शेराच मारून ठेवला आहे.

विरह ही करुणरसाकडे झुकणारी अशी प्रेमभावना आहे. विरहांत-सुद्धां एकप्रकारचें सुख आहे. आपण कोणासाठीं तरी झुरतों आहों, कोणाची तरी कल्पनागम्य मूर्ति हृदयसिंहासनावर बसवून आपण अश्रु-जलांनीं तिचे पाय धूत आहों, कोणासाठीं तरी आपण ऐहिक भोग-

विलासांचा त्याग करून संन्यासी-वनवासी बनलों आहों, कोणासाठीं तरी आपण आपली काया कृश करून घेतली आहे, कोणाची तरी उत्कंठेनें वाट पहाण्यांत आपण दिवसाचे दिवस घालवीत आहों, कोणाची तरी जागृतींत, निदान स्वप्नांततरी भेट व्हावी म्हणून आपण तळमळत आहों या भावनेंत कसलीतरी अवीट गोडी आहे. कांहीतरी मधुर सुख आहे.

संत हे परमात्म्याशीं स्वभावतःच एकरूप होते. अखंड आत्मस्थितीचा ते 'अमृतानुभव' घेत होते. द्वैताची उरी नुरवून ते अद्वैताच्या सागरांत तरंगासारखें खेळत होते, लोळत होते. पण त्यांत त्यांच्या प्रेमळ हृदयाचें समाधान होईना. 'अद्वैतीं तों नाहीं माझें समाधान। गोड हे चरणसेवा तुझी ॥' असें तुकोबा म्हणाले आहेत. जी तुकोबांची आवड तीच सकल संतांची. ते मग अद्वैतांतून थोडेसें निराळे झाले. भक्तिसुखासाठीं नसलेलें द्वैत त्यांनीं उभें केलें. निर्गुण परमात्म्याला नाम-रूपांची लेणीं चढवून त्यांनीं आपला परमेश्वर बनवला आणि आपण त्याचे भक्त झाले. पूजक बनून त्याची पूजा विस्तारली. भाट बनून त्याचें गुणवर्णन करतांना सहस्रमुखांच्या शेषालाहि लाजवलें. दीन बनून त्याच्या दारीं धरणें घेतलें. संबंधी बनून त्याच्याशीं सलगी केली. विरोधी बनून त्याच्याशीं भांडलेसुद्धां! 'हरिकथा भोजन परवडी विस्तार। करूनि प्रकार सेवूं रुचि ॥' असें तुकोबांनीं सांगितलें आहे. एकाच गव्हाचे नाना पदार्थ बनवून त्यांचा आस्वाद घ्यावा तसे हे सारे प्रेमाचेच प्रकार होत. शेवटीं त्यांना वाटलें, आपण थोडा वेळ देवाला आपल्यापासून दूर ठेवावा अन् तो दिसत नाहीं, भेटत नाहीं, गवसत नाहीं अशी कल्पना करून त्याच्या विहरव्यथेचें माधुर्य चाखावें. विरहाचें पराकोटीचें सुख म्हणा, दुःख म्हणा, कोणी बरें उपभोगलें असेल असा ते विचार करूं लागले. त्या विचारांत त्यांच्या डोळ्यांपुढें गोकुळांतल्या गौळणींच्या करुणरम्य मूर्ति उभ्या राहिल्या. संतांनीं मग आपल्या विरहभावनेच्या प्रकटीकरणासाठीं त्यांचीच भूमिका पसंत केली. ते गौळणींचीं रूपें नटले आणि सावळ्या नंदकुमाराला रानावनांत

शोधूं लागले. तो भेटत नाहीं असें कळतांच त्याच्या विरहवेदनेला अधिकच धार चढली.

तुकोबांच्या विराण्या प्रमत्ततेकडे झुकणाऱ्या आहेत. त्यांनीं लाज-भीड सोडली आहे. लोकाचाराची त्या पर्वा करीत नाहींत. पापपुण्य गणीत नाहींत. कृष्ण जरी त्यांना दुरावलेला असला तरी त्या रडत नाहीत, हळहळत नाहींत. तो सर्वभावें आपलाच आहे अन् आपण त्याच्याच आहों असें त्या समजतात. 'तो लपला असला तर त्याला शोधून काढूं अन् दूर गेला असला तर ओढून आणूं' अशा आत्मविश्वासाची त्यांच्यामध्यें झांक दिसते. 'आम्ही कृष्णाच्या पट्टराण्या आहों' हा विश्वास त्यांच्या अंतरांत ओतप्रोत दिसतो.

त्यांपैकीं एकीला कोणीतरी विचारलें 'का ग, नवयुव पति सोन्या-सारखीं लेकरं, अन् भरलेलं घर सोडून तूं या कृष्णाच्या काय नादीं लागलीस? काय तुला उणं आहे म्हणून तूं आपल्या सतीधर्माचं उच्छेदन आरंभलंस?' तर यावर तुकोबांची ही विरहिणी न शरमतां सडेतोड उत्तर देते:—

३८

आधिल्या भ्रतारें काम नोहे पुरा
म्हणोनि व्याभिचारा टेकलिये १

रात्रंदिस मज पाहिजे जवळी
क्षण त्या निराळी न गमे घडी २

नाम गोष्टी माझी सोय सोडा आता
रातलें अनंता तुका म्हणे ३

'ऐकलंस? पहिल्या भ्राताराकडून काम पूर्ण होईना, म्हणून हा व्यभिचाराचा मार्ग धरला. त्या पतीचा संबंध सोडला अन् या कन्हैय्याला पति म्हणून वरलं. त्याच्या गळां दृढ मिठी घातली. क्षणभरसुद्धां त्याचा विरह मला सोसवत नाहीं. रात्रंदिवस तो माझ्याजवळ असावा असं

वाटतें. मी आतां निराळी झालें आहें. पूर्वीची ती गौळण आतां मी उरले नाहीं. तुम्ही नका माझ्या वाटेस जाऊं !'

तुकोबा इथें रूपकाचा आश्रय करून बोलतात. 'आधिला भ्रतार' म्हणजे क्षणोक्षणीं आपलीं रूपें पालटणारा हा प्रपंच. हा सर्वांच्या पाठीस लागला आहे; पण कोणालाच सुख लागूं देत नाहीं. आपल्या तडाख्यांत सांपडेल त्याला परोपरीनें छळणें हें त्याचें कार्य. अन् तरीहि जीव त्याला भुलतो. आपण होऊन त्याच्या खाईत उडी टाकतो. आपली मान त्याच्या फासांत अडकवतो. कारण तो मुलखाचा फसव्या आहे. तो दुःखरूप आहे खरा; पण सुखाची आंगी लेवून तो जीवाच्या पुढें येतो. जसें इंद्रावणीचें फळ. वरून साजिरें गोजिरें; पण आंतून कडू जहर. सुखाची लालूच दाखवून तो जीवाला नेमका दुःखाच्या डोहांत नेऊन बुडवतो. या संसाराच्या नावेंत बसून जीव पैलतीराला जाऊं पहातो. पण या नौकेला खालून शतच्छिद्रें पडलीं आहेत, याची दाद कोणालाच नाहीं. बुडवणें हेंच याचें अंगीकृत कार्य. यातायातींत घालणें हेंच कौशल्य. याच्याकडून सुखाची अपेक्षा करणें म्हणजे विषकंद वांटून पिऊन रोग बरा होण्याची वाट पहाण्यासारखें आहे. इंगळांच्या शय्येवर कोणाला सुखनिद्रा लाभली आहे का ? संसाराच्या संगतींत शांति—समाधान तितकेंच दूरापास्त आहे.

म्हणूनच संत संसाराला स्वहस्तें आग लावून श्रीहरीला वरतात. संसाराची जितकी नासधूस होईल तितका त्यांना अधिक हर्ष होतो. आई बाप, बायको पोरें, मरून गेलीं, संसाराची सगळीच घडी विसकटली, तेव्हां तुकोबा काय म्हणाले माहीत आहे ? 'विठो तुझें माझें राज्य । नाहीं दुसऱ्याचें काज' हीच भावना निराळ्या भाषेंत तुकोबांनीं वरील विरहिणीच्या मुखानें व्यक्त केली आहे.

पुनः तिची सोबतीण या विरहिणीला बोलली कीं, 'मनाची लाज तूं सोडलीस खरी; पण जनांची सोडतां येईल का ? लोक तुझ्याकडे बोटं दाखवतील. शिंदळ म्हणतील. तुझा संबंध सोडतील. तुला वाळीत टाकतील. मग कसं होईल तुझं ?'

यावर ती उत्तर करते:—

३९

वाळो जन मज म्हणोत शिंदळी
परि हा वनमाळी न विसंबें १

सांडूनि लौकिक झालिये उदास
नाहीं भव, आस जीवित्वाची २

नाइकें वचन बोलतां या लोकां
म्हणे झालों तुका हरिरता ३

" लोकांची भीति बाळगण्यांत कांहींच अर्थ नाहीं. लोक काय हवं तें बोलतील. जनांच्या जिभेला दुसऱ्यांना नांव ठेवण्यावाचून दुसरं काय काम आहे? लोक चांगल्यालाहि नावं ठेवतात आणि वाइटालाहि. त्यांचं जिव्हास्त्र सदैव परजलेलं असतं. सती असो वा कुलटा असो, दोघींवरहि तें सारख्याच निर्दयतेने आदळतं. त्याच्या तडाख्यांतून दगड-हि सुटत नाहीं अन् देवहि. ज्याला आपलं स्वहित साधायचं असेल त्यानं लोकांचं बोलणं दुर्लक्षित केलं पाहिजे. मोठया सुखासाठीं छोट्या दुःखांची उपेक्षा केली पाहिजे. मी आतां स्वीकृत मार्गापासून परावृत्त झालें, कृष्णाचा छंद सोडून संसारांत रमलें तर लोक काय स्वस्थ बसतील? म्हणतील कीं, ' देहानं नसला तर मनानं तरी व्यभिचार करीत असेल. जाऊं दे! मी जीवाचीच जिथें आस सोडली तिथें जननिंदेला काय म्हणून भीक घालीन!"

४०

हाचि नेम आतां न फिरे माघारी
बैसलें शेजारीं गोविंदाचे १

घररिघी झालें पट्टराणी बळें
वरिलें सांवळे परब्रह्म २

बळियाचा अंगसंग जाला आतां
नाहीं भय चिंता तुका म्हणे ३

"गोविंदाच्या शेजारीं जाऊन बसल्यावर आतां परत फिरण्याची गोष्ट कशाला ? मुरलीमोहनाच्या घरीं मी शिरलें म्हणजे त्याच्या घरची दासी बटकी होऊन राहिलें असं नको हो समजूं. मला तिथें कांहीं सत्ता नाहीं, मान नाहीं, सत्कार नाहीं अशींसुद्धां कल्पना नको करून घेऊं. मी अशी तशी नाहीं. पट्टराणी होऊन मी त्याच्या घरीं गेलें आहें. त्याचं पाणिग्रहण केलं आहे, जशी प्रभु रामरायाची सीता, जशी नलाची दमयंती तशी अगदीं तश्शी मी श्रीहरीची पट्टाभिषिक्त सम्राज्ञी आहें. रामानं एका क्षुद्र रजकाच्या विषारी शब्दावरून सीतेचा त्याग केला, माहेरची वाट दाखवून ऐन अंधाऱ्या मध्यरात्रीं नलानं दमयंतीला एकाकी रानांत सोडलं. पण जनांनीं कितीहि कावकाव केली तरी माझा कृष्णसम्राट् मला टाकणार नाहीं. माझं सावळं परब्रह्म शब्दानंहि माझी उपेक्षा करणार नाहीं."

"तूं म्हणतेस कीं, 'मला भीति कशी वाटत नाही ?' कां वाटेल ? मी ज्याचा संग धरला आहे तो काही दीन दुबळा नाहीं. तो बलिया-शिरोमणि आहे. तृणावर्तादि दैत्यांच्या संहारानं, त्याचं बलशालित्व जगांत गरजलं आहे. ज्याच्या नुसत्या नामानं संत भवसागराच्या पैल-पार उतरले, भक्त तरले अन् दीनजन उद्धरले, जो काळालाहि पचवतो अन् कृतांतालाहि कांपवतो अशा ब्रह्मांडनायकाचा अंगसंग केल्यावर मला भीति कसली ? माझीं सांकडीं तो निवारील. माझीं दुःखं तो हरील."

## ४१

क्षणभरी आम्ही सोशिलें वाईट
साधिलें अवीट निजसुख १

सांडी मांडी मागें केल्या भरोवरी
अधिकची परी दुःखाचिया २

तुका म्हणे येणें जाणें नाहीं आतां
राहिलों अनंताचिये पायीं ३

औषध घेतांना तोंड कसें वेडे वांकडें होतें ? पण तो कडू घोट गिळला कीं त्यामुळें मिळणारें आरोग्याचें सुख बिनमोल असतें. परमार्थाची सोपानपरंपरा चढायला बिकट असतें. कारण मुमुक्षूला पुढें ढकलण्याऐवजीं मागें ओढणारे वा खालीं पाडणारेच फार. इंद्रियें एका बाजूला ओढतात. मन दुसरीकडे फरफटीत नेतें. बायकामुलें विरोध करतात. पति पुत्र आड येतात. सगे सोयरे उपहास करतात, जनांत टवाळी सुरू होते. अशा नाना आपत्ति. पण हे घणाघात सोसून जो नेटानें पाऊल पुढें टाकील तोच नंतर निःश्रेयसाचा अधिकारी होतो.

निरुपाधिक आणि अविनाशी सुख हवें असेल तर हाच एकमेव मार्ग. प्रभूला सर्वभावे शरण जाणें, आत्मार्पण करणें. सुख सुख म्हणून आपण संसाराच्या डोहांत बुडी मारतों. एक वस्तु जवळ घेतों, दुसरी दूर फेंकतों. एक उभारतों, दुसरें मोडून टाकतों, एकाच्या पाठीस लागतों, दुसऱ्यापासून दूर पळतों. सुखानें जवळ येऊन आलिंगन द्यावें नि दुःखानें पळ काढावा यासाठीं सारी धडपड. पण दुःख तें आद्यंतीं दुःखच अन् सुख म्हणून ज्याला पोटाळावें तेंहि आभासात्मक अतएव दुःखच ! शेवटीं अनुभव पदरांत पडतो तो हा. तेव्हां या यातायातीला अन् दुःखपरंपरेला कंटाळलों आणि मी सच्चिदानंदाचं सुखधाम गांठलं.

## ४२

हासों रुसों आतां वाढवूं आवडी  
अंतरींची गोडी अवीट ते ॥ १ ॥

सेवासुखें करूं विनोद वचन  
आम्ही नारायण एका एकीं ॥ २ ॥

तुका म्हणे आम्ही झालों उदासीन  
आपुल्या स्वाधीन केला पति ॥ ३ ॥

मनासारखा पति मिळाला कीं 'आतां कोणकोणत्या प्रकारांनीं सुखाची लयलूट करूं' असें रमणीला वाटूं लागतें. एकांतात बसावें, संगतीला रहावें अन् पंगतीला जेवावें, एवंच पळभरहि वियोग घडूं नये

अशी तिची इच्छा असते. वस्तूची छाया वस्तूपासून कधीं विलग होते का, तसें ! तिच्या अंतरांत माधुर्याचे कलश भरून ओसंडत असतात. क्षणांत हंसून तर क्षणांत रुसून ती त्या माधुर्याची चव विविध प्रकारें चाखीत असते. अहर्निश सेवा करणें हें ब्रीद अन् ती करीत असतांना विनोदवचनांची तुषारवृष्टि हें श्रमपरिहाराचें साधन. चतुर कामिनी पतीची नाजूक थट्टा करते अन् तो हंसला कीं आपणहि त्याच्याबरोबर हंसतें. हंसतां हंसतां तिला एखादे वेळीं रुसायचीहि लहर येते. लगेच तिचा मुखचंद्र पतीला विन्मुख होतो. कसलेंहि श्रम नसतांना तिचा उरोभाग खालींवर होऊं लागतो. कुसळाएवढेंहि कारण नसतां नेत्र पाण्यानें भरतात. ज्वरबाधा नसतांहि कढत निःश्वास सुटूं लागलात. मुखकांति पालटते अन् नितळ कपाळावर ठळकी आडव्या रेषा चमकतात. हें औढून ताणून चंद्रबळ कशासाठीं असतें ठाऊक आहे ? पतीनें आपला अनुनय करावा, तो थोडा वेळ तरी संभ्रांत व्हावा, अशरण व्हावा म्हणून. ज्याची आपण अहर्निश सेवा करतों, ज्याच्यापुढें सदैव नम्र होतों, त्यानें घटकाभर तरी आपल्यासमोर नमावें म्हणून बाहेरून राग अन् आंतून अनुराग असा तो रुसव्याचा क्षण आंबट गोड श्रीखंडासारखा अत्यंत रुचकर होतो. ज्यांनीं आपल्या रूप – गुणांनीं अन् अंतरींच्या निर्मल भावनांनीं पतीला आपल्या आधीन करून घेतला असेल त्यानांच हीं सगळीं वांछित सुखें लाभतात. तुकोबांची ही विरहिणी हीं सुखें भोगतां भोगतां तद्रूप झाली आहे.

तिच्या तोंडून हें तिच्या वल्लभाचें अन् नव्या संसाराचें रसभरित वर्णन ऐकून कांहीं गोपींच्या तोंडाला पाणी सुटलें. त्या विचारूं लागल्या, ‘ आम्ही येऊं का ग तुझ्या बरोबर ? आम्हांला मिळेल का तें सुख ? ’ त्यावर ही उत्तर करते. ‘ छेः छेः ग बाई ! ’

## ४२

मजसवें आतां नका येऊं कोणी
सासुरवासिनी बाइयांनो १

न साहवे तुम्हा जनांची या कूट
बोलती वाईट वोखटें तें २

तुका म्हणें झालों उदास मोकळ्या
विचरों गोवळ्यासवें आम्ही ३

" माझ्या बरोबर तुम्ही कोणी येऊं नका बरं! तुम्हांला नाहीं तो मार्ग झेपायचा. तुम्ही सासुरवासिनीं आहां. पराधीन आहां. सासू, सासरे दीर, भावे, पति, पुत्र यांच्या दडपणाखालीं तुमचं व्यक्तिमत्त्व चिरडून गेलं आहे. कोळ्याच्या जाळ्यांत सांपडलेल्या माशा आहांत तुम्ही. जरा धडपड कराल तर अधिकच अडकाल. शिवाय आजूबाजूची माणसं निंदा करतील ती तरी सहन होईल का? जननिंदा हें सर्वांत मोठं मारक अस्त्र आहे. धपका सोसवतो पण ठपका सोसवत नाहीं. सहस्र-जिव्हा सहस्रप्रकारें परजल्या कीं अंगावर अग्निकणांचा वर्षाव झाल्या-सारखं वाटतं. कुठें जाऊं नि कुठें लपूं अशी अवस्था होते."

" मग तूं ग कशी गेलीस या मार्गानं? तुला नाहीं का जननिंदेचं भय वाटलं? लोकपवाद तुला कसा सहन करतां आला? कोणती ढाल पुढें करून तूं अपशब्दांचे वार अंगाला लागूं दिल नाहींस?"

यावर ती प्रत्युत्तर करते—

४४

मरणाही आधीं राहिलों मरूनी
मग केलें मनीं होतें तैसें १

आतां तुम्ही पहा आमुचें नवल
नका वेचूं मोल वायांविण २

तुका म्हणे तुम्ही भयाभीत नारी
कैसी संगसरी तुम्हां आम्हां ३

" मरणाच्या आधींच मी मरून राहिलें आहे. म्हणजे देहीं देहातींत झालें आहे. या भौतिक शरीरावरची माया मी पार पुरून टाकली आहे.

निंदा आत्म्याची होऊं शकत नाहीं. कोणी करूं शकत नाहीं. निंदा व्हायची तर ती देहाची होईल. होईना कां! मला काय त्याचं? देहाची निंदा झाली तर तें योग्यच आहे. कारण देह विकारी असल्यामुळें सर्वथैव निंद्यच आहे देहाभिमान ज्यानं टाकला त्याला निंदा आणि स्तुति दोन्ही सारखीच!

जो निंदेतें नेघे । स्तुती न श्लाघे ।
आकाशा नलगे । लेपु जैसा ॥
तैसें निंदे आणि स्तुति । मान करूनि एके पांती ।
विचरे प्राणवृत्ती । जनीं वनीं ॥

—ज्ञानेश्वरी

या स्थितीला मी येऊन पोंचलें आहें. तेव्हा तुमची माझी सर कशी होणार? तुम्ही मुलखाच्या भित्र्या. मी भयाला भिववलं नि गरुडासारखी झेंप घातली तेव्हांच या निरामय आनंदाचा अमृतकुंभ माझ्या हातीं आला."

४५

पर पुरुषाचें सुख भोगें तरी
उतरोनि करीं घ्यावें सीस १
संवसारा आगी आपुलेनि हातें
लावूनि मागुतें पाहूं नये २
तुका म्हणे व्हावें तयापरी धीट
पतंग हा नीट दीपावरी ३

"पर पुरुष म्हणजे श्रेष्ठ पुरुष. ज्याला परमात्मा म्हणतात तो. त्याचं संगसुख भोगायचं तर तें सोपं नाहीं. तें असिधाराव्रत आहे. शिरकमळ हातीं घेऊन जळत्या आगींतून जावं लागतं त्यासाठीं! हें निरंतरचं सती जाणं आहे. एवढा धीटपणा जिच्या अंगीं असेल तिनेंच पुढें पाऊल टाकावें. नपेक्षा 'आपलं नासं नि जगाचं हसं' असा उभयपक्षीं नाश व्हायचा. संसारहि करीन अन् परमार्थहि साधीन,

म्हटलं तर तें जमणार नाहीं. एका म्यानांत दोन तरवारी रहात नाहींत तसेंच एकाच अंतरांत संसार आणि परमार्थ एका काळीं नांदूं शकत नाहींत. दोन घरचा पाहुणा उपाशी मरतो आणि दोन होड्यांवर पाय ठेवणारा मधेंच नदींत बुडतो, त्याप्रमाणें एका हातानं संसार करीन आणि दुसऱ्या हातानं परमार्थहि पकडीन म्हणणाऱ्याची त्रिशंकूसारखी अवस्था होईल. 'तुका म्हणे तया दोहींकडे धक्का। शेवटीं तो नरकामाजी पडे.' म्हणून ज्याला या मार्गानं यायचं असेल त्यानं आधी आपलं अंतर तपासून पहावं तिथें वैराग्य उत्पन्न झालं आहे का? संसाराचा वीट आला आहे का? भोगासक्ति गळून पडली आहे का? इंद्रियरूपी अवखळ घोडे निग्रहाचा लगाम घ्यायला तयार आहेत का? देहाहंकाराचा नागोजी आपलं ठाणं उठवायचं कबूल करतो का? ईश्वरावर पूर्ण भरवंसा ठेवून जें घडेल तें पहायचं अन् आदळेल तें सोसायचं, पण मागें वळायचं नाहीं असा निर्धार अंतरांत परिपुष्ट झाला आहे का? या प्रश्नांचा निवाडा करून त्यांना अस्तिपक्षीं उत्तर आलं तरच पुढें उडी घ्यावी, नाहीं तर—? "नाहींतरी सुखें असावें संसारीं!" असो.

आतां या पुस्तकाचा शेवटचा गोड घास म्हणजे श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या विराण्या. त्यांची थोडीशीं गोडी चाखूं आणि 'ॐ तत्सद्-ब्रह्मार्पण मस्तु' म्हणूं. ज्ञानेश्वरांच्या विरहिणीच्या पदांतून करुणरसाचे पाझर स्रवत आहेत. 'प्रायः सर्वो भवति करुणावृत्तिरार्द्रान्तरात्मा' अशी ती ज्ञानेश्वरनिर्मित विराहिणी आहे. कृष्णदर्शनासाठीं ती तळमळत आहे अन् 'मला कृष्ण भेटवा हो' असें आपल्या सोबतिणींना विनवीत आहे:

४६

धनु वाजे घुण घुणा
वारा वाजे रुण झुणा
भवतारक हा कान्हा वेगीं भेटवा का १
चांद वो चांदणें
चांपे वो चंदनु
देवकीनंदनेंविण नावडे वो ॥ ध्रु. ॥

चंदनाची चोळी
माझें सर्वांग पोळी
कान्हो वनमाळी वेगीं भेटवा कां २
सुमनाची सेज
शीतळ वो निकी
वोले आगीसारिखी वेगीं विझवा कां ३
तुम्ही गातसां सुस्वरें
ऐकों नेदावीं उत्तरें
कोकिळें वर्जावें तुम्ही बाईयांनो ४
दर्पणीं पाहतां
रूप न दिसें आपुलें
बापरखुमादेविवर विठ्ठलें मज ऐसें केलें ५

ग्रीष्मांतीचा वारा चहूंकडून धुडगूस घालूं लागतो. आकाशांत कृष्ण मेघ दाटीवाटीनें जमूं लागतात. निळें निळें आकाश काळें काळें होतें. विजांची तळपणी सुरू होते. ‘ गुडु ऽ ऽ म् ’ असा गडगडाट होतो. पावसाची सर येणार अशीं चिन्हें दिसूं लागतात. अन् याच वेळीं विरहिणींची दशा मोठी अनुकंपनीय होते. त्यांना वाटूं लागतें कीं आतां प्रलयकाल ओढवतो आणि त्यांत हें जग बुडतें कीं काय कोण जाणे! बाहेर निसर्गाचें असें तांडव अन् ज्याचा आसरा घ्यावा तो प्रियकर तर जवळ नाहीं. अशा प्रसंगीं तिच्या मनाची स्थिति किती विचित्र होत असेल बरें !

या विरहिणीचें तसेंच झालें आहे. ती पडल्या जागीं तळमळते आहे. ‘ हुश्श् हुश्श् ’ करते आहे. तिच्या सख्या घाबरल्या आहेत. आपल्या मैत्रिणीची अशी दुरवस्था केल्याबद्दल मेघांना शिव्याशाप देत आहेत. त्या तोंडाळ गौळणींचा कटु शब्दांचा मार सहन न झाल्यामुळेंच जणूं मेघ आकाशांतून पळ काढीत आहेत. मेघांनीं काळें करतांच बाहेर स्वच्छ चांदणें पडत आहे. तिची तगमग शांत व्हावी म्हणून त्या तिला चांदण्यांत आणीत आहेत. चांफ्याचीं फुलें अन् चंदनाचे पल्लव शीतलतेसाठीं तिच्या देहावर पसरीत आहेत. पण कशानेंहि दाह शमेना म्हणून ती म्हणत आहे—

"नको हे उपचार ! द्या फेकून ते चंदनपल्लव. मला फक्त वनमाळी भेटवा. ही फुलांची शेज माझं अंग जाळीत आहे. काढा मला बाजूला. तुमचीं तीं गाणींहि बंद करा. तुम्ही साऱ्या कोकिळा आहां पण काय करूं ? मला नाहीं गोड वाटत—"

इतक्यांत एकटी तिच्यापुढें आरसा आणून धरते. 'बघ या आरशांत आपली काय दशा झाली आहे ती. म्हणे उपचार करूं नका.'

ती आरशांत पहाते अन् खुदकन् हसते. सख्या तिला विचारतात 'कां ग कळी उमलली ?' ती म्हणते,

'मला फसवतां होय ? हा आरसा नाहीं. ही तसबीर आहे. माझ्या प्रियकराची. श्याममोहनाची. कसा हंसतो चित्तचोर ! कसे दांत आहेत हिऱ्यासारखे. अन् ओठ तरी किती आरक्त, किती मधुर !—'

सगळ्या गौळणी पोट धरून हसतात तिच्या या वेडेपणाला.

नाहीं म्हटलें तरी त्या विरहिणीला बाह्य उपचारांचा थोडा बहुत उपयोग होतोच. तिचा तप्त झालेला देह त्या चांदण्यानें आणि चंदनपल्लवांनीं थोडा निवतो. भडकलेलें मनहि जरा तळ्यावर येतें. नष्ट झालेली विचारशक्ति थोडी थोडी उदित होऊं लागते. मग ती स्वतःकडे निरखून पहाते. आपलें वस्त्र अस्ताव्यस्त झालें आहे. देह मातीनें मळला आहे. केशबंध शिथिल झाला आहे. मुळचे रेशमासारखे मृदु केस तेलाविना रुक्ष झाले आहेत. प्रसाधनाच्या अभावीं आपल्या गुलाबी कपोलांची दशा झाली आहे. डोळ्यांत काजळ नाहीं. भांगांत शेंदुराची रेषा नाहीं. पायांचा लाक्षाराग अर्धवट झडून गेला आहे अन् अलंकार काढून टाकल्यामुळें ते ते अवयव रिते, ओके, दिसत आहेत. ती मनाशींच म्हणते—

"शीः ! काय दुर्दशा करून घेतली आहे मी आपल्या शरिराची ! माझा श्यामसुंदर सौंदर्याचा भोक्ता आहे. रसिकतेचा चाहता आहे. माझं हें भूत पाहून त्याला बरं वाटेल का ? माझ्या भेटीसाठीं म्हणून तो आला तरी हा अवतार पाहिल्यावर मागच्या पायीं निघून जाईल अन् पुनश्च माझं नांवसुद्धा काढायचा नाही. छेः छेः ! हरिप्रेम इवं

असेल तर आपण अंतर्बाह्य निर्मळ असलं पाहिजे. चांगलं असल पाहिजे अन् चांगलं दिसलं पाहिजे.

लगेच ती आपल्या सख्यांना म्हणते—

## ४७

मज तुरंबा कांवो जिये तिये
जेणें वेधें हरि सोयरा होये
मज लावा का हो चंदन ऐसिये परीचें
जें लाविलियाचि अनादि पुसोनि जाय वो १

मज करा कां वो कांही एक
जेणें करणें ठाके अशेख
सरा कां वो मज पुढूनी
मज पाहों द्या आपुलें मुख गे माये २

मज शृंगारा कां वो तया जोगी
पुढती अंग न समाय अंगीं
या मनापासोनि पढिये तो गोवळु
तोचि तो जिव्हारीं भोगीन गे माये ३

देह पालटा वो तयासाठीं
वरच या देइन अवघी सृष्टि
बापरखुमादेवीवरा विठ्ठला संयोगी
तोचि तो त्यागून भोगी गे माये ४

"सख्यांनो, या. सगळ्याजणी मिळून या अन् माझा साजशृंगार करा. माझ्या उरोजांना चंदनाची उटी लावा. मला सुंदरशी साडी नेसवा. माझी छानदारशी वेणी घाला. एकच टपोरं सपर्ण चंपकपुष्प मला माळा. माझ्या कपोलावर केतकीचूर्ण हलक्या हातानं लावा. खालच्या पापणीच्या कडेवर सूक्ष्मशी रेघ दिसावी इतकंच काजळ डोळ्यांत घाला. तांबूस पल्लवांकुर खुडून आणून माझ्या दोन्ही कानांत खोवा.

मला अशी सजवा, अशी नटवा, कीं मोहनानं माझं रूप त्याह्या ळींत रहावं. सगळ्या गौळणींत मीच त्याला प्रियतम व्हावं. माझ्या छंदानं त्यानं वागावं. मला एकटीलाच त्याचं हृदय लाभावं. असं माझं रम्य रूपांतर केलंत तर तुम्हांला फार मोठं बक्षीस देईन. सारी सृष्टि, सारं दृश्य जग तुम्हांला बहाल करीन !"

या पदांत ज्ञानेश्वरांच्या अंतराला गूढाशय असा आहे कीं, परमात्मप्राप्ति हें प्रत्येक जिवाचं साध्य आहे. सर्व कर्मं त्याच्या त्याच्या प्रसन्नतेसाठीं करायचीं आणि तीं करीत असतां चित्ताची मोहोर परमपुरुषाकडे लावायची. आपण देह धारण केला तेव्हाच कर्म आपल्या पाठीस लागलें तें केल्याविना चुकत नाही. पण तें अशा हातोटीनें करावें कीं कांट्यानें कांटा काढतात त्याप्रमाणें कर्मानेंच नैष्कर्म्यसिद्धि मिळवावी. पुनश्च त्या गुंगींत सांपडूं नये. ही गौळण आपल्या मैत्रिणींना सारी सृष्टि बहाल करायला तयार झाली याचा अर्थ असा कीं आत्मस्वरूपाची प्राप्ति होऊन जिवा–शिवाचें सामरस्य झालें कीं जग हें आपोआप बाधित होतें. आणि आत्मलाभासारखा महान् लाभ झाल्यानंतर या बाधित होणाऱ्या प्रपंचाचें दान करणें म्हणजे उतूं गेलेल्या दुधाबद्दल 'कृष्णार्पण' म्हणण्यासारखेंच आहे. असो.

ही गौळण अशा रीतीनें शृंगार करून बसते खरी; पण तिच्या अपेक्षेप्रमाणें तिचा आवडता ' गोवळु ' मात्र येत नाहीं. बेचैन होऊन ती सारखी आंत बाहेर करूं लागते.

## ४८

अवचिता परिमळु झळकला अळुमाळु
मी म्हणे गोपाळु आला गे माये
चांचरती चांचरती बाहेरि निघाले
ठकाचि ठेलें काय करूं १
मज करा कां उपचारु अधिक तापभारु
सखिये शारंगधरु भेटवा कीं

तो सावळा सुंदरु कांसे पीतांबरु
लावण्य मनोहरु देखियेला
भरलिया दृष्टि जंव डोळां न्यहाळी
तंव कोठें वनमाळी गेला गे माये २

बोधोनि ठेलें मन तंव झालें आनें आन
सोकोनि घेतले प्राण माझे गे माये
बाप रखुमादेवीवरु विठ्ठलु सुखाचा
तेणें काया मने वाचा वेधियेलें ३

ती म्हणते—

"कुठूनतरी सुगंधाची एक गोडशी झुळुक आली. मला वाटलं कीं श्याम सुंदरच आला.हो, नाहींतर इतका सुगंध दुसरकिडे कुठून असणार! सगळ्या फुलांत सुरभि पुष्प म्हणजे कमल अन् माझ्या मोहनाची मूर्ति तर कमलमयच आहे, नाहीं का? चरण तरी कमल. कर तरी कमल. नेत्र तरी कमल. अन् मुख तरी कमलच! मग सुगंधाला काय बाण! मी धांवतच बाहेर गेलें, जातांना वाटेंत आडखळून पडलेंसुद्धां. तो आला, माझ्या दारीं उभा राहिला अन् मीच समोर उभी नसलें तर? तो रुसला नसता कां? माझं प्रेम उथळ आहे, त्याला वेध नाहीं अन् ओढहि नाहीं, असं नसतं का त्याला वाटलं? तो कुठून तरी दुरून येणार, माझ्यासाठीं येणार, मग हृदयाचा जलकलश आणि नेत्रांचीं नीरांजनं घेऊन त्याच्या स्वागतासाठीं कवाडाशीं उभं नको होतं का असायला! म्हणून त्वरा केली अन् दारांत आलें, पहातें तो खरंच! माझा हृदयेश्वर किती पण चकित झालें मी. काय बाई तरी अचानक येणं! दुसऱ्याला जरा-सुद्धां सुगावा लागूं द्यायचा नाहीं म्हणजे काय रीत झाली? मी पाहिलं. तोच कटीला पीतांबर. तीच चिमणी मुरली ओंठावर. तोच निळा रंग लावण्य मनोहर. अन् तीच गळ्यांत रूळणारी घवघवींत वनमाला. जें रूप हृदयांत सांठवलं होतं तेंच बाहेर उभं. पहातां पहातां माझ्या डोळ्यांना टक लागलं. पण काय सांगू माझं दुर्दैव!"

ती मूर्ति एकाएकीं उभीच्या उभी विरून गेली. सारा शून्याकार. सगळाच भास. मन चडफडूं लागलं. मला मग जिकडे तिकडे तो सांवळा रंग शोधण्याचं वेडच लागलं.

४९

सावळिये बुंथी सावळिया रूपें
सावळिया स्वरूपें वेधियेलें १
काय करूं गे माय सांवळें न सोडी
इंद्रिया इंद्रिय जोडी एकतत्त्वें २
कैसें याचें तेज सांवळें अरुवार
कृष्णीं कृष्ण नीर सतेजपणें ३
ज्ञानदेव म्हणे निवृत्तीचे खुणे
सांवळेंचि होणें यासी ध्यातां ४

" कावीळ झालेल्या माणसाला जसं सगळंच पिवळं दिसूं लागतं त्याप्रमाणं माझ्या डोळ्यांना सगळंच सावळं दिसूं लागलं आहे. जमीन सावळी, आकाश सावळं, तारे सावळे, सूर्य–चंद्र सावळे अशी अगदीं सावळ्या रंगानं पाठ पुरवली आहे माझी. अन् हल्लीं मी माझ्या अवयवांकडे पाहतें तों तिथेंहि सावळी झांक चढल्याचा भास होतो. "

या पदांत ज्ञानेश्वर महाराजांनीं ध्यानाचें महत्त्व पर्यायानें सूचित केलें आहे. धारणा आणि ध्यान या दोन्ही क्रिया जवळच्याच नातलग आहेत. धारणेचीच परिणति म्हणजे ध्यान. ' देशबन्धश्चित्तस्य धारणा ' साध्य वस्तूच्या ठिकाणीं चित्त स्थिर करणें याला धारणा म्हणतात. ' तत्र प्रत्ययैकता ध्यानम् ' म्हणजे ध्येय वस्तूच्या ठिकाणीं एकतेचा प्रत्यय येणें हें ध्यान होय. ध्यानाचें सामर्थ्य फार मोठें आहे. अष्टांग योगांत याच्यापुढें समाधि ही एकच पायरी शिल्लक उरते. ज्या वस्तूचें सतत ध्यान करावें तिचे स्वभावधर्म हळूहळू

आपल्या अंगीं उतरूं लागतात. ध्यानाच्या सामर्थ्याविषयीं भिंगुरटीचें उदाहरण प्रसिद्ध आहे. एकनाथ महाराजांनीं आपल्या भागवती टीकेंत त्याबद्दल भिंगुरटीनें कोंडलेल्या कीटकाचा दाखला दिला आहे. तो कीटक भिंगुरटीच्या सतत ध्यानानें भिंगुरटीच होऊन बाहेर पडतो. परमार्थाचा गंध नसलेल्या सामान्य माणसाच्या आयुष्यांतहि कित्येक वेळां या ध्यानशक्तीचा प्रत्यय आलेला दिसून येतो. नॉटिलस नांवाच्या एका इंग्रजी मासिकांत बऱ्याच वर्षांपूर्वीं एक मजेदार गोष्ट प्रसिद्ध झाली आहे.

एक मुलगी होती. तिचें डोळे हिरवे हिरवे होते. तिचें एका पिंगट डोळ्यांच्या तरुणावर प्रेम बसलें. ते पिंगट डोळे आवडले म्हणूनच ती त्याच्यावर अनुरक्त झाली. त्याच एका कारणासाठीं तिनें त्याच्याशीं लग्नहि केलें. त्या डोळ्यांचें तिला वेड लागलें. तासन् तास ती त्या डोळ्यांकडे आशाळभूत दृष्टीनें पहात बसे. तिला वाटे, आपल्याला असे डोळे कां नाहींत ? जागृतींत, स्वप्नांत, जिकडे तिकडे तेच डोळे तिच्यापुढें नाचूं लागले आणि या ध्यानाचा परिणाम असा झाला कीं सात आठ वर्षांच्या आंत तिच्या डोळ्यांचा हिरवा रंग पार नाहींसा होऊन ते कायमचे पिंगट झाले.

भक्त ध्यानानें भगवंताशीं तद्रूपता पावतो, आणि ज्ञाता ज्ञेयस्वरूपीं मिसळतो. ‘ भक्त ध्यानीं जंव बैसला । पूज्य पूजक स्वयें झाला, ’ असा नाथांनीं एक जो अभंगचरण लिहिला आहे, तो या अविच्छिन्न तादात्म्याचा पूर्ण अनुभव घेऊनच.

हाच अर्थ थोड्या निराळ्या भाषेंत ज्ञानेश्वर महाराजांनीं पुढील पदांत सांगितला आहे :—

५०

भेटीसी गेलें तंव तीचि झालियें
भुललीं ठेलियें मज न कळे कांहीं
परतलिया दृष्टि जंव मागुता न्यहाळीं
तंव काळी ना सांवळी मूर्ति चोजवेना १

काय सांगो माये न कळे तयचीं सोये
येणें मनाचे मोडुनि पाये वेधियेलें
आंतु बाहेरी कैसी भरलेनि रंगें
क्षेम देऊं गेलें अंगें तंव तो जडुनी ठेला
वारितां नावरे काय सांगों माय गोठी
करुनि ठेला साटी जीवित्वेंशी २
आशेचिये हांवे तंव तो परतांचि घांवे
निराशेसि पावे वेळु न लागतां
बाप रखुमादेवीवरु विठ्ठलीं उपाशे
ज्ञानदेवा भावो निवृत्तिपायीं ३

तिची स्थिति मोठी चमत्कारिक झाली आहे, घडतें आहे हें काय आहे, हा संयोग का वियोग हेंच तिला कळेनासें झालें आहे. कारण तिचा जीवितेश्वर तिच्याशीं लपंडाव खेळतो आहे. हुलकावण्या दाखवतो आहे. संकल्प विकल्प हे मनाचे दोन पाय मोडल्यामुळें तिचें मन लंगडें झालें आहे. विषयांची वाटचाल त्याच्याकडून होत नाहीं. तें जागच्या जागीं स्वस्थ पडून राहिलें आहे. विषयनिवृत्ति झाल्या-कारणानें एक परमात्माच काय तो त्याच्या वांट्याला शिल्लक उरला आहे. त्यानेंच तिच्या हृदयाचा वेध घेतला आहे.

ती त्याच्या भेटीसाठीं म्हणून जाते. पण जातां जातां तीच शिल्लक उरत नाहीं. कृष्णाला भेटायला गेलेली 'निजांगें'च कृष्ण बनते. मिठाची बाहुली समुद्राला भेटायला गेली अन् समुद्राचा स्पर्श झाला न झाला तों सागररूप झाली तशांतलाच प्रकार. पण तिला ही तद्रूपता आवडत नाहीं. मुंगीला साखरेची अत्यंत प्रीति असली तरी 'तूं एक साखरेचा कणच बनून रहा' असें तिला सांगितलें तर ती तें मान्य करणार नाहीं. तसेंच या विरहिणीचें होतें. 'मी वल्लभा आणि तो कांत' असें द्वैत किंवा स्वामी – सेवकपण ज्यांत उरणार नाहीं अशी एकरूपता मला नको, असें तिला वाटतें. द्वैत हें हीन खरें; पण तेंच जर भक्तिमूलक असेल तर तें फार गोड असतें. तें कायम टिकवावें म्हणून ती हट्टानें आपली दृष्टि मागें फिरवते. थोडें दूर राहून त्याला

पाहूं लागते. पण काय? पदरीं निराशा! तिला कांहींच दिसत नाहीं. अद्वैतांत तसें असमाधान अन् द्वैतांत असा हिरमोड. काय करिल ती! ती म्हणते कीं "भेटीसाठीं वणवण हिंडावें, जिवाचें रान करावें तरी वर्षं सामाशीं ओझरतासुद्धां दिसायचा नाहीं कीं अंगावरचा वारा देखील यायचा नाहीं. आणि अवचित कधीं आलाच तर इतका चिकटून बसेल कीं जशीं कांहीं दोन शरीरें एकत्र जुळूनच जन्माला आलीं आहेत. जणूं अर्धनारी नटेश्वर! झिडकारलें तरी दूर व्हायचा नाहीं अन् ढकललें तरी बाजूला जायचा नाहीं.

नसला म्हणजे प्राण कंठाशीं आणतो अन् असला म्हणजे श्वासोच्छ्वासाल हि उसंत देत नाहीं. नाहीं म्हणजे अवर्षण अन् आहे म्हणजे अतिवृष्टि—'ये, ये' म्हणून विनवणी करावी तो देखतां देखतां पसार होतो अन् 'येऊं नको जा' म्हणून झिडकारावें तर प्रेमपाश आवळतो.

विरहिणीची अवस्था जवाहिऱ्याच्या नाजूक ताजव्यासारखी असते. वातावरणांतला सूक्ष्मसा फरकहि तिच्या मनाला जाणवतो. तें जणूं सदा झोपाळ्यावर बसलेलें-क्षणांत आशेकडे झोका तर क्षणांत निराशेकडे. एखादें अनुकूल दृश्य दिसलें तरी तिच्या मनांत अनुकूलच विचार येतील असं नाहीं. चांगलें ऐकलें तरी चांगलें वाटेलच असा नेम नाहीं. आशा उत्पन्न व्हायला सामान्य गोष्टहि पुरते अन् निराश व्हायला कांहीं लागतेंच असं नाहीं. शकुनांवर विश्वास बसतो. दारांतल्या झाडावर बसून कावळ्यानें 'काव, काव' केलें तरी तिला वाटतें, हा आपल्या प्रियकराच्या आगमनाची वर्दी देण्याकरतांच पुढें दूत आला आहे. ती मग त्याच्याशीं गोड गोड बोलूं लागते. त्याचीच मनधरणी करते.

ज्ञानेश्वरांची एक विरहिणी याच अवस्थेंत येऊन कावळ्याला काय सांगते तें ऐका:—

५१

पैल तो गे काऊ कोकताहे शकुन गे माये सांगताहे १
उडरे काऊ उडरे काउ तुझे सोन्यानें मढवीन पाउ
पाहुणे पंढरीरावु घरा कैं येती
दहीभाताची उंडी लावीन तुझ्या तोंडी

जीवा पाढिये त्याची गोठी सांग वेगी २
दुध भरून वाटी लाविन तुझे वोठीं
सत्य सांगे गोठी विठो येईल काई ३
आंबया डहाळी फळें चुंबी रसाळीं
आजिचे रे काळीं शकुन सांगें ४
ज्ञानदेव म्हणे जाणिजे ये खुणे
भेटती पंढरिराणे शकुन सांगें ५

" काऊ, तूं माझ्या वल्लभाचं आगमन सांगायला आला आहेस का ? उषःकालीं दारासमोर येऊन ओरडतोस म्हणून विचारतें. तुला कांहीं बातमी कळली आहे का ? तसं असलं तर एकदा उडून पुन्हा येऊन बैस. कधीं येईल माझा प्राणेश्वर ? अगदीं खरं खरं सांग. मला आवडेल अशीं कांहीं वार्ता सांगितलीस तर तुझे पाय सोन्यानं मढवीन. दहीभाताची उंडी तुझ्या तोंडांत घालीन. भरलेली दुधाची वाटी तुझ्या ओंठीं लावीन. तूं ज्या झाडावर बसला आहेस त्याला गोड, रसाळ आंबे लटकले आहेत. तूं पोटभर खा. मी तुला हाकलायची नाहीं. पण मला आधीं माझ्या प्रियकराची गोष्ट सांग. "

अशा या सर्व गौळणी श्रीकृष्णाच्या विरहानें ' विराण्या ' बनल्या. आधी विलासिनी अन् नंतर विरहिणी. श्रीहरीच्या समागमें वास करण्याचें सुखांतलें सुख त्यांनीं भोगलें तसं विरहाच्या दुःखातलें सुखहि अनुभवलें. तेंहि त्यांना मधुरच वाटलें. परब्रह्म सांवळी काया धारण करून गोपींच्या अंतरांतल्या उत्कट प्रेमाची गोडी चाखण्यासाठींच जणूं गोकुळांत आलें. त्यानें त्यांचा संसार सुखमय केला. त्यांच्या जीवनाचें सोनें केलें. आक्रूरानें श्रीकृष्णाला एकदा मथुरेंत नेल्यावर पुनश्च तो गोकुळांत येण्यासाठी यमुना नदी उतरला नाहीं. पुढें त्यानें पश्चिम सागरांत सोन्याची द्वारका वसवली. सोळा हजार एकशें आठ स्त्रियांचें अवाढव्य कुटुंब तिथें चालवलें. पांडवांचें भक्तकाज करण्यासाठीं आणि भूभार उतरण्यासाठीं तो नाना देश हिंडला आणि कार्यमग्न झाला हें खरें; पण गोपींच्या हृदयांत तो अखंड राहिला. त्यांनीं त्याला तिथें कायमचें बंदिवान करून ठेवलें. आणि अंतीं त्या परमात्म्याचें निजधाम पावल्या.

गोपींच्या महात्म्याचें वर्णन करणें कठीण आहे. त्या कामीं शेषाच्या सहस्रजिव्हाहि लुल्या पडतील. त्यांचें प्रेम विश्वात्म्यालाहि व्यापून उरलें. ज्याचा प्रत्यक्ष देवालाहि थांग लागला नाहीं त्याचें महत्त्व माझ्यासारखा पामर काय सांगूं शकणार ! मी फक्त एवढेंच म्हणूं शकेन कीं 'धन्य गोपी ! धन्य त्यांचें प्रेम ! अन् धन्य तें गोकुळ !' संतकुलभूषण नामदेवानेंहि शेवटीं तेंच म्हटलें:—

धन्य त्या गोपी, धन्य त्यांच्या गायी । धन्य हेचि मही ब्रह्मा म्हणे

गोपींच्या प्रेमाची ही अलौकिकता पाहून संतांच्या प्रतिभेला उमाळा आला म्हणूनच त्यांनीं या गौळणी रचल्या. गोपींसाठीं वाग्विलास करतांना सगळ्या संतांना धन्यता वाटली. गोपींच्या भक्तिभावानें संत भुलले, द्रवले, आणि तदाकृष्ट झाले. वैकुंठनायकाला आपल्या हृदयांत धारण करणाऱ्या आणि सच्चिदानंदपदवीवर आरूढ झालेल्या संतांनाहि गोपींच्या ज्या प्रेमांची तहान लागली तें प्रेम त्रिवार धन्य !

काशीक्षेत्रीं एकदा भक्तश्रेष्ठ कबिर रस्त्यानें जात असतांना लोक त्याचा जयजयकार करीत त्याच्यामागून जाऊं लागले. कबिराला तें आवडलें नाहीं. त्यानें झट्कन मागें वळून एक दोहरा म्हटला—

कबीर कबीर क्या कहे जा जमुनाके तीर
एक एक गोपिके प्रेममें बहगये कोटि कबीर

REFBK-0007254
REFBK-0007254
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
दा. क्र.